

साप्ताहिक

शनिवार । ११ मे १९७४ । एक रुपया

# माणूस

नांदेड – मराठवाडा आंदोलनातील सत्याग्रही



# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ११ मे | अंक : पन्नासावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |




'मी रेल्वेचं चाक थांबवीन! ...जॉर्ज

# रेल्वे संपाच्या निमित्ताने....

सु. ल. सोमण

बरीच जुनी हकिगत. जॉर्ज फर्नांडिस तेव्हा राजकीय मंचावरील मोठी व्यक्ती अजिबात नव्हती. 'बंद सम्राट' तेव्हा ते झाले नव्हते. एखाद दुसरा बंद कदाचित नावावर चढला मात्र होता. 'जायंट किलरही' तेव्हा जॉर्ज नव्हते. जॉर्ज फर्नांडिस तेव्हा होते मुंबईतलेच फक्त पुढे येऊ घातलेले कामगार पुढारी! अशाच एका संपात, मला वाटते सदुसष्ट सालच्या आसपास त्यांना अटक झाली होती. पोलिसांकडून मोठी मारहाण झाली होती. त्यावेळी 'माणूस'च्या वार्ताहराशी बोलताना साथी जॉर्ज फर्नांडिस म्हणाले होते, 'एक न एक दिवस मी रेल्वेचे चाक थांबवल्याशिवाय रहाणार नाही ' जॉर्ज तेव्हा फार मोठ्या प्रकाशात नव्हते. पण मोठ्या आत्मविश्वासाने तुरुंगातून ती भविष्यवाणी जॉर्जने उच्चारली होती. आज तब्बल तप उलटून गेले आहे. जॉर्जने त्यावेळी केलेला संकल्प आज जवळ जवळ पूर्ण केला आहे. जॉर्ज हो त्यावेळी रेल्वे कामगारांमधली छोटीशी शक्तीही नव्हती. आज मात्र रेल्वे कामगारांच्या संघटनेवर 'जॉर्ज' ह्या शक्तीचे प्रचंड वर्चस्व आहे. जॉर्ज फर्नांडिसना अटक झाल्याचे वृत्त देशभर पसरताच ठिकठिकाणी रेल्वे वहातूक साफ कोलमडते ह्यातच सारे काही आले आहे. मुंबई, दिल्लीसारखी शहरे बंद होतात. जॉर्ज फर्नांडिसच्या नेतृत्वाखालील सर्व संघटनांच्या समन्वय समितीने ८ मे पासून रेल्वे बेमुदत बंद पाडण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो किती भक्कम पायावर घेतला आहे, ह्याचा पुरावाच ह्या आकस्मिक, उत्स्फूर्त 'बंद'ने दिला आहे.

'ह्या बंदच्या निमित्ताने तरी सरकारला काही कळले पाहिजे. परिस्थितीचे गांभीर्य समजले पाहिजे. देश आज पेटून उठण्याच्या अवस्थेला आला आहे, आणि तिकडे मिश्राजी

पृष्ठ ३० वर

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०। दूरध्वनी ५७३५९

# जगणं कठीण


आम्ही झोपडपट्टीवाले नाही हो. गाड्या नीट चालू झाल्या की जाऊ आमच्या गावी.
पहिल्या वर्गात इंजिनीयर झालो. कुठे नोकरी लागेना. मग ठरवलं की स्टेशनात हमाली करून पोट भरावं.
तुकोबा आम्ही वारकरी नाही आहोत.
मुंबईहून अमृतसरला चालत जायला किती वर्ष लागतील ?
रेल्वे चौकशी

# लहानाप्रमाणे मोठ्यांनाही भुरळ घालणारी बालनगरी

दिलीप भंडारे

जीवनात पाऊल टाकणारा सात वर्षाचा मुलगा किंवा जीवनाचा अनुभव घेतलेला सत्तर वर्षाचा म्हातारा हे एखाद्या खेळण्याचा, वस्तुचा, सिनेमाचा अगर विदूषकी चाळयांचा एकाच पातळीवर येऊन आनंद घेत असतात. सध्याच्या औद्योगीकरणामुळे झालेल्या आयुष्यात, जत्रा, सर्कस, फनफेअर वा अन्य गोष्टी दिसल्यास साहाजिकच माणसांचे पाय तिकडे वळतात. माणसाच्या मनात ह्या प्रत्येक कार्यक्रमात भाग घेण्याची इच्छा असते. पण लोकात कसे दिसेल ह्या विचाराने तो मन दाबीत असतो. आपल्यात असलेल्या सुप्त गुणांना तो वाव देऊ शकत नाही. मोठ्यापेक्षा लहान मुलांची फार कुचंबणा होते. आपले पालक नेतील तो आणि दाखवतील तो कार्यक्रम पाहणे भाग असते. थोडक्यात ह्या वडील माणसामागे त्याला फरफटावे लागते. आपल्या देशात भारतीय संदर्भात ह्या बाबत काय करता येईल असा जेव्हा आम्ही विचार करू लागलो तेव्हा त्यातून ही 'बालनगरीची कल्पना' सुचली. लहान मुले ही अत्यंत संवेदनाशील, सृजनशील असतात. तेव्हा त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळून, त्यांना काही नवीन प्रयोग करता यावेत, निरनिराळ्या कार्यक्रमात भाग घेता यावा व त्यातून त्यांना स्वत:ला शिकता यावे ह्या मूळ कल्पनेवर बालनगरीचा आराखडा सुरू झाला.

रंग, रेषा. सूर, ताल, शब्द आणि आकार व ह्यालाचे जोडून कल्पनाशक्ती असल्यास कलेचा जन्म होतो. विकास होतो. हे रंग, सूर, शब्द अस्तित्वाने वेगळे वाटत असले तरी माणसाच्या जीवनाशी, भावनांशी आणि निसर्गाशी त्याचे अविभाज्य नाते असते. ह्या गोष्टींचा विचार करून त्यात काय काय कार्यक्रम असावेत हे ठरू लागले. मुलांना काही गोष्टी शिकवण्यापेक्षा त्यांनी स्वत:हून मनापासून शिकणे ह्या प्रक्रियेचा विचारही प्रामुख्याने झाला.

तेव्हा ह्या बालनगरीत काय असेल हे थोडक्यात पुढे दिले आहे.

## उत्कृष्ट ग्रंथालय

उत्कृष्ट ग्रंथालय हे बालनगरीतील पहिले आणि कधीही न संपणारे आकर्षण असेल. ह्यात विविध विषयांची व बाल साहित्याची पुस्तके असतील. तसेच परदेशी बाल साहित्याचा भारतीय प्रादेशीक भाषांमध्ये भाषांतरे करण्याचे काम चालेल. बाल मानसशास्त्रात संशोधन करणाऱ्या मंडळीसाठी एखादे मध्यवर्ती ग्रंथालय आणि प्रयोगशाळा उभी करता आली तर बाल विकासाच्या कार्याला काही शास्त्रीय पार्श्वभूमी आणि प्रयोगक्षमता निर्माण होईल. काम वाढेल तसा एखादा सुसज्ज छापखाना देखील चालू शकेल.

## खेळणी घर

खेळणी घरामध्ये साध्या बाहुल्यापासून अद्यावत यांत्रीक खेळण्यापर्यंत सर्व तऱ्हेची खेळणी मुलांना उपलब्ध करून खेळावयास दिली जातील. खेळण्यातील विविधतेमुळे आपल्या आवडीप्रमाणे खेळणे बदलता येईल. तसेच येथे भारतीय ढंगाची यांत्रीक खेळणी निर्माण करता येतील. त्यांचा कारखाना काढता येईल. खेळाची मैदाने आणि जलक्रीडेच्या जागा ह्या बालनगरीत अत्यावश्यक भाग असेल.

## रंगशाळा

संगीत, नृत्य व नाटक यापैकी रंगमंदिरात मुलांना नटापासून प्रेक्षकापर्यंत कोणतीही भूमिका करता येईल. निरनिराळ्या पाश्चिमात्त्य व भारतीय संगीताच्या ध्वनिमुद्रिका येथे असतील. नाटकात काम करण्याबरोबर संगीत, नृत्य, प्रकाशयोजना, देखावे, ह्याचीही माहिती मिळेल. स्वत: लिहून एखादी नाटयछटा देखील मुलाला करता येईल.

## वाहने

मेणा, पालखी, रथ आदी वाहने बहुधा आपल्याला सिनेमातच पहावयास मिळतात. येथे प्रत्यक्ष त्यातून हिंडता येईल. ह्याखेरीज सायकल, व्हिक्टोरिया, ट्राम, हेलिकॉप्टर्स, बोटी, तारेवरील ट्रॉलीज, पाणबुड्या, मोनोरेल, भुयारी रेल्वे आणि हॉवरक्रॉफ्ट देखील येथे असेल. अर्थात योजनेचा आवाका आणि खर्च लक्षात घेता ह्या गोष्टी टप्प्याटप्प्याने होत राहतील. परंतु वाहनांच्या स्थित्यंतरात मानवी प्रगतीचा इतिहास आकाररूप झालेला दिसेल.

## घर

बालनगरीतील प्रत्येक इमारतीचा आकार अत्यंत वैशिष्टयपूर्ण असेल. राहण्यासाठी झाडावरल्या लाकडी घरांपासून ते काश्मीरमधील शिकारा, आदिवासी झोपडयांपर्यंत सर्व प्रकार असतील. ही घरे कायम स्वरूपाची राहून अल्पशा मोबदल्यात येथे राहण्याची सोय केली जाईल.

निरनिराळ्या पद्धतीची आणि धर्माची देवळेदेखील येथे असतील. ह्या सर्वांखेरीज चित्रपटगृह, चित्रपट स्टुडिओ, आर्ट गॅलरी, कथा कथन, वस्तु संग्रहालय, पाण्याखालील काचेची खोली, डमी बँक, पझल्स, पॅरेशूटसमधून उडया टाकण्यासाठी मनोरा, मेमबाजी, प्लॅनोटरीअम (कृत्रिम नभांगण), सर्कस, पक्षांची लायब्ररी, डमी वॉर, नियतकालिके, प्राणी संग्रहालय, गिर्यारोहण असे अनेक प्रकार ह्या नगरीत उभारता येण्यासारखे आहेत. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास निर्भेळ आनंदाची व करमणुकीची ही जागा असेल. त्याचप्रमाणे मुलांच्या स्वावलंबी जीवनाच्या दृष्टीने येथे खूप शिकण्यास वाव मिळेल.

होतकरू चित्रकार, शिल्पकार, आर्किटेक्टस्, गायक, नकलाकार, नट ह्यांना हक्काची रंगभूमी येथे असेल. लंडनच्या हाईडपार्कवर जसा कोणीही भाषण ठोकू शकतो त्याप्रमाणे ह्या कलावंतांना हुकमी प्रेक्षक व श्रोते मिळतील.

बालनगरीतील बरेचसे कार्य हे कलावंतांनी दिलेल्या सेवेसाठी असल्याने ह्यात बाहेरचा भांडवली खर्च बराच कमी आहे.

विज्ञानाने चंद्रावर, मंगळावर जाणारा माणूस, घरबसल्या चालवली जाणारी वाहने, खेळणी, तंत्रज्ञ, त्यांच्या अनेक शाखा,

पृष्ठ २९ वर

# मराठवाडा आंदोलन महाराष्ट्रव्यापी व्हायला हवे

प्रा. प्रभाकर चौधरी

मराठवाड्यात बसमत गोळीबारातून विद्यार्थी आंदोलनास सुरुवात झाली. बसमत गोळीबारामध्ये दोन बेकार नवयुवक ठार झाले. मॅजिस्ट्रेटचा आदेश नसताना आणि गोळीबारासारखी परिस्थिती नसताना एका मायेफिरू जवानाच्या बंदुकीतून गोळ्या झडल्या व दोन विद्यार्थ्यांना हौतात्म्य प्राप्त झाले. ३० मार्च १९७४ रोजी परभणीच्या मुलांनी विद्यापीठाच्या परीक्षेवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. त्याच वेळी या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी व शरद पवार यांच्या राजिनाम्याची मागणी विद्यार्थी व जनता यांनी केली. हा प्रश्न विधानसभेत निघाला त्यावेळी विद्यार्थ्यांच्या झटापटीत ही गोळी सुटून घटना घडली असे ज्यावेळी ना. शरद पवार यांनी सांगितले त्यावेळी विद्यार्थ्यांचेच काय बसमत येथील सर्व नागरिकांचे माथे भडकले आणि खरी वस्तुस्थिती बाहेर आली. ना. शरद पवार यांच्या या 'स्टेटमेंट'मुळे आंदोलनाची तीव्रता वाढली.

परभणीच्या विद्यार्थ्यांनी प्रथमत: न्यायालयीन चौकशी होत नाही तोपर्यंत परीक्षेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. परभणी येथील विद्यार्थ्यांनी मराठवाड्यातील सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले.

२ एप्रिल १९७४ रोजी परभणी व बसमत नगर खेरीज मराठवाड्यात सर्व ठिकाणी परीक्षा व्यवस्थित सुरू होत्या. परंतु मराठवाडा दैनिकातील २।४।१९७४ च्या बातमीमुळे परीक्षेला जाणारे विद्यार्थी अस्वस्थ झाले. काय करावे हे त्यांना कळेनासे झाले. अभ्यासावरून त्यांचे चित्त उडाले व उद्या काय बातमी येते याची वाट पाहू लागले.

३ एप्रिल १९७४ रोजी कुलगुरूंनी परीक्षेला बसण्याचे आवाहन केले. मराठवाडाभर विद्यार्थ्यांनी परीक्षेवर बहिष्कार टाकावा यासाठी परभणीच्या विद्यार्थ्यांनी सेलू, जालना, औरंगाबाद, अंबाजोगाई, बीड, लातूर आदि ठिकाणचा दौरा काढला व परीक्षेवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले.

४ एप्रिल रोजी ना. शरद पवार यांनी न्यायालयीन चौकशीची घोषणा केली. त्यावेळी मराठवाड्यातील अधिकांश केंद्रावर परीक्षा बंद पडल्या होत्या. विद्यार्थ्यांचा मुख्य रोख औरंगाबादच्या परीक्षा बंद पाडण्यावर होता. त्यासाठी परभणी येथील ५०० विद्यार्थी जालना व औरंगाबादला गेले व त्यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा बंद पाडण्याचा प्रयत्न केला.

औरंगाबादमध्ये तीन प्रकारच्या विद्यार्थी संघटना आहेत. 'मुसा' नावाच्या संघटनेचा परीक्षेवर बहिष्कार टाकण्यास विरोध होता. दलित युवक आघाडीचे विद्यार्थीही फारसे उत्सुक नव्हते. परंतु युक्रांदच्या नेत्यांनी परीक्षावर बहिष्कार टाकण्याचे धोरण स्वीकारले होते व त्या दृष्टीने ते प्रयत्न करीत होते.

विद्यापीठाने परीक्षेचा प्रश्न प्रतिष्ठेचा केला नसता तर परीक्षा बेमुदत बंद कराव्या लागल्या नसत्या. परिस्थिती निवळेपर्यंत परीक्षा बंद केल्या असल्या तर १०-१५ दिवसांचे आत परत परीक्षा सुरू झाल्या असत्या. औरंगाबाद येथील काही केंद्रावर विद्यापीठाचे अधिकारी स्वत: उपस्थित राहून परीक्षा घेत होते. त्यांना अन्य ठिकाणी विद्यार्थ्यांनी परीक्षेवर घातलेला बहिष्कार हाणून पाडावयाचा होता परंतु ते त्यांना शक्य झाले नाही. 'मुसा'च्या संघटनेने परिस्थितीच्या रेटचापुढे आपला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे मराठवाड्यातील ४ परीक्षा केंद्रे सोडली तर ८।४।१९७४ रोजी सर्व परीक्षा केंद्रे बंद पडली. ९।४।१९७४ रोजी कुलगुरूंनी परीक्षा बेमुदत बंद केल्याचे जाहीर केले. विद्यार्थी परीक्षेतून मोकळे झाले आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने आंदोलनास स्वरूप आले. विद्यार्थ्यांची पहिली मागणी न्यायालयीन चौकशीची होती. ती मान्य झाल्यानंतरही विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होतेच. ज्यावेळी परीक्षा बेमुदत बंद करण्यात आल्या त्यावेळी पुढे काय असा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर आला.

गुजराथमध्ये विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केल्यापासून प्रत्येकाला असे वाटत होते की, याही भागात असे काही व्हावे. एकूण महाराष्ट्रामध्येच विरोधी पक्षाची दैना. त्याहून मराठवाड्यात फट-फजिती अधिकच. परंतु सामान्य जनता, सरकारी मध्यमवर्ग, कर्मचारी, छोटा शेतकरी, व्यापारी, मजूर, कामगार, बेकार या सर्वांना महागाईचे चटके इतके बसू लागले की, त्यामध्येच त्यांची होरपळून जाण्याची वेळ आली. ही स्थिती फक्त मराठवाड्याचीच आहे असे नाही, सर्व महाराष्ट्रातही हेच आहे. भ्रष्टाचार, वशिलेबाजी,, जातीयता, नात्यागोत्याचे राजकारण सर्वत्रच आहे. त्यामुळे सामान्य माणसाचे जीवन धोक्यात आले आहे आणि त्याला भविष्य असे काही उरले नाही.

अनेक दिवसापासून लोकांच्या मनात हा असंतोष धुमसत होता. परंतु तो पेट घेत नव्हता. काँग्रेसच्या दुहीचा लोकांना फायदा मिळेल असे वाटत होते. परंतु तेही होत नव्हते. कोंडी फुटत नव्हती.

परंतु ज्याक्षणी मराठवाड्यातील विद्यार्थी जागा झाला आणि तो आंदोलनात उतरला त्यावेळी सर्वप्रथम या विद्यार्थ्यांचे स्वागत काही

संस्थाचालकांनी केले. आणि त्या महाविद्यालयात काम करणारे प्राध्यापक प्रथमतः या लढ्यात उतरले. आता इतर प्राध्यापकवर्ग या आंदोलनास सक्रिय पाठिंबा देत आहे. परंतु ज्या संस्थांचा विश्वास लोकशाही, समाजवाद यावर आहे तेथील प्राध्यापकांनी व संस्थाचालकांनी हा लढा जनताभिमुख कसा होईल असा जाणीव पूर्वक प्रयत्न केला हा फरक लक्षात ठेवला पाहिजे.

दि. ९ ला विद्यापीठाने परीक्षा बेमुदत बंद केल्यानंतर खऱ्या अर्थाने विद्यार्थीलढा जाणवू लागला. ज्या ठिकाणी महाविद्यालये आहेत त्या त्या ठिकाणी तीन ते चार हजारचे मोर्चे निघू लागले. गुजरात आंदोलनाचे वेळी विद्यार्थ्यांनी ज्या युक्त्या उपयोगात आणल्या त्याच युक्त्या-प्रयुक्त्या विद्यार्थी नेते अवलंबित होते. ठिकठिकाणी महागाईच्या पुतळ्याचे दहन, महागाई–बेकारी विवाह, गाढवाची मिरवणूक, घेराव, सरकारी वाहनांच्या गैरवापरांवर निर्बंध, मागण्यांना पाठिंबा, लोक प्रतिनिधींना तंग करून सोडणे, गुदगुल्या, जागृती मोर्चा वगैरे मार्गांचा अवलंब होऊ लागला.

परीक्षा बेमुदत बंद केल्यामुळे ठिकठिकाणचे विद्यार्थी आपल्या गावी निघून गेले. त्यामुळे विद्यार्थ्यांची शक्ती कमी पडू लागली. हा लढा एकाकी पडून बंद तर होणार नाही अशी भीती वाटू लागली. परंतु २०–४–७४ रोजी शांततामय मार्गाने चालू असलेल्या लढ्याला औरंगाबाद व अंबाजोगाई येथे एस. आर. पी. ने अमानुष लाठीमार केल्यामुळे गालबोट लागले. औरंगाबाद येथे मराठवाडा दैनिकाचे सहसंपादक बाबा दळवी व इतर विद्यार्थ्यांवर जो निर्घृण लाठीहल्ला झाला त्यामुळे परिस्थिती चिघळली व आंदोलनाचा सर्वत्र डोंब उसळला. औरंगाबादमध्ये भडकलेल्या या ज्वाला 'मराठवाडा' या दैनिकाच्या रूपाने सर्वत्र पसरल्या व ठिकठिकाणी आंदोलनाची तीव्रता वाढू लागली.

२१–४–१९७४ रोजी औरंगाबादला गोळीबारात चार विद्यार्थी ठार झाले. त्यात ११ वर्षाचा कोवळा जमीर आणि दुसरा १७ वर्षांचा नारायण बिलोर होता. तेव्हापासून लढ्याची तीव्रता वाढली. त्यानंतर अंबाजोगाई, परभणी, नांदेड येथेही लाठीमार झाला व लढ्याची तीव्रता वरचेवर वाढू लागली.

औरंगाबाद येथे झालेल्या गोळीबारानंतर जनतेला लढ्यात उतरण्याची प्रेरणा मिळाली. त्याप्रमाणे नागरिकांच्या कृती समित्या कायम होऊन गोळीबाराचा निषेध, मोर्चे, सत्याग्रह, उपोषण करून आपापल्या शक्तिनुसार आंदोलनात सक्रिय भाग घेऊ लागली. ठिकठिकाणच्या संघटनांनी आपला पाठिंबा दर्शविण्यास सुरुवात केली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चालविलेले हे आंदोलन जनताभिमुख होऊ लागले आहे.

विद्यार्थ्यांनी हे आंदोलन मुख्यतः बेकारी, महागाई, भ्रष्टाचार व मराठवाड्याचा विकास या प्रश्नावर सुरू केले आहे.

मराठवाड्यातील सर्व कॉंग्रेस आमदारांना विद्यार्थ्यांनी त्रस्त करून सोडल्यामुळे खासदार माणिकराव पालोदकर यांच्या निमंत्रणावरून मराठवाड्यातील सर्व आमदार व मंत्र्यांची एक बैठक सुभेदारी गेस्ट हाऊस, औरंगाबाद येथे झाली. त्यानंतर सर्व आमदारांनी मिळून एक निवेदन मुख्यमंत्री नाईक यांना दिले. मुख्यमंत्र्यांनी नेहमीच्या पद्धतीने भावनात्मक आवाहन करून मराठवाड्याच्या तोंडाला पाने पुसली. त्यामुळे लढा आणखी तीव्र करण्याचा निर्णय ठिकठिकाणच्या कृती समित्यांनी जाहीर केला.

आंदोलन जनताभिमुख होत आहे. परंतु सर्व प्रकारची जनता यात सहभागी होत नाही. केवळ शाब्दिक पाठिंबा व्यक्त होत असताना दिसतो. या लढ्यात खेड्यातील शेतकरी, मजूर, शहर कामगार व शहरातील सामान्य जनता अद्याप तरी सहभागी झालेली दिसत नाही. सर्वसाधारण जनता अद्यापही उदासीन आहे. सर्व पक्षांचा या आंदोलनास पाठिंबा आहे. परंतु कोणत्याही पक्षाने या साठी कृती केली नाही.

विद्यार्थी संघटनांमध्ये फूट पडण्याची भीती निर्माण झाली आहे. असे झाले तर आंदोलन खलास होईल व नंतर आंदोलनात भाग घेण्यास विद्यार्थी तयार होणार नाहीत.

ठिकठिकाणी ज्या कृती समित्या कायम होत आहेत त्यात काही ठिकाणी जातीय, भ्रष्ट लोक स्वतः होऊन आपल्या पापांवर पांघरूण घालण्यासाठी शिरकाव करून घेत आहेत. परंतु विद्यार्थी यांचीही गय करणार नाहीत असे मला वाटते. ज्या ठिकाणी विरोधी शक्ती नाही त्याच ठिकाणी असे होते.

काळाबाजारवाले, बडे व्यापारी, बडे बागाईतदार, नंबर दोनचा धंदा करणारे यांना या आंदोलनाविषयी आस्था नाही. उलट हे चिरडले गेले तर यांना हवे आहे. कारण त्यांचे हितसंबंध त्यांच्या धंद्याशी निगडीत आहेत. कमाईचा त्यांचा हाच मोसम आहे. त्यामुळे ते या आंदोलनाविषयी वाटेल तसे बोलतात. आज जो सत्ताधारी पक्ष आहे तो मात्र या आंदोलनापासून अलिप्त आहे. ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी आणि नागरिकांनी एकेकाळी स्वातंत्र्याचा लढा दिला व निजामशाहीला पालथे पाडले तीच मंडळी पुढे आलेली दिसतात. श्री. बाबूराव काळे, पवार, आमदार वैशंपायन यांच्या सारख्यांचे अपवाद सोडल्यास सर्वत्र ह्याच मंडळींनी झेंडा हाती घेतल्यासारखे दिसते.

परंतु आज मराठवाड्यातला विद्यार्थी निर्भयपणे पुढे आला आहे. तो मंत्र्याच्या फुसक्या आश्वासनाला बळी पडणार नाही अशी आशा आहे.

एक बोच मात्र सर्वत्र जाणवते ती अशी. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी ज्या प्रश्नावर आंदोलन सुरू केले आहे ते प्रश्न फक्त मराठवाड्यापुरते मर्यादित नसून ते महाराष्ट्रातील सर्व जनतेचे प्रश्न आहेत. परंतु महाराष्ट्रातील जनता व वर्तमानपत्रे मराठवाड्यातील या जन आंदोलनाबाबत मात्र मूग गिळून गप्प बसली आहेत. मराठवाडा बिनशर्त पश्चिम महाराष्ट्रात विलीन झाला परंतु पश्चिम महाराष्ट्राच्या या आंदोलनाविषयीच्या उदासीनतेमुळे मराठवाडा वेगळा पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

शेवटी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो आणि तो म्हणजे या लढ्यात दैनिक मराठवाडा या वृत्तपत्राचे योगदान. या दैनिकाचे संपादक दूरदृष्टी ठेऊन अहिंसात्मक मार्गाने हा लढा पुढे कसा नेता येईल याची दक्षता घेऊन ही जन आंदोलनाची पेटलेली ज्योत तेवत ठेवण्याची फार मोठी कामगिरी करीत आहेत. त्याबद्दल मराठवाड्यातील विद्यार्थी व जनता त्यांचे ऋण कधीही विसरणार नाही. □ □

# दुहेरी अन्यायाच्या भावनेमुळे भडकलेला

# नांदेड जिल्हा

एक नांदेडकर

मराठवाडा ही संतांची भूमी आहे हे विधान आता सर्वांना पाठ झाले आहे. साधुसंत क्षमाशील असतात हे सर्वांना ठाऊक आहे. पण त्यांचा संताप व शाप फारच दाहक असतो हे बऱ्याच जणांना—विशेषतः शासनाला ठाऊक नसावे असे वाटते. अन्यथा संतांचाही संयम सुटेइतपत अन्याय व अत्याचार करण्यास शासनाचे मन धजावले नसते. आज सारा मराठवाडा पेटून उठलेला आहे. तरुण, वृद्ध सारेच प्रक्षोभक मनःस्थितीत वावरत आहेत. पक्षनिष्ठा, जातिभेद छेदून हे आंदोलन विलक्षण उभारी घेत आहे.सध्याच्या राज्यकर्त्यांचे निजामी राजवटीशी साधर्म्य कल्पून आजचा तरुण लढयात उतरला आहे. तरुण वर्ग या लढयात आघाडीवर असणे साहाजिक आहे. लढयाची सुरुवातच मुळी बेरोजगार युवकांवर वसमतला केलेल्या गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर झाली आहे. बेरोजगारीचे मूळ अविकसितपणात आहे व मराठवाड्याचा अविकसितपणा शासकीय धोरणामुळे निर्माण झालेला असल्याने या आंदोलनाने विकासाच्या मागण्यांचे स्वरूप घेतले आहे.

नांदेड जिल्हा हा पूर्वीपासूनच लढाऊ जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. निजामी राजवटीत सर्वाधिक सशस्त्र लढा याच जिल्ह्याने दिला. एका टोकाला असूनही संयुक्त महाराष्ट्राच्या सिद्धीसाठी आंदोलन मोठ्या जिद्दीने चालविले. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला तोच मुळी मराठवाड्याने घेतलेल्या तत्त्वनिष्ठ भूमिकेमुळे ! परंतु राज्यकर्ते नेमके हेच सत्य विसरले आहेत. सौदेबाजी करणाऱ्यांना मलिदा तर वडील भावंडांवर विश्वास टाकणाऱ्याला धत्तुरा असा शासकीय खाक्या आहे. महाराष्ट्र स्थापनेपासूनच मराठवाड्यावर अन्याय करण्याची परंपराच सुरू झाली आहे. मराठवाड्यातील कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय हा तर एक स्वतंत्र विषयच होईल. आजमितोला सचिवालयात मराठवाड्याचा केवळ एकच वरिष्ठ अधिकारी उरला आहे. हैद्राबाद राज्यातून आलेले अधिकारी—त्यांना डेप्युटी कलेक्टरवर अडकावून ठेवले आहे. त्यांना बढत्या नाकारण्यात आल्या. कर्मचाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असता कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय लागला पण सर्वोच्च न्यायालयाचाही अवमान करून शासनाने निकालाची अंमलबजावणी अद्याप सुरू केली नाही. चवदा अवजड उद्योगांची महाराष्ट्र शासनाने मागणी केली आहे. त्यापैकी आठ विदर्भात व बाकीचे पश्चिम महाराष्ट्रात काढण्याची शिफारस राज्य शासनाने केन्द्राला केली आहे. मराठवाड्यात १९ तालुके दुष्काळी असल्याचे शासनाने कबूल केले आहे. पण जागतिक बँकेच्या मदतीने करावयाच्या दुष्काळ निवारण योजनेत यापैकी एकाही तालुक्याचा समावेश नाही.

ब्रॉडगेजबाबत तर कथाच आहे. मनमाड—मुदखेड ही मीटरगेज व कुर्डवाडी—लातूर हा नॅरोगेज मार्ग ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित करण्याची जनतेची फार जुनी मागणी आहे. दुष्काळाच्या निमित्ताने त्याला मंजुरी दिल्याचे जाहीर झाले. पण त्या कामांना सुरुवात नाही. याउलट वणी—चगाखा या मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातील रेल्वेचे काम जोरात सुरू आहे. रेल्वेचे काम दुष्काळी काम म्हणून हाती घेतले तर दुष्काळ गेल्यावर ती कामे जेथल्या तेथे बंद होतात हा गेल्या ५० वर्षांतील अनुभव आहे. (पहा, नगर—पैठण, खामगाव—बुलढाणा येथील ३० वर्षांपूर्वीचे मातीचे भराव.) तेव्हा दुष्काळी काम म्हणून मंजूर झालेली कामे होतीलच याची खात्री जनतेला वाटत नाही.

महाराष्ट्र शासनाला मराठवाड्याबद्दल आकस वाटतो. त्यातल्या त्यात नांदेड जिल्हा तर शत्रूस्थानीच वाटत असावा. त्याचे कारणही उघड आहे. ना. वसंतराव नाईकांचे राजकीय प्रतिस्पर्धी व मुख्यमंत्रीपदाचे हक्कदार श्री. शंकरराव चव्हाण यांचा हा जिल्हा आहे. मुख्यमंत्रीपदाचा वाद सुरू झाल्यापासून नांदेड जिल्ह्याच्या कितीतरी योजना रद्द करण्यात आल्या. धनेगाव येथील MIDC मध्ये टाटा—मफतलाल यांनी प्लॉटस घेतले होते. परंतु शासनाचे धोरण पाहून त्यांनी आपले प्रकल्प रद्द केले. पेणगंगा प्रकल्पाची कार्यालये बंद करण्यात आली. लेंडी धरणाचा विचारच होत नाही. नांदेडचे मेडिकल कॉलेज अंबेजोगाईला देऊन जिल्ह्याजिल्ह्यात भांडण लावण्याचा नीच प्रयत्न होतो, नांदेडच्या विद्यापीठ उपकेंद्राची योजना स्थगित होते, या साऱ्या बाबी बुद्धिपुरस्सर होतात असा जनतेचा समज आहे.

नांदेड जिल्ह्यावरील महाराष्ट्र शासनाच्या आकसाचे नागडे प्रदर्शन झाले ते रेल्वे प्रकरणात. २ जानेवारी १९७३ रोजी प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी औरंगाबाद मुक्कामी मनमाड-मुदखेड ब्रॉडगेज मार्गाची घोषणा केली. यानंतर तीनच दिवसांनी रेल्वेखात्याने हा मार्ग मनमाड-

परभणी-परळी असा होणार असल्याचे जाहीर केले. या बदलाचे कारण शोधण्यासाठी नांदेडकरांच्या एका शिष्ट-मंडळाने दिल्लीला जाऊन इंदिराजींची भेट घेतली असता राज्यशासनाच्या शिफारशीवरून रेल्वेखात्याने हा बदल केल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

मराठवाड्यावर अन्याय व नांदेडबाबतचा आकस या दुहेरी जुलमामुळे नांदेडचे लोक अधिक पेटून उठले आहेत. म्हणून चळवळीला सर्वात दाहक स्वरूप नांदेड येथे प्राप्त झाले आहे. शेंडी तुटो वा पारंबी तुटो या निर्वाणीच्या भावनेने नांदेडकर जनता आंदोलनात सामील झाली आहे. दि. २२ चा रेल्वेरोको सत्याग्रह अभूतपूर्व होता. पद्मश्री. श्यामराव कदम, आम. फरूकपाशा, जि. प. अध्यक्ष श्री. बळवंतराव चव्हाण, नगराध्यक्ष मधुकरराव जालनेकर ही मंडळी रेल्वेरोको सत्याग्रहात उतरली. नांदेडचे आदरणीय वृद्ध नेते श्री. श्यामरावजी बोधनकर, विख्यात साहित्यिक श्री. नरहर कुरूंदकर, चार महाविद्यालयांचे प्राचार्य, ५० वर प्राध्यापक, हजारो विद्यार्थी व नागरिक सहभागी होते. समाजवादी पक्षाचे सरदार सुंदरसिंग हुजूरिया, नंदकुमार देव, भुजंगराव गावंडे, कम्युनिस्ट पक्षाचे का. गोपाळराव कुर्तडीकर, गंगाराम कातोटे, जनसंघाचे मस्की, रिपब्लिकन पक्षाचे अॅड. जोंधळे, डॉ. मांजरमकर, मुस्लिम लीगचे अॅड. अब्दूल करीम सिद्दीकी आदि लोकांनी पहिल्या दिवशी सत्याग्रह केला.

दै. प्रजावाणीचे संपादक व नगरपिते सुधाकर डोईफोडे व एस. टी. बोर्डाचे सदस्य श्री. शंकरराव चव्हाण यांचे जामात श्री. मधुकरराव खतगावकर यांनी रेल्वेसमोर उड्या घेऊन रेल्वे अडविली. श्री. डोईफोडे हे रेल्वेविषयक प्रश्नावर अभ्यासपूर्ण लिखाण सतत करतात. ब्रॉडगेज बाबतची मराठवाड्याची बाजू शासनासमोर आणण्यात त्यांच्या लिखाणाचा व निरनिराळ्या सभा, संमेलनातील ठरावांचा फार मोठा हातभार आहे. पोलिसांनी या शांततापूर्ण सत्याग्रह्यांना बेदम मारहाण केली. श्री. डोईफोडे यांची पाठ सडकून काढण्यात आली तर श्री. खतगावकरांचे डोके फोडण्यात आले. या तुकडीत १३ पैकी १३ ही सत्याग्रही जखमी झालेले आहेत. एस. आर. पी. च्या जंगली वागणुकीचा परिणाम एवढाच झाला की दिनांक २५ ला संतापलेल्या हजारो लोकांनी सत्याग्रहात भाग घेतला. त्यादिवशीच्या सत्याग्रहात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला. महिलाही मागे राहिल्या नाहीत. ३ हजार लोकांना त्यादिवशी अटक झाली. शेवटी पोलीस व्यवस्थाच कोलमडून पडली. पोलिसांच्या विनंतीवरून दुपार नंतरच्या सत्याग्रही तुकड्या रद्द करण्यात आल्या!

नांदेड जिल्ह्यात विकासासाठी सुरू झालेल्या आंदोलनाचे पहिल्या टप्प्याचे हे दर्शन. आता मराठवाड्यातील इतर जिल्ह्याच्या हातात हात घालून नांदेड जिल्ह्याचे आंदोलन पुढे जाणार आहे ते यशप्राप्ती-शिवाय थांबणे केवळ अशक्य आहे. ☐ ☐

---

## मुखपृष्ठ

- प्रजावाणीचे संपादक श्री. सुधाकर डोईफोडे यांना पाठीवर झालेली मारहाण.
- समाजवादी पक्षाच्या नगरसेविका सौ. सावित्रीबाई काथवटे यांच्या नेतृत्वाखालील सत्याग्रही तुकडी.
- रेल रोको सत्याग्रहातील पहिली तुकडी. तुकडीत समाजवादी पक्षाचे सरदार सुंदरसिंग हुजूरिया, प्रा. नरहर कुरुंदकर, काँग्रेसचे पद्मश्री श्यामराव कदम, जनसंघाचे अॅड. चंद्रकांत मस्की, हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे सेनानी श्यामराव बोधनकर, नांदेड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. आर. डी. देशपांडे... इत्यादी.

# सोलकढी

## □ तल्यारखानांचा बॉबी

आम्ही बालगंधर्वांचे गाणे पाहिले-ऐकलेले नाही. आम्ही सी. के. ची फलंदाजी देखलेली नाही. आम्ही स्वातंत्र्य समरांतले मंतरलेले दिवस अनुभवलेले नाहीत. आम्ही विनगर्दीच्या गाड्यातून प्रवास केलेला नाही. आम्ही हंटले पामरची बिस्किटे खाल्लेली नाहीत. आम्ही हे केलेले नाही, आम्ही ते केलेले नाही याच लयीत आणखी एक गोष्ट सखेद सांगितली पाहिजे : आम्ही बॉबी तल्यारखानची क्रिकेट कॉमेंट्री ऐकलेली नाही.

आम्ही जे केलेले नाही ते वडील वयाच्या दुसऱ्या कोणीतरी केलेले असते आणि त्याबद्दल लाळ गाळत बोलून आमचा चोथा करण्याचा उद्योग वडीलधारी मंडळी तिरिमिरीने करीत असतात. अशा घातवेळी आपण खरोखर जितके लहान आहोत त्यापेक्षा अधिक लहान आहोत, असेच खरोखर वाटू लागते. असो.

बॉबी तल्यारखानच्या क्रिकेटकॉमेंट्रीबद्दल वडिलांनी किती बोलावे याला काही सुमार : त्याची विनामुदत अखंड बोलायची तयारी, त्याचे क्रिकेटविषयक सखोल ज्ञान, त्याची चित्रदर्शी शैली, त्याचे सख्त इंग्रजी आणि त्याचा बेभान करणारा आवाज-या सगळ्यामुळे बॉबी तल्यारखान हा कोणी अरेबियन नाइट्समधला एखादा इसम असावा अशी माझी समजूत झालेली होती. पुढे मला कळू लागले तोपर्यंत बॉबी तल्यारखानने क्रिकेट-समालोचन करायचे सोडून दिले होते. बेरी सर्वाधिकारी, देवराज पुरी, विजय मर्चंट, पियर्सन सुरिटा, अनंत सेटलवाड, राजू भारतन आणि अर्थात महाराजकुमार ऑफ विजयनगरम 'विझी' यांचे क्रिकेटसमालोचन आम्ही गेली काही वर्षे ऐकत आलो. आमच्याबरोबर हे ऐकायला वडीलमंडळी होतीच. हे ऐकताना त्यांना अखंड आपल्या लाडक्या 'बॉबी'ची आठवण यायची आणि हा हन्त हन्त म्हणत ते सुस्कारे ढाळायचे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे नेहमीच काही शक्य होत नसे.

काही वर्षांपूर्वी बॉबी तल्यारखान ऊर्फ 'ए. एफ्. एस्. टी.' 'द टाईम्स ऑफ इंडिया' या मातबर दैनिकातून क्रीडाविषयक एक सदर लिहू लागले. मी ते अधाशीपणे वाचू लागलो. त्यातला माहितीचा व्यापकपणा व बारकावा आणि स्वतःचे ठाम मत मांडण्यातली हिरिरी मोठी प्रेक्षणीय होती. साजुक-नाजुक, गुळगुळीत, निसरडे, तिळगुळ घ्या गोड बोला असले काहीही त्या सदरात नव्हते. मला जसे लिहावेसे वाटते, पण अंतर्बाह्य डरपोकपणामुळे जसे लिहिता येत नाही, तसे हा तल्यारखानांचा बॉबी बिनधास्त लिहीत होता. या इसमाला उत्तेजन द्यायचे मी ठरवले.

मग न चुकता त्यांची व्याख्याने ऐकायला लागलो. (दरम्यान 'टाईम्स'मधले ते सदर बंद पडले होते.) दहा पंधरा दिवसांमागे, दादरच्या अमरहिंद मंडळातल्या वसंत व्याख्यानमालेत 'भारतीय क्रिकेट' या विषयावर ते बोलले. झकास झणझणीत बोलले : हॉकी नावाचा एक आंतरराष्ट्रीय खेळ आहे याची माहिती पश्चिम महाराष्ट्राला दिसत नाही, क्रिकेटप्रेमाने मांडलेल्या तमाशामुळे त्या खेळाचे नुकसान होते आहे, गेल्या तीन कसोटीमालिकात आपल्याला विजय मिळाला त्यामुळे हुरळून जायची गरज नाही. कारण आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा दर्जा सध्या खालावलेलाच आहे, क्रिकेटच्या बोलत्या आणि लिहित्या समालोचकांना क्रिकेट जितके आणि जसे कळायला हवे तितके आणि तसे ते कळत नाही, फलंदाजीकडे आपण नको तेवढ्या कौतुकाने पाहतो, अजित वाडेकर हा प्रथम दर्जाचा फलंदाज बिलकुल नाही, शिवाय कर्णधार म्हणून तो सावध व कातडीबचाऊ आहे, सुनील गावस्कर हा स्वयंभू आघाडीफलंदाज मुळीच नाही, त्याचे तंत्र मधल्या फळीतल्या खेळाला अधिक अनुकूल आहे, आपण तर पहिल्यापासून आघाडीवरच खेळतो आहो असे त्याने म्हणणे बावळटपणाचे आहे, पतौडी एका डोळ्याने जशी फलंदाजी करतो तशी फलंदाजी करण्यासाठी बाकीच्या सर्व भारतीय खेळाडूंना सहा वेळा जन्म घ्यावा लागेल, कर्णधार म्हणून पतौडी आक्रमक होता, मात्र संघामध्ये तो काहीसा अलिप्तपणे वावरायचा, अशोक मांकड आघाडीवर जरूर जाऊ शकेल, त्याच्याजवळ भरपूर हिंमत आहे, भारतीय संघाचे क्षेत्ररक्षक बऱ्यापैकी आहे, सोलकर–आबिदअली–इंजिनियर असामान्य क्षेत्ररक्षक आहेत, आपल्याजवळ सध्या असलेला फिरकी मारा क्रिकेटच्या इतिहासातला सर्वांत प्रभावी फिरकी मारा आहे, इंग्लंडविरुद्धची येती कसोटीमालिका भारत हरण्याची शक्यता अधिक आहे,–अशी आपली शेलकी मते बॉबी तल्यारखानने शेलक्या शैलीत ऐकवली.

माझे एक मी पाहून ठेवले आहे. माझी मते आणि थोरामोठ्यांची मते यात पुष्कळच साम्य असते. बऱ्याच वेळा भेद एवढाच असतो की माझी मते माझी असतात आणि थोरामोठ्यांची मते त्यांची असतात. आद्य शंकराचार्य, भरतमुनी, कॉन्फ्यूशियस, ॲरिस्टॉटल, अब्राहम लिंकन, आइनस्टाईन, रसेल, हर्बर्ट मार्क्यूज, हेगेल, कान्ट, ना. ग. गोरे, लक्ष्मणशास्त्री जोशी, गोवर्धनदास पारिख, मोहन धारिया, ए. बी. शहा, नरहर कुरुंदकर, वि. म. दांडेकर, दादुमिया या अभ्यासू आणि निष्पक्षपाती विचारवंतांच्या मतांशी माझी मते जुळतात याबद्दल मला धन्यता वाटते.

बॉबी तल्यारखानचीसुद्धा बरीच मते माझ्या मतांशी जुळणारी होती. त्यामुळे ती मला विशेष रुचकर वाटली. त्याहीपेक्षा रुचकर वाटली ती व्याख्यानाच्या शेवटी त्याने सांगितलेली एक बातमी : त्या बातमीनुसार, बॉबी तल्यारखान आकाशवाणीवरून पुन्हा क्रिकेटसमालोचन करू लागणार आहेत. तसे झाले तर वडिलांनी जे केले आणि आम्ही स्वतःचे वडील नसल्यामुळे जे करू शकलो नव्हतो ते करायची नामी संधी आम्हाला उपलब्ध होईल.

तात्पर्य : 'बॉबी' दोन आहेत.
एक राजकपूरचा,
दुसरा तल्यारखानांचा.

—अनंतराव

# क्यूबासंबंधी अमेरिकन धोरणात बदल

वा. दा. रानडे

क्यूबासंबंधी अमेरिकेच्या धोरणात बदल होत असल्याची चिन्हे गेल्या काही दिवसातील घडामोडीवरून दिसत आहेत. क्यूबाशी व्यापारावर अमेरिकेने बंदी घातली आहे. हे निर्बंध अमेरिकन कंपन्यांना लागू आहेत. तसेच परदेशातील त्यांच्या उपकंपन्यांनाही लागू आहेत. खुद्द अमेरिकन कंपन्यांवरचे निर्बंध अजून कायम आहेत पण परदेशातील उपकंपन्यांवरचे निर्बंध उठविण्याची अमेरिकेची तयारी दिसते. अमेरिकन मोटार कंपन्यांच्या तीन उपकंपन्या अर्जेंटिनात आहेत. त्यांनी नुकताच क्यूबास चाळीस हजार मोटारी विकण्याचा करार केला. या करारासाठी अर्जेंटिनाचे सरकार बरेच दिवस धडपड करीत होते. हा करार झाला नाही तर अमेरिकेशी आम्ही राजकीय संबंध तोडू अशीही धमकी अर्जेंटिनाने दिली होती. कराराला परवानगी देण्यास अमेरिकन परराष्ट्र खाते अनुकूल होते. पण अध्यक्ष निक्सन यांचा विरोध होता. क्यूबावरील व्यापारी निर्बंध उठविण्यास एवढेच नव्हे तर फिडेल कॅस्ट्रो यांच्या राजवटीस विरोध करण्याच्या अमेरिकेच्या धोरणात बदल झाला आहे असे ज्यातून सूचित होईल असे काहीही करण्यास निक्सन यांची तयारी नव्हती. पण हा करार झाला त्यावरून निक्सन यांनी याबाबतीत आपला आग्रह सोडल्याचे दिसते.

अर्जेंटिनातील अमेरिकन उपकंपन्यांनी क्यूबास मोटारी विकण्याचा करार केला. त्याचे परराष्ट्र खात्यातर्फे असे समर्थन करण्यात येत आहे की परदेशातील अमेरिकन उपकंपन्यांनी त्या देशाचे धोरण व परिस्थितीनुसार व्यापारी करार करावे असे अमेरिकेचे सर्वसाधारण धोरण आहे. पण क्यूबाच्या बाबतीत या धोरणाचा सोईस्कर विसर अमेरिकेला आतापर्यंत पडला होता. क्यूबातील कॅस्ट्रोच्या राजवटीस अमेरिकन सरकारने जोरदार विरोध करावयाचा आणि परराष्ट्रातील अमेरिकन उपकंपन्यांनी मात्र क्यूबाशी व्यापारी करार करावयाचे या दोन धोरणात उघड विसंगती आहे. दुसऱ्या धोरणाने पहिल्या धोरणास हरताळ फासला जात आहे. परदेशातील अमेरिकन उपकंपन्यांनी क्यूबाशी व्यापार सुरू करणे ही अमेरिकेच्या क्यूबासंबंधीच्या धोरणातील बदलाची सुरवात आहे असेच म्हणावे लागेल. अर्थात धोरण एकदम बदलेल असे नाही. धोरण बदलल्याचे उघड दिसू न देता हा बदल अमेरिकेस घडवून आणावयाचा आहे. बाह्यतः कॅस्ट्रोविरोधाची भाषा त्यांनी चालू ठेवली असली तरी या विरोधाची धार बोथट झाली आहे.

दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे अमेरिकन राष्ट्रांच्या संघटनेत (ऑर्गनायझेशन ऑफ अमेरिकन स्टेट्स) क्यूबाला घेण्याबाबत सभासदराष्ट्रांचे मत अजमावण्याची सूचना त्या संघटनेने केली व तिला अमेरिकेने पाठिंबा दिला. आम्ही फक्त याबाबतीत प्रयत्न करण्यास पाठिंबा दिला. त्याचा अर्थ क्यूबाला अमेरिकन राष्ट्रांच्या संघटनेत घेण्यास अमेरिका पाठिंबा देईल असा नाही. आजच या प्रश्नावर संघटनेच्या सभासदांची मते घेतल्यास अमेरिका या निर्णयास विरोध करील हे परराष्ट्रखात्याने स्पष्ट केले आहे. पण याबाबतीत घाईने निर्णय घेतला जाणार नाही. अमेरिकन राष्ट्रांच्या संघटनेची बैठक पुढच्या वर्षाच्या मार्चमध्ये ब्यूनो आयरेस येथे भरणार आहे. तोपर्यंत म्हणजे अजून दहा महिने याबाबतीत प्रयत्न चालणार आहेत. चोवीस सभासद राष्ट्रांची मते अजमावण्यात येतील. निक्सन यांचे क्यूबाविरोधाचे धोरण तोपर्यंत बदलेल असे सूचित करण्यात येत आहे. आपण निक्सन यांना याबदलास तयार करू असे किसिंजर यांना वाटते.

क्यूबासंबंधी आमच्या धोरणात काहीही बदल झाला नाही असे अमेरिकन अधिकारी वरवर कितीही सांगोत अर्जेंटिनातील अमेरिकन उपकंपन्यांनी क्यूबाला मोटारी विकण्याचा केलेला करार म्हणजे बदलाची सुरवात आहे असेच मानण्यात येत आहे. अमेरिकन राष्ट्रांच्या संघटनेचे सर चिटणिसांनी असेच मत व्यक्त केले. ते म्हणाले, "अमेरिका क्यूबाशी व्यापारावरील बंदी उठवू इच्छित आहे. याची हा व्यापारी करार म्हणजे एक खूण आहे. असा त्याचा अर्थ मी लावतो."

क्यूबासंबंधीचे धोरण अमेरिका का बदलीत आहे? क्यूबातील कम्युनिस्ट क्रांतीची लाट दक्षिण अमेरिकेतील इतर राष्ट्रात पसरेल अशी अमेरिकेला सुरुवातीस भीती वाटत होती. बोलिव्हियात क्रांतीचा अयशस्वी प्रयत्न झाला. चिलीमध्ये घटनात्मक व लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणण्याचा प्रयत्न मार्क्सवादी अध्यक्ष आयेंडे यांनी केला पण गेल्यावर्षीच्या सप्टेंबरात अमेरिकेच्या पाठिंब्याने झालेल्या लष्करी क्रांतीने तोही प्रयोग फसला. आता दक्षिण अमेरिकेत कम्युनिझम फैलावण्याची भीती अमेरिकेला वाटत नाही. रशिया व चीन या दोन बड्या कम्युनिस्ट राष्ट्रांशी अमेरिकेने संबंध सुधारले. क्यूबात क्षेपणास्त्रांचे तळ न उभारण्याचे आश्वासन रशियाकडून घेतले. या बदलत्या परिस्थितीमुळेच क्यूबासंबंधी अमेरिकेचे धोरण हळूहळू बदलत आहे. □□

# दर्डा आणि 'लोकमत'

◻ ६ एप्रिलचा 'माणूस' पोहोचला. निम्मा अधिक वाचूनही झाला. एमील झोलाचे शब्दचित्र अप्रतिम आहे. यापूर्वीही 'माणूस'ने अशा कितीतरी लेखकांची देशीय व परदेशीय चरित्रे प्रसिद्धून आपले वैशिष्ट्य कायम ठेवले आहे. शतपावली हे सदर याकरता आकर्षक वाटे. सौ. सुमतीबाई देवस्थळे यांचीही लेखनपद्धती अत्यंत आकर्षक झाली आहे....

'जवाहरलाल दर्डा' प्रकरणामुळे तुम्ही केस ओढवून घेतली आहे. अशी अनेक प्रकरणे उघडकीस आणून आपण जनतेला जो सदैव सावधानतेचा इशारा देत आलात व शासकीय भ्रष्टाचाराचे स्वरूप उघड करीत आलात याबद्दल सदैव आपले ऋणीच राहिले पाहिजे. सध्याइतका भ्रष्टाचार, शासकीय पैसेखावूपणा, उधळपट्टी यापूर्वी कधीच प्रत्ययाला आली नाही. शासकीय दडपणाला न जुमानता मुक्या जनतेची कुचंबणा तुमच्यासारखे संपादक वेशीवर टांगीत आहेत हाच एक आशेचा किरण.

दर्डा प्रकरण व त्यातील उपप्रकरण यामुळे 'माणूस'ला बरीच तोशीस सहन करावी लागणार आहे. प्रकरण कोर्टात गेलेच तर आपण छातीठोकपणे ते लढणारच. दर्डांच्या मागे वसंतराव नाईकांसारखा एक सत्ताधारी संरक्षक उभा आहे. आजची कोर्टे कितपत न्यायरक्षक राहतील हे सांगता येणार नाही. तेव्हा खर्च होऊनही अपयश पदरी घ्यावेही लागेल. पण अशा वेळी तुमच्या वाचक वर्गाने सहाय्यास तयार व्हावयास पाहिजे.

वेळ आलीच तर मी आपली फूल ना फुलाची पाकळी निधीत टाकीन हे आश्वासन.

६–४–७४ डॉ. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, सातारा

◻ 'माणूस' वाचला. दर्डा प्रकरणाविषयी आपण वाचकांचे मनोगत मागितले. माणूस, साधना, मागोवा विषयी आम्ही नवी आशा बाळगून आहोत. 'माणूस' माजगावकरांचा राहिला नसून तो प्रत्येक माणसाचा बनला आहे. तो पिळल्या जाणाऱ्या कामगारांचा आहे. तो अन्यायाने पछाडलेल्या दलितांचा आहे. तो शहाद्यातल्या अदिवासी राजांचा आहे. एवढी शक्ती माणूसच्या पाठीशी असल्यावर या दीडदमडीच्या पुंजीपती व भ्रष्टाचारी अधिपतींची का भीती असावी? माणूसने शहाद्याचा आदिवासी राजा जागा केला ही ऐतिहासिक कामगिरी होय. उभ्या महाराष्ट्राला आज या चळवळीची ओळख करून दिली. उभ्या महाराष्ट्रातला शोषित, पीडित, दलित, श्रमिक आपल्या पाठीशी राहील. आमचा 'स्थंडिल' आहेच. आगे बढो 'हर जोर जुलमकी टक्करमें संघर्ष हमारा नारा है!' शेवटी पुन्हा सांगतो माणूस एकटा नाही. बाबा आमटेंच्या भाषेत–

समंदरमें उठता भवंदर। उसे कहा जाता तूफान।
तूफानसे जो टक्करता। उसे कहा जाता इन्सान।

६–४–७४ गो. पी. लांडगे, धुळे

◻ आपला दि. ६।४ च्या अंकातील 'दर्डाजी आता माघार घेऊ नका' हा संपादकीय लेख वाचला. आपण भ्रष्टाचारविरोधी आघाडी उघडलीच आहे. लक्ष वेधून गोलंदाजी चालूच आहे. गोलंदाजी नुसतीच फुसकी नाही तर तिच्यात दम आहे. तेव्हा सावज नुसतेच घायाळ होणार नाही. तर चांगलीच दमछाक होईल. सध्यातरी परिस्थिती अशी आहे की घट्ट चामडीची डुकरे बरीच आहेत. तेव्हा जरा दमाने घ्यावे लागेल. आपण वाचकांना मंच लांबरूंद व विस्तृत करण्याचे आवाहन केलेत. आपला वाचकवर्ग प्रवाहाबरोबर वाहाणाऱ्यापैकी नाही, त्याची एक ठराविक भूमिका आहे व जोपर्यंत माणूस ही भूमिका निधड्या छातीने रोखठोक मांडीत आहे तोपर्यंत नुसताच सक्रीय पाठिंबा नाही तर आघाडीवरील एक सैनिक म्हणून काम करण्याची प्रत्येक वाचकाची तयारी राहील ह्या विषयी आपण निर्धास्त असावे.

दर्डाचे आव्हान माणूसने स्वीकारले आहे! तेव्हा आता कितीही उपआव्हाने आली तरी ती स्वीकारलीच पाहिजेत. व एकदा असा दणका दिला पाहिजे की असली चिल्लर चाल्लर उपआव्हाने देण्याचे कोणी मनात आणू नये. माणूसची एवढी जरब बसली पाहिजे. लेख वाचल्यानंतर मनात आलेले विचार मनमोकळे पणाने लिहिले आहेत. मी माणूसचा सुरुवातीपासूनचा वाचक व ग्राहक आहे व माणूसच्या घरापैकी एक अशी भावना आहे.

आगे बढो! आता माघार नाही. माघार तर सोडाच, मागेसुद्धा पहाणे नकोच. पिछाडी बळकट आहे हा विश्वास ठेवा व नेटाने जोमाने पुढे व्हा.

११–४–७४ रा. धों. सहस्रबुद्धे, नागपूर

◻ आजच्या सर्व वृत्तपत्रांत आपणांस दर्डा यांनी नोटीस दिली आहे असा मजकूर प्रसिद्ध झाला आहे. 'माणूस' विरुद्ध दर्डा या प्रकरणात माणूसचा विजय झाला पाहिजे असे मला वाटते. यवतमाळ हे माझे गाव आहे. मी स्वतः तेथे जाऊन आपणास कोर्टात सादर करण्याकरिता पुरावे आणून देण्यास तयार आहे. आपणास माझे सहकार्य हवे असल्यास आपण मला कळवावे. कळावे.

२६–४–७४ × × मुळे, मुंबई

◻ आपण दि. ६–४–७४ च्या माणूसच्या अंकात श्री. दर्डाजींचे

आव्हान स्वीकारल्याचे वाचले. हार्दिक अभिनंदन. उपआव्हाने शक्य तो टाळावी.

८-४-७४ भा. गो. अंतुरकर, औरंगाबाद

¤ जवाहरलाल दर्डा यांचे आव्हान स्वीकारल्याबद्दल आपले अभिनंदन! खरे म्हणजे ज्यावेळी दर्डांनी नोटीस दिली त्याचवेळी हे आव्हान ठामपणे स्वीकारा म्हणून विनंती करणारे पत्र आम्ही पाठवणार होतो. श्री. बी. जी. यादव यांनाही दर्डा यांनीच पुढे केले असणार. माणूसच्या मागे अशा प्रकारे अनेक भानगडी लावून आपणास हैराण करण्याचा दर्डाजींचा हेतू दिसतो. शिवाय हे प्रकरण कोर्टात गेल्यामुळे विधानसभेत, वृत्तपत्रातून आणि जाहीरपणे दर्डांच्या भानगडी विषयी होणारी चर्चा थांबेल असा दर्डांचा कयास असावा.

आज समाजात असे अनेक दर्डा आहेत. त्यांनी भ्रष्टाचाराने संपूर्ण समाज त्रासवून टाकला आहे. ही माणसे म्हणजे समाजवृक्षावर पोसली जाणारी बांडगुळे आहेत. आंब्याच्या झाडावर बांडगुळ वाढले म्हणजे ते ज्या झाडावर पोसते त्या आंब्याच्या झाडालाच ते वठवून टाकते. त्याचप्रमाणे समाजवृक्षांवर पोसली जाणारी ही बांडगुळे समाजाच्या नाशाला कारणीभूत होतात. याचे समूळ उच्चाटन करणे हाच यावर उपाय आहे.

आज माणूसने हे भ्रष्टाचार उच्चाटनाचे कार्य घेतले ते फार अवघड आहे. त्यासाठी तुमच्यावर अनेक दडपणे येतील. आर्थिक व शारिरिक त्रासही सहन करावा लागेल परंतु आता ह्या रणांगणातून तुम्ही माघार घेऊ नका. लढाईला आता सुरुवात झाली आहे. देशातील तरुण जागा होत आहे. तो आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. आर्थिक व सामाजिक परिवर्तनासाठी आम्ही सुशिक्षित तरुणांनी महाराष्ट्र युवकदल नावाची संघटना स्थापन केली आहे. या संघटनेतील आम्ही सारे तरुण तुमच्या पाठीशी उभे राहू. कोर्टातील केससाठी जर आपणास आर्थिक अडचण आली तर आम्ही वर्गणी गोळा करून तुम्हाला आर्थिक सहाय्य करू. तुम्ही आम्हाला तसे जरूर कळवा. परंतु या लढ्यातून आता माघार घेऊ नका. एकदा पुढे टाकलेले पाऊल आता मागे न घेता पुढेच पडावयास हवे.

१५-४-७४ वसंतराव पवार, सुरेश डेरे,
महाराष्ट्र युवक दल, मुंबई.

¤ श्री. जवाहरलाल दर्डा यांनी आपणावर फिर्याद केली आहे असे कळते. आपणास ठाऊकच आहे की फायनान्स सोसायटीतील ज्या अनेक भ्रष्टाचाराबाबत अफवा पसरल्या आहेत त्या संबंधात चौकशी करण्याकरिता मुंबईच्या समाजवादी पक्षाने एक समिती नेमली आहे. त्याचा एक सदस्य म्हणून समितीतर्फे मी आपणास जी काही शक्य होईल ती मदत अवश्य करीन. सध्या बोकाळलेल्या भ्रष्टाचार विरोधी लढणाऱ्यास आमचे सहाय्य नेहमीच राहील. आमच्या आपणास हार्दिक शुभेच्छा. कळावे. दिनकर ज. गुप्ते, मुंबई २८

¤ माणूसने दर्डा यांचे आव्हान स्वीकारले त्यामुळे विशेषत: आमच्या यवतमाळ जिल्ह्यातील जागृत लोकांना फार आनंद झाला. या भागातून माणूसच्या पाठीमागे पाठबळ उभे करणे हे आमचे कर्तव्य आहे. ते कर्तव्य आम्ही पार पाडू.

स्वत: दर्डा प्रकरण हेच भ्रष्ट शासनाचे उपप्रकरण आहे. अशी जी काही प्रकरणे-उपप्रकरणे असतील त्यांचा सामना करणे भागच आहे.

या जिल्ह्यातील विधान परिषदेवरचे दुसरे राज्यपाल नियुक्त सभासद यांचे प्रकरण हेही दर्डा प्रकरणाची लहान आवृत्तीच आहे, त्याची माहिती लवकरच आपणाकडे येईल. आपणास जी काही मदत लागेल ती हक्काने मागावी.

९।४।७४ अॅड. आर. ए. देशमुख, पुसद

¤ मास्टर जवाहरलाल दर्डांबद्दल काय निर्णय घेता यासाठी माणूसची फार वाट पाहात होतो. अपेक्षित निर्णय घेतल्याबद्दल आनंद झाला. आगे बढो! आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. तुम्ही आवाहन करताच मी आपणास अल्पशी मदत सुद्धा करीन. तेव्हा ११ रु. कुठे पाठवू बोला. अर्थात मदत फारच अल्प आहे म्हणून वाईट वाटते. द्यायची फार इच्छा आहे पण इलाज नाही. मात्र तशीच तयारी असल्याशिवाय उपप्रकरणांकडे लक्ष देऊ नये असे वाटते. मात्र १ रु. किंमत फार वाटते कागद टंचाई असेतो चित्रवार्ता पुरवणी बंद ठेवावी. अधिक काय लिहू. माणूसची अशीच भरभराट व्हावी. कळावे.

मनोहर लेले, भाईंदर

¤ दि. ६ एप्रिलचा अंक पाहिला, संपादकीय वाचले. पुढील अंक वाचण्याआधीच हे पत्र लिहीत आहे.

'माणूस'ने उघडलेल्या भ्रष्टाचारविरोधी मंचाला सामान्य माणसाचा निश्चित पाठिंबा आहे. झुंबरलाल भरूट यांनी दर्डाजींना उघडे करण्याचा केलेला स्तुत्य उपक्रम आपण प्रसिद्धी देऊन पूर्णत्वाला नेलेला आहे. राजकीय डावपेचाचा एक भाग म्हणून दर्डाजी आता कोर्टात गेलेले आहेत. विधान परिषदेत फोडलेली आव्हानाची डरकाळी माणूसद्वारा न्यायालयात नेली आहे. अजून जॉर्ज फर्नांडिस यांच्यावर खटला भरावा लागणार आहे. कारण त्यांनीही उघडपणे रस्त्यावर दर्डाजींच्या काळ्या कारकिर्दीचा पाढा वाचलेला आहे. सत्तास्थानी असलेली मंडळी दोन प्रकारे खेळतात. एक निर्लज्जपणा पत्करून कुणाच्यातरी आश्रयाने मूग गिळून गप्प बसणे किंवा अब्रू झाकण्यासाठी न्यायालयात जाऊन कालकाढूपणा करणे. पैकी दुसरा मार्ग दर्डांनी स्वीकारलाय. निष्कलंक चारित्र्याची माणसं सत्तास्थानांचा राजीनामा देऊन न्यायालयात गेली असती पण यांना न्याय नको वेळ काढून सत्ता भोगायची आहे. म्हणून हा कालापव्यय. त्याचबरोबरची उपआव्हाने हाही राजकीय डावपेच आहे. जरूर स्वीकारा, जनतेच्या रेट्यावर त्याला कसे उत्तर द्यावयाचे हे वेळ आल्यावर दिसेलच.

हा लढा जनतेचा आहे. जनता ह्या कोर्टखर्चासाठी आपल्या घामाचा पैसा पैसा गोळा करून जनतानिधी उभारील. कारण या सत्तेला आणि देशाला लागलेली ही भ्रष्टाचाराची कीड एवढी जबरदस्त आहे की हा देश वृक्ष केव्हा उन्मळेल याचा भरवसा राहिलेला नाही. याला जनतेच्या वतीने, पाठिंब्याने जर या क्षणी आवर घातला नाही तर उन्मळण्याचा दिवस या देशाच्या इतिहासात

'काळा दिवस' ठरल्याशिवाय राहणार नाही. आपल्या ह्या कार्यास सुयश चिंतितो.

७।४।७४ रावसाहेब पवार, सासवड

¤ अभिनंदन । शतशः अभिनंदन.
दर्डा प्रकरणी आपले कोणत्या शब्दात अभिनंदन करावे ! शब्दच नाहीत. दर्डाजी तुम्हाला माफी मागायला लावणार ? माफी कशासाठी ? स्वतः वाटेल तो भ्रष्टाचार करावयाचा ! सत्ता आणि संपत्ती मिळवून आपल्यावर आरोप करणाऱ्यांवर दडपशाही करावयाची! करू द्या. ही 'जनावरे' अशीच विषारी असतात. त्याला 'माणूस' कधीच मान तुकवीत नसतो. अशा लांडग्याच्या प्रवृत्तीच्या माणसांची जर माफी मागितली तर आपल्या समाजातील मेंढरांची उरली सुरली अस्मिता जळून जाईल. दै. लोकमतमधील 'माणूसला' नोटीस देण्याबाबतची बातमी मागे ज्या वेळेस मी वाचली त्याचवेळेस माणूस वाकणार नाही, कधीच वाकणार नाही असा मला आत्मविश्वास होता.

नोटीस वगैरे पाठविण्यापेक्षा आणि असे जळण्यापेक्षा यांनी आपण ही कोट्यवधी रुपयांची संपत्ती कशी मिळविली याचेच जर विवरण दिले असते तर ? पण ही कोट्यवधी रुपयांची संपत्ती काही घामाच्या पैशाची नाही. दर्डा उद्यानातला यांचा राजमहाल पाहूनच 'इंद्रलोक' कसा असेल याची कल्पना करता येते. चंद्रलोक, सूर्यलोक, अनेक बंगले, लोकमत कोणाच्या पैशाचे आहेत ? जनतेच्या. पण भ्याड जनता यांचा सत्कार करते ! अगदी अमोलकचंद महाविद्यालयातील प्रोफेसरसुद्धा. हे आंतरराष्ट्रीय उपाध्यक्षपदी जेव्हा निवडून आले तेव्हा याचे स्वागत अमोलकचंद महाविद्यालयातील अनेक बुद्धिवादी (?) प्राध्यापकांनी केले आहे. चीड येते. विशाद वाटतो. आणि म्हणून याच पार्श्वभूमीवर आपण ताठ आहोत याचा अभिमान वाटतो.

हा माणूस कोणत्याच सार्वजनिक निवडणूकीतून निवडून येत नाही. अगदी लोहाऱ्याच्या (यवतमाळ जवळील) ग्रामपंचायतीमध्येसुद्धा याचा पराभव झाला. सामान्य माणसांनी याला फेकून दिले असतानासुद्धा वसंतराव नाईक याला कसे जवळ करतात, हे कोडे आहे की समसमा संयोग ? वसंतरावांचीसुद्धा खूप मालमत्ता असल्याचे पुढे मागे जनतेच्या वाचनात येईलच.

झुंबरलाल भरुट यांचेसुद्धा अभिनंदन केले पाहिजे.दर्डांचा भ्रष्टाचार यापूर्वी दोन स्थानिक साप्ताहिकातूनसुद्धा सविस्तर प्रकाशित झाला होता. फॉरवर्ड ब्लॉकच्या कोणत्याही वक्त्याच्या तोंडून याला भरमसाठ शिव्या मिळाल्या नाहीत असे एकही भाषण नसेल. तूर्त एवढेच. आगे बढो. आम्ही तुमच्या सोबत आहोत.

८।४।७४ पंढरीनाथ चोपडे, बोरीसिंह (यवतमाळ)

¤ काल नागपूरला रेल्वे स्टेशनात शिरलो आणि अंक (६-४-७४चा) विकत घेतला. चांद्याला गाडीने येईपर्यंत समग्र अंक वाचून झाला. त्यातल्या त्यात आपले संपादकीय वाचून तर थक्क झालो ! दर्डांसारख्या प्रतिष्ठित (?) धेंडाला साफ लोळविण्याकरिता आपले हे पाऊल निःसंशय स्वागतार्ह आहे. मनःपूर्वक अभिनंदन ! माणूसने आतापर्यंत केलेल्या समग्र चळवळीचे हे एक खंबीर दर्शन आहे. खरे तर दर्डांची मृत्यूघंटा माणूस मधून आपण ७/८ महिन्यापूर्वीच वाजविली आहे. दर्डांना नोटीस द्यायचीच होती तर ती केव्हाच द्यायला पाहिजे होती. पण सत्तेवरील माणसांची कातडी कशी गेंड्यासारखी असते.... नुसती कातडीच नाही तर डोळे आणि कान सुद्धा, याचा प्रत्यय दर्डाजींकडे पाहून आला. माणूसला नोटीस देऊन दर्डांनी आपला मृत्यू आता अगदी काठावर आणून ठेवलेला आहे. आता फक्त दोर तेवढा ओढावयाचा आहे.

संपादक महाशय, आपले हे लोकोत्तर धैर्य पाहून मन थक्क होते. आम्ही आपल्या पाठीशी आहोत. दर्डांच्या या आव्हानाचा स्वीकार माणूसने केलाच आहे. बघू या आता दर्डा किती टिकाव धरतात ते. आम्ही तरुण या सर्व प्रकरणात खंबीरपणे माणूसच्या मागे उभे आहोत. माणूसने ही आघाडी आहे अशीच किंवा त्यापेक्षा जास्त गतीने लढवावी. अनिल वर्दे प्रकरण आम्ही अद्याप विसरलो नाही. त्याचसारखा याही प्रकरणात आवश्यक असल्यास माणूसचा समग्र वाचकवर्ग आपल्यामागे उभा राहील एवढे निःसंशय.

यादवांसारख्या माणसांचे दुय्यम आव्हानही माणूसने जरूर स्वीकारावे. पण दर्डांच्या या एकूण प्रकरणाला आलेली गती कमी होऊ नये ही काळजी घेऊन. ही आघाडी अशीच सदैव गाजत-गर्जत राहावयाला हवी.

त्यासाठी आपण हवे तर आम्हाला आवाहन करा ! समग्र वाचक आणि दर्डांसारख्या माणसांनी सामाजिक जीवनातून निवृत्त झालेच पाहिजे असे ज्यांना वाटते असे सर्व नागरिक-तरुण-विद्यार्थी याकामी आपणाला सक्रीय सहाय्य करतील याची मला खात्री आहे. यासाठी योग्य तो पुढाकार घ्यायचीही माझी तयारी आहे.

'दर्डाजी आता माघार घेऊ नका' हे संपादकीय लिहून आपण पुन्हा एकदा माणूसचा वेगळेपणा गर्जून सांगितला आहे. आपले मनःपूर्वक अभिनंदन. आणि आपल्या द्रष्ट्या संपादनाला धन्यवाद !

९-४-७४ प्रवीण सात्त्विक, वरोरा (चांदा)

¤ आपण 'माणूस'मधून जवाहरलाल दर्डासारख्या मातब्बर नि मान्यवर अशा बड्या प्रस्थावर बाँब टाकल्यामुळे सर्व काँग्रेसजन अगदी हादरून गेले आहेत. कदाचित ह्या प्रकरणातून अनेक कुलंगडी नी लफडी बाहेर येण्याचा संभव आहे. व त्यामुळे अनेकांच्या तोंडाला डांबर फासले जाण्याचा योग संभवतो. अर्थातच अनेकांना सुखाची झोपही येत नसेल. यादवांसारखे दर्डाजींचे पाठीराखे आता जागे झाले आहेत त्याचेही कारण बहुधा हेच असावे.

दर्डाजींच्या नोटिशीला आपण माणूसमधून जे निर्भीड नि रामशास्त्री बाण्याचे उत्तर दिले आहे त्याबद्दल आम्ही व आमच्यासारखे अनेक वाचक आपले हार्दिक अभिनंदन करतील यात शंका नाही. आपले मर्दानी निवेदन वाचून आम्ही अगदी खूश झालो आहोत. भ्रष्टाचार विरोधी लढ्यात अंतिम विजय आपलाच आहे.

भाऊसाहेब झाडबुके नि आता दर्डाजी यासारख्या समाजात मानाचे स्थान प्राप्त झालेल्या व्यक्तींवर आपल्या लेखणीने हल्ला चढवून माणूसने आपला आगळा पराक्रम दाखविला आहे. जनता माणूसच्या ह्या निर्भीड धोरणाचे कौतुक करील यात संदेह नाही.

माणूसची शान अशीच कायम राहो व त्याबरोबरच माणूसची मान पण ताठ राहो हीच आमची इच्छा आहे. आपल्या स्वार्थासाठी समाजात भ्रष्टाचाराचे बीष पेरणाऱ्या समाजकंटकांविरूद्ध आपण आघाडी उघडली आहे त्या आघाडीला आमचा सदैव पाठिंबा राहील. एवढेच/या प्रसंगी आपणाला सांगावेसे वाटले. जयहिंद.

१०।४।७४ वसंत महाजन, नागपूर

¤ दि. ६ एप्रिलच्या अंकातील दर्डा प्रकरणावरील निवेदन वाचले व मन अभिमानाने भरून आले. आपल्यासारखे निर्भिड पत्रकार अगदी अपवादापुरतेच का होईना पण आहेत याचा आनंद वाटतो. तुमचा लढाऊ पवित्रा अतुलनीय. ब्रेव्हो. उपप्रकरणही धसास लावा. पैशाची अडचण असल्यास मराठी प्रेमीजनतेला व (माणूसच्या वाचकांना) एक हाक द्या व हिरीरीने केस लढवा. जय निश्चित तुमचाच होईल. असो.

आजचा 'लोकमत' सहज उघडला. अग्रलेखावर पुढील विचार होता.

'आपण जे लिहितो किंवा बोलतो त्याची अचूकता ही सत्याची पहिली शर्त होय. अचूकपणाचा अभाव म्हणजे असत्याचा नातलगच होय !'

लोकमतसारख्या वर्तमानपत्रात नव्हे असत्य पत्रात अशी वचने आढळणे म्हणजे त्या वचनांचा घोर अपमान होय.आणि ह्या अपमानाचा बदला घेण्यासाठी माझ्या सारखे अनेक वाचक तुमच्या पाठीशी तन, मन, व वेळप्रसंगी धनही देण्यास तयार आहेत, हे विसरू नका.

सर्व प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा आपण विदर्भातील जनतेकडून केल्यास त्यात वावगे काही नाही. पत्राच्या ओबडधोबड भाषेचा (आणि अक्षराचाही) राग मानू नये.

१०–४–७४ कु. सुप्रिया पुंडलीक, अचलपूर

¤ दर्डांच्या भ्रष्टाचार प्रकरणावर प्रकाश पाडला तो प्रथम माणूसनेच याबद्दल संपादकांना धन्यवाद.

काही झालं तरी आता माघार नाही. आजच्या ह्या भ्रष्टाचार विरोधी कार्यात माणूस आघाडीवर असल्याचे दिसून येते. और आगे बढो ! आम्ही आपल्या पाठीशी आहोत. केस होवो, नाहीतर प्रकरण हायकोर्टात अगर सुप्रीम कोर्टात जावो. आपल्या ह्या समाज कार्यात जनता आपल्या पाठीशी आहे. आजच्या ह्या समाजात असे किती तरी दर्डा असतील ! त्यावर एकामागून एक प्रहार करावयास 'धार' अशीच प्रखर राहो.

११–४–७४ के. विजय अंबाडे, दिलीप पंडीत व इतर सहकारी पुणे–३०

# आभार !

¤ आपला ६–४–७४ चा माणूस वाचला. व त्यातील संपादकीय वाचून पत्र लिहीत आहे.

मी आपल्या मासिक–द्विसाप्ताहिक–साप्ताहिक यांचा १९६१ पासून वाचक व चाहता आहे. आपण 'माणूस'कीच्या विविध छटा ज्या दर्शविता त्या मला आवडतात. असो.

दर्डा प्रकरणावरून मला एक सुचवावेसे वाटते. माणूसने एक भ्रष्टाचार निर्मूलन फंड उभारून त्यातून अशी प्रकरणे उघडकीला आणावीत. त्यासाठी लागणारा पैसा 'माणूस'ने खर्च न करता फंडातून घ्यावा. तरी या योजनेचा कृपया विचार करावा. या फंडासाठी माझ्या कुवतीनुसार फुलाची पाकळी म्हणून रु. १० चा चेक पाठवीत आहे. फंड उभारायचा ठरल्यास व मी पहिला देणारा ठरल्यास धन्य समजेन. र द. भिडे, पुणे.

चेकबद्दल मनःपूर्वक आभार

पण आपला चेक तूर्त परत पाठवित आहे. दर्डा किंवा तत्सम प्रकरणे किती पुढे सरकतात ते काही दिवस प्रथम पाहावे आणि मग आवाहन करावे अशी यामागची कल्पना आहे. जोवर माणूसला हा आर्थिक बोजा सहन होईल तोवर इतरांना शक्यतो त्रास नको असे वाटत असले तर ते चूक आहे असे आपणही म्हणणार नाही. अगदीच जेव्हा अशक्य होईल तेव्हा जनता निधीचा पर्याय स्वीकारावाच लागेल हे उघड आहे. त्यावेळी आपला चेक आठवणीने परत मागवून घेऊ हे निश्चित.—संपादक

□

□ दर्डाप्रकरणात 'माणूस'ला सहानुभूती दाखवणारी व प्रत्यक्ष मदत देऊ करणारी शेकडो पत्रे आली अजूनही येत आहेत. यापैकी काही वर उद्धृत केली आहेत. या सर्व पत्र लेखकांचे मनःपूर्वक आभार. या सर्व मित्रमंडळींनी देऊ केलेली मदत, केलेल्या सूचना वेळ येताच अवश्य विचारात घेतल्या जातील. एवढा खुलासा तूर्त पुरे आहे. असा सार्वजनिक पाठिंबा लाभला तर 'माणूस'ची भ्रष्टाचारविरोधी आघाडी जोरदार राहील हे वेगळे सांगायला हवे असे नाही. याच अंकात नासिक–सटाणा भागातील एका भ्रष्टाचार केंद्राची माहिती उजेडात आणली आहेच. –संपादक

# वसंतराव दगाजी पाटील

## नासिक–सटाणा भागातील एक भ्रष्टाचार केंद्र

रघुवीर मुळे

गेल्या वर्षभरात 'माणूस' मधून नासिकची जवळ जवळ दहा-अकरा वार्तापत्रे प्रसिद्ध झाली. त्यातील प्रत्येक वार्तापत्राचा विषय हा जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होता. विषयांना वाचा फुटताच त्यावर सरकार दरबारी तातडीने कार्यवाही झाली आणि 'माणूस'ची दखल सरकारलाही घ्यावी लागली. या प्रकरणांपैकी काहींचा येथे ओझरता उल्लेख देतो. माजी उपमंत्री श्री. व्यंकटराव हिरे यांचे महात्मा गांधी विद्यामंदीर. गेल्या बऱ्याच वर्षापासून अनैच्छिक देणग्या स्वीकारून विद्यार्थ्यांचा छळवाद हिऱ्यांनी मांडला होता. 'माणूस'ने हा प्रश्न धसास लावला. डॉ. कुमार सप्तर्षी हा धागा पकडून मालेगावी आले. विद्यार्थी आंदोलनाला धार आली आणि जवळ जवळ सव्वा लाखाची अनैच्छिक देणग्यांची रक्कम गरीब, आदिवासी विद्यार्थ्यांना सरकारने संस्थेच्या अनुदानातून कापून घेऊन परत केली.

नासिक जिल्हा कांदा निर्जलीकरण कारखान्याचे प्रकरण. शेतकऱ्यांच्या चौतीस लाख रुपयांचा नव्हे तर जीवन-मरणाचा प्रश्न होता. हाही विषय 'माणूस'ने हाताळला. सहा वर्षे भिजत पडलेले घोंगडे झुगारण्याची ताकद एकवटणे अशक्य होते. कारण या गोंधळाचे मागे जबरदस्त पुढारी होते. अखेरी 'माणूस'ने वाचा फोडली. सरकारने हा प्रकल्प ताब्यात घेतला. पांढरा कांदा लावण्यास उत्तेजन देण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. लवकरच तांत्रिक बाबी पूर्ण होऊन उत्पादनास सुरुवात होईल (मात्र माझ्यावर अब्रू नुकसानीचे जे खटले नासिक कोर्टात दाखल आहेत ते तारखा घेत घेत चालूच आहेत.)

'वनवासातील शारदा' या लेखाचाही परिणाम चांगलाच झाला. चांदवड येथील गुरुकुलाचा कारभार प्रस्थापित धेंडांना झुगारून तरुण तुर्कांनी ताब्यात घेतला तर शारदा विद्याप्रसारक मंडळ (नासिक रोड) येथील शिक्षकांना तेवीस महिन्यापर्यंतचे थकलेले पगार मिळाले आणि संस्था 'रिसिव्हर'कडे सुपूर्त करण्यात आली.

न्यू दिंडोरी सहकारी खरेदी विक्री संघातील यूरिया-चोरी 'माणूस'नेच तपशीलवार पकडून दिली. महाराष्ट्र सरकारने या संघाचा खतविक्री परवाना काढून घेतला. अशा अनेक चांगल्या घटना वार्तापत्रामुळे घडल्या असे माझे एकट्याचे मत नाही तर अनेकांचे आहे.

आजच्या वार्तापत्राचा विषय आहे जिल्हा सहकारी जमीन विकास बँक. महाराष्ट्र सरकारने या बँकांच्या गलथान व उधळपट्टीच्या कारभाराला कंटाळून त्या बँकांचे एक मे ७३ पासून विलिनीकरण केले आहे. मात्र विलिनीकरणानंतरही या बँकेतील गैरकारभार थांबलेले नाहीत.

एक मे ७३ पासून जिल्हा पातळीवरील बँका या महाराष्ट्र राज्य सहकारी जमीन विकास बँकेच्या शाखा म्हणून काम करू लागल्या. जिल्हा पातळीवरील सभासद नियुक्त संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले. राज्य पातळीवर (शिखर बँकेत) जवळ जवळ तेहेतीस संचालकांचा समावेश असलेले एक सरकारनियुक्त कारभारी-मंडळ अधिकारावर आले.

जमीन विकास सहकारी बँकांचा हेतू त्या नावातच दिलेला आहे. जमीन विकासासाठी ज्या ज्या गोष्टींची, साधनांची शेतकऱ्यांना गरज आहे त्यांचा पुरवठा करणे. त्या बदल्यात पैशांची परतफेड होईपावेतो त्या शेतकऱ्यांची जमीन 'गहाण' करून घेणे. समाजवादी सरकारचेच हे गहाण-खताचे धोरण आहे. या बँकेचे नाव पूर्वी राज्यभर लँड मॉर्गेज बँक असे होते. समाजवादाचे नारे लावण्यास सुरुवात झाल्यावर नावात फक्त बदल झाला. लँड 'मार्गेज' बँके-ऐवजी लँड 'डेव्हलपमेंट' बँक झाली. गहाण खताची 'सरकारी सावकारी' मात्र बदलण्यात आली नाही. आता सरकारकडे शेती-उपयुक्त साधनसामुग्री पुरविण्याची जबाबदारी असली तरी इलेक्ट्रिक मोटर्स किंवा ऑईल इंजिन्सची एजन्सी नव्हती. साहाजिकच ज्यांच्याकडे एजन्सीस आहेत त्यांचे हितसंबंध वाढले. मग नावापुरती अलिप्तता राखून ह्या मंडळींनी बँका ताब्यात घेतल्या व लाखो रुपयांचे व्यवहार केले. त्यात कुठलाही धरबंद ठेवण्यात आला नाही. शेतात उभ्या असलेल्या मोटर-इंजिन-ट्रॅक्टरचा पंचनामा होऊन एजंटांना चेक देण्याची प्रथा डावलली. दुकानातच पंचनामे होऊ लागले आणि शेतकऱ्यांच्या अब्रूचे पंचनामे झाले, धिंडवडे निघाले. याचे एकच उदाहरण देतो.

सटाणा तालुक्यातील एक शेतकरी तुळशीराम रामभाऊ सोनवणे. त्यांनी नासिक जिल्हा सहकारी भूविकास बँकेकडे इलेक्ट्रिक मोटार मिळावी म्हणून अर्ज केला. त्यावेळचे संचालक, माजी चेअरमन व सध्याचे शिखर बँकेचे सरकार नियुक्त संचालक श्री. वसंतराव दगाजी पाटील यांना ही माहिती समजली. विषयांतर करून श्री. वसंतरावांची ओळख–त्यांच्या वसंत लीला सांगण्यापूर्वी करून देणे उचित ठरावे.

श्री. वसंतराव पाटील, वय ४० च्या आसपास. सहकार मंत्री ना.

यशवंतराव मोहिते यांचे सच्चे भक्त. जिल्हा सहकारी जमीन विकास बँकेचे दहा वर्षापासून संचालक. नंतर ९ महिने चेअरमन. त्यांच्याच काळात सरकारने प्रशासक नेमला. नासिक जिल्हा कांदा, बटाटा उत्पादक सहकारी संघाचे संचालक. गेल्या विधानसभा निवडणुकीत तिकिट मिळविण्यासाठी तरुण तुर्क म्हणून दिल्लीपर्यंत धावदौड केलेले. नुकताच त्यांनी जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्त्यांचा एक मेळावा आयोजित केला होता. प्रमुख पाहुणे होते सन्माननीय नामदार, सहकार मंत्री यशवंतरावजी मोहिते. सहकार समजाभिमुख व्हावा म्हणून भ्रष्टाचारी पुढाऱ्यांना हाकलले पाहिजे. त्यासाठी ठिकठिकाणी जनआंदोलने उभी राहवीत. अशा आंदोलनात एक सैनिक म्हणून आघाडीवर मी स्वतः राहीन अशी घोषणा सहकार मंत्र्यांनी केली होती आणि अध्यक्ष म्हणून प्रथम श्री. वसंतराव पाटलांनीच टाळ्या वाजवल्या होत्या.

तर असे एक सहकार महर्षी श्री. वसंतराव पाटील. त्यांना श्री. तुळशीराम सोनवणे यांचा अर्ज संचालक या नात्याने पहायला मिळाला. श्री. पाटील हेही सटाणा तालुक्यातलेच. त्यांनी आपला लवाजमा, जिल्हा कांदा बटाटा संघाचे बिलबुक, व्हौचर्स आदी सामग्रीसह श्री. तुळशीराम सोनवणे यांच्या मळ्याकडे प्रस्थान ठेवले. मी या बँकेचा संचालक असल्याने तुम्हाला त्वरित मोटर मिळवून देतो असे श्री. पाटील यांनी सांगितले. काल अर्ज केला आणि आज त्याचा निकालही ! कनवाळू मायबाप सरकारच्या या धोरणाने श्री. सोनवणे हे निश्चितपणे गहिवरलेही असतील. लोकशाहीतही पुंडलिका भेटी परब्रह्म आलेगाचा साक्षात्कार त्यांना झाला असेल. पण खरी आपत्ती तर पुढेच होती.

श्री. वसंतराव पाटील यांनी पंचनाम्यासहितची कागदोपत्री पूर्तता केली आणि दुसऱ्या दिवशी ' मोटर ' घेऊन जाण्यास सांगितले. पण तो दिवस कधीच उगवला नाही. श्री. तुळशीराम सोनवणे यांना क्वालिटी कंपनीची ५ हॉर्सपॉवरची ६८० क्रमांकाची इलेक्ट्रिक मोटर विकल्याची कागदपत्रे दाखल झाली. श्री. पाटील संचलित मे. डी. पाटील अँड सन्सला पैसेही मिळाले. मोटर न मिळताच श्री. सोनवणे यांच्या जमिनीच्या उताऱ्याला कब्जेदार म्हणून सावकार बँकेचे नावही लागले गेले. गंमतीची (की फसवणुकीची ?) गोष्ट अशी की याच क्रमांकाची ह्याच कंपनीची हीच मोटर बँकेने श्री. प्रभाकर रामराव पाटील यांना दिल्याचे रेकॉर्ड बँकेत हजर आहे. हा प्रकार उघडकीस येताच श्री. वसंतराव पाटील, ' कॉम्प्रमाइझ 'ला आले. माझी मोटार जळाली असे लिहून दे, तुला दुसरी देतो असे त्यांनी सांगितले. श्री. तुळशीराम पाटील यांनी त्या गोष्टीस साफ नकार दिला. मोटर नसल्याने वीज मंडळाने विहिरीवर कनेक्शनच दिले नव्हते. जर वीजच नाही तर मोटार जळेलच कशी असा त्या बिचाऱ्या शेतकऱ्याचा साधा प्रश्न होता. अखेरी या प्रकरणी श्री. तुळशीराम सोनवणे यांच्या घरातच बापलेकाची भांडणे सुरू झाली. श्री. सोनवणे यांच्या तरुण व कर्त्या मुलाने वीष पिऊन आत्महत्या केली. स्वार्थी व नादान पुढाऱ्यामुळे कर्ता मुलगा गेल्याचे दुःख तुळशीराम दारूत बुडवू लागला. नशेत श्री. पाटील यांच्या दुकानी धरणे धरून तो शिवीगाळ करू लागला. पुढारी वसंतरावाने त्याला पोलिसी हिसका दाखवला. पण सरळ सरळ फसवणूक करणाऱ्या श्री. वसंतरावांचे कोणीही वाकडे करू शकले नाही. तुळशीराम पाटील यांना मोटरचा चेक क्र. ०७०४४ बँकेचा देण्यात आला होता. तो त्यांच्यापर्यंत आलाच नाही. परस्पर खोट्या सह्या करून तो वटविण्यात आला. आय्. जी. ते मुख्यमंत्र्यापर्यंत निवेदने श्री. सोनवणे यांनी पाठविली. काहीही उपयोग झाला नाही.

श्री. वसंतराव पाटील साधे संचालक होते १९६८ साली. म्हणजेच ते अधिकारावर नव्हते. त्यावेळी त्यांनी त्यावेळच्या चेअरमनना पत्र देऊन बँकेच्या कामकाजाबाबत खेद व्यक्त केला होता. गाड्यांचा गैरवापर, अनावश्यक नोकरभरती, प्रवासभत्ते यावर जी उधळपट्टी चालू आहे, त्या खर्चाशी मी सहमत राहाणार नाही असे श्री. पाटील यांनी स्पष्टपणे कळवले होते. मात्र त्यांचे अधिकारावर आल्यावरचे वर्तन पूर्णपणे विसंगत असे आहे. श्री. पाटील यांनी चेअरमन झाल्यावर गाड्यांचा वापर बेगुमानपणे केला. अवघ्या नऊ महिन्याच्या काळात श्री. वसंतराव पाटील यांनी प्रवासभत्ता घेतला १९ हजार ८७ रुपये (म्हणजे महिन्याला जवळ जवळ २ हजार. मुख्य मंत्री वा अन्य कॅबिनेट मंत्र्यांचाही दरमहा एवढा प्रवास भत्ता होतो की काय हाही संशोधनाचा विषय.) बँकेच्या ३८ वर्षाच्या काळात भत्ता स्वीकारण्याचा श्री. पाटील यांनी विक्रमच केला आहे. एवढी प्रचंड रक्कम भत्त्यापोटी चेअरमनच्या खिशात गेली असताना एकूण ४६७ प्रकरणांपैकी अवघी १२७ च निकालांत काढली जातात. श्री. पाटील यांनी जो प्रवासभत्ता घेतला त्यात ९०टक्के रक्कम ही नासिक–सटाणा–नासिक या प्रवासाची आहे. बँकेच्या कक्षेत १३ तालुके असताना सटाण्यासच ह्या फेऱ्या का ? याचे कारण लाखो रुपयांचा फायदा बँकेकडून ज्या फर्मला होतो ती मे. डी. पाटील अँड सन्स ही संस्था सटाण्यातच आहे. भत्ते बिले चाळली असता त्यात २२ रविवारी (सुटीचे दिवशी) श्री. पाटील यांनी सटाण्याच्या प्रवासाचा भत्ता उचललेला दिसतो ! डेली ८३ रुपये ९० पैसे ! दि. २५, २६, २७, २८, २९ मार्च हे पाच दिवस लागोपाठ श्री. वसंतराव पाटील यांनी सकाळी सटाणा, रात्री नासिक अशा फेऱ्या मारल्या आहेत हे त्यांच्या प्रवास भत्याच्या बिलावरून स्पष्ट होते. या फेऱ्या केवळ ८३ रुपये रोजासाठी निश्चितपणे झालेल्या नाहीत. या काळात बँक प्रकरणावर श्री. पाटील यांनी जिल्हा कांदा-बटाटा संघाला किती मोटारी विकल्या हे पाहिले म्हणजे हेतू स्पष्ट होतो.

प्रवास भत्त्याचे प्रकरण शिखर बँकेकडे गेले. शिखर बँकेने ६–१२–७३ला एक ठराव करून श्री. पाटील यांची प्रचंड भत्ते बिलाची रक्कम नामंजूर केली. श्री. पाटील हे स्वतःच्या हक्काबाबत नेहमीच जागरुक असतात. बँकेतील उधळपट्टीच्या कारभाराचे स्पष्ट चित्र पुढे आले तेव्हा सरकारने असिस्टंट रजिस्ट्रार श्री. पवार यांना तेथे प्रशासक म्हणून नेमले. श्री. पाटील हे त्याविरुद्ध कोर्टात गेले. मनाई हुकूम मिळविण्यासाठी जंग जंग पछाडले. मग 'भत्त्यांची रक्कम परत करा.' हा शिखर बँकेचा आदेश श्री. पाटील यांनी नेमका पाळावा हे गूढच नव्हे काय ? दि. १५ डिसेंबर ७३ला १६ हजार ४९७ रुपये ३ पैसे श्री. पाटील यांनी पावती क्र. ३७०७२ ने परत केले. याचा अर्थ जाणूनबुजून एवढी रक्कम त्यांनी खर्ची टाकली होती. मात्र मिस-अॅप्रोप्रिएशनच्या कटकटी नकोत म्हणून त्यांनी ही रक्कम परत केली असावी. पण ह्या रकमेच्या व्याजाचा फटका अखेर सर्वसामान्य

शेतकऱ्यावरच ना? याची दखल समाजवादी सरकार घेणार आहे की नाही?

श्री. पाटील यांच्या कारवाया स्पष्ट झाल्यावर सहकारी जमीन विकास बँकेने त्यांच्या संस्थेची म्हणजे मे. डी. पाटील अँड सन्सची शेतकऱ्यांच्या तक्रारीच्या आधारावर चौकशी केली व तक्रारीत अर्थ आहे असे दिसून आल्यावर या संस्थेचे नाव 'ब्लॅक लिस्ट'मध्ये टाकण्यात आले. कागदोपत्री श्री. पाटील यांनी संस्थेशी संबंध ठेवला नव्हता. या संस्थेत जे भागीदार आहेत त्यात सहकार खात्यातील एका बड्या अधिकाऱ्याच्या पत्नीचा समावेश आहे. असे हे सिद्ध-साधक प्रकरण. मग खाते त्या 'काळ्या यादी'ची दखल काय डोंबलं घेणार?

मग यातून मार्ग काढण्यात आला. 'काळ्या यादीत' संस्था गेल्याने मे. डी. पाटील अँड सन्सचे काहीही अडले नाही. श्री. वसंतराव पाटील ज्या कांदा-बटाटा संघाचे संचालक आहेत त्यांना ते मशिनरी विकू लागले व संघ शेतकऱ्यांना. आहे की नाही युक्ती. बरे या संघाने म्हणे जमीन विकास बँकेचे चेक स्वीकारण्यासाठी स्वतंत्र खातेच बँकेत उघडले होते. 'कमिशन'चा हिशेब त्वरित कळावा म्हणून! सगळ्यात गंमतीचा भाग असा की मे. डी. पाटील यांनी संघाला जी यंत्रसामुग्री विकली व संघाने शेतकऱ्यांच्या माथी मारली त्यांच्या बिलांचे चेक बँक वेळोवेळी काढीत असे. असे १ लाख ६६ हजार १४० रुपयांचे ९४ चेक 'अर्जुन'ने नेले आहेत तर २६ हजार ७८६ रुपयांचे २८ चेक 'सुकदेव'ने नेले आहेत. हे अर्जुन व सुकदेव नावाचे कोणीही इसम संघात वा डी. पाटील अँड सन्स मध्ये अस्तित्त्वात नाहीत. मग ही 'दुक्कल' कोण ते शोधण्यास सर्वांचीच अक्कल कमी पडेल.

श्री. वसंतराव दगाजी पाटील यांनी आपल्या चेअरमनपदाच्या काळात दि. १-७-७२ ते ३१-१२-७२ या पाच महिन्यात ५५ लोकांची बँकेत भरती केली. एवढ्या वेगाने श्री. पाटील हे बेकारी निर्मूलनाचे काम धडाडीने करतात असे जर सरकारला कळले तर त्यांची नियोजन मंडळाकडे सहजासहजी वर्णी लागेल. दर महिन्याला ११ लोकांना त्यांनी नेमणूक पत्रे दिली. लायकी, नालायकी लक्षात न घेता श्री. पाटील यांनी ए. एस. गोवर्धने याला बँकेत कारकून म्हणून नियुक्तीपत्र दिले. श्री. गोवर्धने याने मराठवाडा विद्यापीठाचे बी. ए. पास झाल्याचे खोटे सर्टिफिकेट दाखल केले. सर्टिफिकेटवर B. A. (FAIL) असे लिहिलेले असताना PASS अशी खाडाखोड केली गेली. सध्या हे प्रकरण विद्यापीठ कक्षेत हाताळले जात आहे. खोटे सर्टिफिकेट देऊन श्री. गोवर्धने यांनी इन्स्पेक्टरचे प्रमोशन मिळावे म्हणून अर्जही केला. दयाळू चेअरमन श्री. वसंतराव पाटील यांनी त्यास प्रमोशन दिले. पगारातील ५५१ रुपये फरकही दिला. मोटर सायकल घेण्यासाठी बँकेकडून ४५३१ रुपये कर्जही दिले. अशा रीतीने श्री. पाटील यांनी अनावश्यक नोकर भरती करून बँकेवर २८ हजार ७५० रुपयांचा बोजा टाकला. येथे एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की खोटे प्रमाणपत्र दाखल करून प्रमोशन घेणारे श्री. गोवर्धने यांचे वडील याच बँकेचे संचालक आहेत. त्यांच्या शेतावर 'बलवंत' इंजिन केव्हा बसले ते 'भगवंत' जाणे. पण ३०९६ क्रमांकाच्या प्रमाणपत्रावर त्यांना त्याचे पैसे मात्र मिळाले आहेत.

श्री. वसंतराव पाटील यांच्या एकतंत्री (की ना-तालतंत्री) व विनाकारण उधळपट्टीच्या कारभाराला कंटाळून त्यांना काढून टाकणारा एक ठरावही संचालक मंडळाने केला. सहकार खात्याने या ठरावाच्या कार्यवाहीला संमती दिलेली नाहीच पण विलिनीकरणानंतर त्यांना शिखर बँकेचे संचालक म्हणून स्वीकारले. त्यातही गंमत पहा. विलिनीकरणाच्या आदेशाला राज्य सरकारला आव्हान देणारे महाराष्ट्रात वसंतराव आघाडीवर होते. राज्य सरकारच्या निर्णयाविरुद्ध त्यांनी दावा दाखल करून त्यावर बँकेचे २३५० रुपये खर्च केले. शिखर बँकेचे संचालक म्हणून ते पद त्यांनी मग कोणत्या 'तत्त्वा'साठी स्वीकारले?

सगळाच कारभार निर्लज्जांचा. सरकार व सहकार खात्याविरुद्ध शेकडो वेळा न्यायालयात जाणाऱ्या, हरकती घेणाऱ्या, उधळपट्टीचा कारभार करणाऱ्या, स्वार्थी 'नेत्यांनाच' जर सर्वोच्चपदी घेतले जाते तर ते पद स्वीकारण्यास श्री. पाटील यांनी का लाज बाळगावी? □ □

---

## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)
पंचावन्न रुपये

---

# चिमण्या कुठे गेल्या ?

● अरुण श्रीधर इनामदार ●

बर्फाचे गोळे– त्यांना बहुधा 'आईसफ्रूट' म्हणत नसावेत ! 'आईस्फ्रूट' ही फार वरच्या वर्गातील असामी. आमचे 'बर्फाचे गोळे–' त्या मानाने 'इसम' मंडळी असावीत ! तुम्ही लोक त्यांना काय म्हणता देव जाणे, मी बर्फाच्या त्या 'गोळ्यां'ना 'बर्फाच्या चिमण्या' म्हणतो. नाव काढल्याबरोबर तोंड गारगार होऊन जावे ! तर त्या चिमण्या विकणारा तुम्ही कधी पाहिला आहे का ? बहुधा त्या हडकुळ्या माणसाची दाढी तुरळक वाढलेली असते. अंगातील शर्ट केव्हातरी निळा असावा. हातातली अन्नदात्री 'बर्फाच्या चिमण्या'ची गाडी– त्याला साजेशीच असते, आणि तिला साजेसेच, एक गोड 'गारेगार' हसू त्याच्या तोंडावर पसरलेले असते ! गाडी ढकलीत, गाडीला बांधलेल्या घंटेची दोरी खेचीत तो हळूहळू जात असतो. पोरांचा घोळका फुग्यांच्या गर्दीसारखा त्याला चिकटलेला असतोच. गिऱ्हाईक सापडताच ती फिरती सावली थांबते. बर्फाच्या मूठभर गोळ्यात काडी खुपसली जाते. कडेच्या रंगीबेरंगी बाटल्यातील रंगीत पाणी– पाणीच बहुधा– त्या गोळ्यावर शिंपले जाते– आणि वाहवा, क्षणापूर्वी पांढरा बर्फ असलेल्या त्या गोळ्याची, रंगीत 'चिमणी' बनते ! घेणारा हरखून जातो, भोवतालची पोरे तोंडात बोटे कोंबून पहात राहातात ! रंगाच्या बाटल्या पुनः गाडीच्या कडेने रांगेत जाऊन बसतात.

काय असेल ते असो ! त्या 'गाडीवाल्या' सारखे मला या क्षणी काहीतरी वाटायला लागले आहे. माझ्यापाशी रंग म्हणण्यासारखे नाहीतच. असलेच, तर अगदी फिके. आणि खरेच म्हणावयाचे, तर या गोष्टीवर रंग शिंपडावेत, असे वाटतही नाही. जशी आहे, तशीच ती समोर– एखाद्या छोटीने चूलबोळकी मांडावीत, तशी ठेवावी हेच उत्तम !

–तशीच 'चूल–बोळकी' मांडून त्या दिवशी बसलो होतो ! समोर मोठा काचेचा पडदा होता, दहा बाय चार फुटाची ती प्रचंड काच चमकत होती. त्याच्यावरच मला एक चित्रकाम करावयाचे होते. माझ्या सामानाचा पसारा भोवताली पसरला होता.

आमच्या एका डॉक्टरांचे काम. ती सकाळ मोठी प्रसन्न होती. डॉक्टरांशी माझे– किंवा आम्हा सर्व कुटुंबियांचेच– संबंध केवळ 'कमर्शिअल' नव्हते. आमच्या घराचेच नव्हे, तर सबंध घराण्याचेच संबंध त्यांच्याशी फार घरोब्याचे. डॉक्टर म्हटले म्हणजे पोरेबाळे घरात लपून बसावयाच्या जागा शोधू लागतात. 'हेअर कटिंग सलून'– ज्याच जोडीने, ज्याच्या पायरीजवळून नुसते जायचे म्हटले, तरी गळा काढला जातो, अशी दुसरी पायरी डॉक्टरची ! आमचे डॉक्टर त्याला अपवाद होते. आमच्या पोरपणात या डॉक्टरांना मज्जाव नव्हता. तसे त्यांचे 'अल्ट्रा मॉडर्न'– 'पॉश'– वगैरे व्यक्तिमत्त्वही नव्हते. त्यांची पर्सनॅलिटी विलक्षण शुभ्र, अप्-टु-डेट तर खरीच; परंतु प्रसन्न होती. माझ्यासाठी विशेषकरून, त्यांना बऱ्याच वेळा आमच्या घरी यावे लागे ! त्यामुळे माझी– त्यांची ओळख चांगलीच होती !

अशा या प्रसन्न डॉक्टरांचे काम. मोठ्या हौसेने मी ते पत्करले आहे. पुढच्याच बाजूला डॉक्टरांची कन्सल्टिंग रूम. आत पंखा फिरतो आहे. डॉक्टर आत आहेत. बोलण्याचे अस्पष्ट आवाज ऐकू येत आहेत. पलीकडून कॉम्पाउंडरच्या बाटल्यांचे आवाजही चालले आहेत. औषधांचा एक पुसट गंध स्वच्छ हवेत मिसळल्याचे नाकाला जाणवते आहे.

मी मान कलती केली, आणि समोर काचेकडे पाहिले. 'वाहवा !' माझ्यावर मी नेहमीच खूश असतोच ! त्यात भर पडली. (काय पण कौतुक ! मी आपल्यालाच चिमटा काढला. आपल्या कामाचे कौतुक दुसऱ्यांनी करावे.) पण नाही. माझ्याच तोंडाभोवती मी दिवे ओवाळण्याचा प्रश्न नव्हता ! मी आखणी खरेच बरी केली होती. मला ते खुद्द डॉक्टरांनी सांगितले. (आता बोला !) कशाला तरी म्हणून ते आत आले, आणि माझ्या पाठीमागून आवाज आला, 'मार्व्हेलस ! चांगले झाले हे.'

मी चमकून मागे पाहिले. गडबडीने उभा राहिलो. त्यांच्याशेजारी त्यांनी मला बसविले. 'ठीक आहे, ठीक. चालू द्या.'

–प्रिस्क्रिप्शन् पेपर लिहिताना ते म्हणत, तेच हे बोलणे ! मला हसायला आले. 'हसताय काय ?' त्यांनी विचारले.

मी त्यांचे बोलणे पुरे केले,– 'चालू द्या. आज डोस देतो, गोळ्या नकोत आज ! ठीक !' त्यांच्याच बोलण्याची ही री ओढणे होते.

–तेही हसले. 'येस !' त्यांनी पेशंटला कटवतानाचा शेवटचा शब्द म्हटला, 'कंटिन्यू !' आणि क्षणभर ते अॅल्युमिनने रंगविलेल्या खिडकीसमोर थांबले.

त्यांच्या किंचित् स्थूल, ठेंगण्याच, सौम्य मूर्तीकडे मी पाहतो आहे. त्यांचा संपूर्ण सूट खादीचा आहे. (आमचे डॉक्टर टांगा वापरणारे. संपूर्ण स्वदेशी बनावटीची मिळे पर्यंत कार घ्यावयाची नाही, अशा बाण्याचा माणूस !) टक्कल आहे. मोठाल्या गोल डिझाइनच्या खिडकीच्या भजातून ते पलीकडील त्यांच्या बंगल्याच्या विस्ताराकडे पहात आहेत. पडदा त्यांच्या खांद्याशी – स्कंधाशीच म्हणतो – रूळतो आहे.

–डॉक्टर क्षणभर वाकले, आणि पोरकटपणे ओरडले, 'प्र ऽ भा ! कू ऽ कू क् !' आणि मिस्कीलपणे म्हणाले, 'चिमण्या ऽ कुठे ऽ गेल्या ?'

पलीकडून छोकरीच्या खिदळण्याचा आवाज आला, आणि डॉक्टर वळले. कन्सल्टिंगकडे निघून गेले, आणि मी चूप झालो.

डॉक्टरांनी नातवंडांशी सहज संवाद केला,

होता. 'प्रभा'ऽ अडीच-एक वर्षांची असावी ! किंवा तो 'प्रभात'–'प्रभाकर'ही असावा. प्रसन्न उन्हात सकाळी त्याच्याजवळ चिमण्या खेळत असाव्यात. त्या भुर्रकन् उडाल्या असतील, आणि 'तो' किंवा 'ती' प्रभा, त्यांच्यामागे धावत सुटली असेल.

तो खेळ डॉक्टरांनी त्या क्षणभर पाहण्यातून पाहिला होता. मला क्षणभर त्यांचा हेवा वाटला! परमेश्वर नेमक्या माणसांना नेमक्या गोष्टी दाखवितो. प्रसन्न माणसाला प्रसन्न खेळ. मला हसू आले.

मी मात्र त्या साध्या वाक्याने काहीसा छायांकित बनलो. एक पुसट सावली माझ्या मनावर तरंगू लागली.

डॉक्टरांचे रूपेरी केस माझ्या डोळ्यासमोर सारखे येऊ लागले. कालच माझ्याशी बोलताना डॉक्टरांनी आपल्या मनातले सूर मला क्षणमात्र ऐकविले होते. ते सूर किंचित विस्मयाचे होते, विभ्रमाचे होते. मी काही बोललो नव्हतो. बोलू शकलोच नव्हतो.

परिपक्व ज्ञानाचा, जीवन सर्व अर्थांनी कृतार्थ असलेला हा प्रसन्न माणूस आज अडखळत होता. त्या यशस्वी गृहस्थांना आज सूर हरवल्यासारखे वाटत होते. 'बदल होतोय रे, काही समजत नाही!' ते म्हणत होते. जिवाभावाने जपलेल्या श्रद्धा, विश्वास, आज उडवून लावणारी माणसे त्यांना पावलोपावली भेटत होती, आणि त्याजागी नवे काहीच येत नव्हते! 'बदल हवाच', ते म्हणाले, 'परंतु त्याजागी काहीतरी–हवे ना? कृष्ण नको, निदान ख्रिस्त तरी हवा! अरे, देव नाही, असे छातीठोक सांगण्याची छाती तरी हवी!'

खुद्द डॉक्टर 'पुराणमतवादी' नव्हते. त्यांचे निर्माल्य नदीत सोडले जात नव्हते, घरच्या बंबात त्याची आहुती असे! 'नदीत सोडून कुजविण्यापेक्षा हे उत्तम! काय?' त्यांचे विचार तर्कशुद्ध होते.

परंतु आज त्यांना कोठेतरी चुकताना दिसत होते. खुद्द त्यांच्या व्यवसायातील मंडळीही आज जे विलक्षण 'संगीत' त्यांना वाजविताना दिसत होती, ते पाहून डॉक्टरांचे वय हतबुद्ध होत होते. 'अरे, धर्म म्हणून डॉक्टरकी सोडा; ते जाऊ द्या. निदान धंदा म्हणून तरी प्रामाणिकपणाने कराल?'

मी बोललो नव्हतो. त्यांचे बरोबर होते. माझ्याही व्यवसायात उफराट्या चालीच्या 'पंटरां'ची गाठ दर पावलाला पडतच होती!


चिमण्या कोठेतरी गेल्या होत्या! डॉक्टरांच्या बोलण्यातून तोही अर्थ मला दिसत होता. ज्या चिमण्यांनी हृदयात घरटी केली होती, त्या उडून जाऊ लागल्या होत्या, म्हणून डॉक्टर अस्वस्थ बनले होते.

मी एक श्वास सोडला, व कामाला लागलो. समोर पड्यावर-काचेवर, मी एक जलप्रवाह काढला होता, आणि त्यावर अनेक पणत्या तरंगत येत होत्या.

काय असेल ते असो त्या शुभ्र प्रवाहावर माझ्या मनातील सावली पडलेली मला दिसू लागली. चित्र अडले. पुढे जाणे थांबले.

मी गोंधळून गेलो. तशातच एक विलक्षण बातमी समजली. कानाशी प्रचंड टोल बडवावे, तशी ती मनात निनादत राहिली–एकट्या माझ्याच नव्हे, डॉक्टरांच्या घरातील सर्वांच्या. आम्हा सर्व आत्मीयतेच्या माणसांच्या.

डॉक्टरांकडेच राहिली–वाढलेली, त्यांची एक बहुतेक भाची–कोणा परधर्मीयाबरोबर



पळून गेली होती !

डॉक्टरांवरील आघात आम्हा सर्वांनाच जाणवत होता. आमची सर्व कामेच रस गमावून बसली. सर्दी व्हावी, तसे सगळे गंधहीन बनले.

माझे काम तर अडले होतेच. आता तर मला तिकडे पाहवेनासे होऊ लागले. अशा कामाचे हेच होते. एकदा थांबले, म्हणजे त्याची सारी फुले एकदम निष्प्रभ बनतात. पुन: त्याचे फुगे फुगविणे फार जिकरीचे !

असाच त्यादिवशी त्या बोर्डसमोर बसलो होतो. समोर बोर्डवर माझी आखणी होतीच. पाण्याच्या प्रवाहावरून संथपणे तेवत्या पणत्या पुढे पुढे येत होत्या, आणि अलीकडील तीरावरून एक मोर टवकारून त्या पणत्यांकडे पहात होता. त्याचे डोळे विस्फारले होते, आणि प्रयत्न करूनही त्या डोळ्यामध्ये उमटून गेलेला एक हरवलेपणाचा भाव मी पुसू शकत नव्हतो !

जणू त्या मोराचेही काही अमोल, कौतुकाचे, मर्मबंधातले—गमावले गेले होते. त्या पणत्यांकडे तो इतका विमनस्कपणे पहात होता की, माझा उचललेला हातही उदासपणे खाली येत होता.

काम अडले होते, मी भोवऱ्यात सापडलो होतो.

भानावर आलो पावलांच्या आवाजाने. मी एकदम सजग झालो. डॉक्टर, ते इकडेच येत होते. एकदम चोरट्यासारखा मी अंग आकसून बसलो. 'नमस्कार !' मनात नव्हते, ते ओठावरून म्हणालो.

डॉक्टरांनाही ते जाणवलेच ! काहीतरी बोलायचे म्हणून मी 'नमस्कार' उच्चारला होता. तेही हसले. 'शाबास !' ते म्हणाले, 'नमस्कार म्हणतोयस्. करीत नाहीस. देवळ्या देवाला—'

मलाही त्या विसंगतीमुळे हसू आले. 'सावकाश चाललेय रे फार' बोर्ड न्याहाळीत ते म्हणाले, 'जरा जलदी करायला काय घेशील ?'

कोरड्या ओठांनी मी काहीतरी पुटपुटलो. डॉक्टर माझ्याकडे पहात होते. त्यांच्या डोळ्यात एक मिश्कीलपणा होता. माझ्या खांद्यावर त्यांनी हात ठेवला. माझ्या तोंडून शब्दही फुटला नाही.

'जरा आटोपते घ्या.' डॉक्टर मिश्कीलपणे हसून म्हणाले, 'तुम्हाला मुदत आठ दिवस ! हा पीस तुला लवकर आटोपलाच पाहिजे !'

डॉक्टर केवळ 'मालक' नव्हते, मी केवळ 'मजूर' नव्हतो. 'का ?' मी आश्चर्याने विचारले, 'एवढी घाई ? काही विशेष—'

'शाबास !' माझ्या पाठीवर थाप मारून उठत डॉक्टर म्हणाले, 'जसे तुला माहीतच नाही ! अरे, आपली छबडी—'

—मी एकदम चपापलो. छबडी ! डॉक्टरांची जखम. ती, त्यांनी जीव ओतून वाढविलेली आणि आता कोणा फडतुसाबरोबर पळून गेलेली, डॉक्टरांच्या सर्व प्रतिष्ठेवर बोळा फिरवून गेलेली पोरगी.

—'तिचे रिसेप्शन ठोकणार आहे मी !' डॉक्टर उत्साहाने म्हणाले, 'बघू तिच्या त्या 'नवऱ्या'चे डेअरिंग ! मीच जाऊन बोलावणार आहे त्याला ! म्हणून म्हणतो, तू आटोप ! हॉल सजवला पाहिजे.'

माझ्या मनात जणू पेटीवर कोणीतरी वेगवेगळ्या रागांच्या सुरावटी भरधाव वाजविल्या. त्या आनंद-कल्लोळात मी बुडून गेलो. डॉक्टर अजून इतके—रिस्पॉन्सिव्ह—उत्साही—उरले होते तर'

त्यांच्या मनाच्या या उत्साहाने मीच भुलून गेलो. घरा—व्यवहारात आता डॉक्टरांच्या उल्हासाच्या लहरी पसरत जाणार होत्या. लोकांना काय,—तुम्ही हसलात, तुमच्याबरोबर हसतील, आपल्या रडण्याला कोण साथ देणार आहे ?

एका कैफातच मी कलम हाती घेतले आणि काम पूर्ण करूनच खाली ठेवले !

डॉक्टरसाहेबांच्या त्या स्क्रीनवर शुभ्र जलप्रवाह ओसंडून वाहात आला आहे. दूर तीरावर काही सुभगा दिसतात. एक ओणवी पाण्याच्या प्रवाहावर त्यांनी सोडलेले डुलते दिवे, पुढे पुढे येत आहेत. ऐल तीरावरून एक मोर मान वळवून तिकडेच पाहतो आहे त्याचे डोळे स्निग्ध आहेत.

त्याला त्या दीपाकडे पाहून आपल्या आयुष्याची आठवण येत आहे का ? त्याच्या डोक्यावरच्या तुऱ्याच्या जागी मी एक दिवाच काढला आहे—तुरा म्हणून ! त्या सर्व पणत्यांना चिमण्यांचेच रूप दिले आहे.

—मला मुदत आठ दिवसांची होती, मी एक दिवस एका रात्रीत काम पूर्ण केले, व 'मिस्टर छबडी'ची वाट पाहू लागलो !

□ C


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही वरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

# अपेक्षापूर्ती न करणारे बडोद्यातील नाट्यसंमेलन

राजा कारळे

अखेर एकदाचे बडोद्याचे नाट्यसंमेलन पार पडले. गुजराथमधील आंदोलनामुळे ते होईल की नाही याबद्दल भीती होती. पण अखेरीस ते करण्याची जिद्द बडोदा अॅमॅच्युअर्स ड्रॅमॅटिक क्लबने दाखविली. तीच जिद्द जर प्रत्यक्ष संमेलनात प्रतिनिधींच्या सोयी पहाण्यात उपयोगी आली असती तर संमेलन प्रतिनिधी त्यांना धन्यवाद देऊन घरोघरी परतले असते, झक मारली आणि आपण संमेलनाला आलो असे त्यांना झाले नसते.

मुंबईहून संमेलनाला प्रतिनिधी निघाले तोच दादरला हमालांनी प्रतिनिधींच्या डब्यावर जोरदार हल्ला केला. बॉंबे सेंट्रलवरून दादरच्या डब्यात प्रतिनिधी बसून आले म्हणून व दादरच्या प्रवाशांना डबा नव्हता आणि त्यांना डब्यात बसविण्यासाठी हमालांनी पैसे घेतले होते म्हणून हमालांनी प्रतिनिधींवर केलेला हा हल्ला खरोखरच भयंकर होता. एकुलत्या एका उघड्या खिडकीतून घुसण्याचा, सामान फेकण्याचा प्रयत्न निष्फळ झाल्यावर थुंकणे, पाणी फेकणे आदि अहिंसात्मक हल्ला कामी येत नाही हे पाहिल्यावर शिव्या गुद्दागुद्दी व अखेरीस दगडफेक व काचेचे ग्लास फेकणे आदि प्रकार हमालांनी केले. हमालांच्या दृष्टीने संमेलन प्रतिनिधींची किंमत त्यांच्यावर थुंकण्याइतकीच होती. त्या मानाने व्हाईट कॉलर प्रतिनिधींनी हमालांना प्रतिकार चांगला केला. दरवाजांची पावनखिंड लढवून त्यांना गडात (डब्यात) प्रवेश करू न देण्यात ते यशस्वी झाले. पण या प्रकाराचा काही प्रतिनिधींनी इतका धसका घेतला की परतताना ते दादरला न उतरता बॉंबे सेंट्रलला उतरले,

संमेलनाचे उद्घाटक होते विजय तेंडुलकर. त्यांनी एका प्रसंगी आपल्या भाषणात नाटककारांनी रस्त्यावर यावे असे सांगितले होते. त्याप्रमाणे संमेलनाला जाणाऱ्या प्रतिनिधींना अशा रीतीने रस्त्यावर यावे लागले. आणि ते स्वतःदेखील अकोल्यात रस्त्यावर गेले.

## उतरण्याची भिक्कार सोय

बडोद्यात आल्यावर प्रतिनिधींना उतरण्यासाठी एक विद्यार्थी छात्रालय देण्यात आले. ते इतके अस्वच्छ आणि घाणेरडे होते की तेथे राहाणे म्हणजे एक शिक्षाच होती. शिवाय उकाड्याने जीव हैराण होत होता म्हणूनच काही प्रतिनिधी निदान तीन तास एअर कंडिशनमध्ये बसता येईल म्हणून समोरच्या चित्रपट गृहात 'बॉबी' पहावयाला गेले. प्रतिनिधींना उतरावयाला जागा दिली, त्यांना दोन वेळ जेवण दिले, चहा दिला की आपले काम झाले असा संयोजकांचा समज असावा. त्यामुळे काही हवे असल्यास त्या अनोळखी गावात भर उन्हात शोधीत फिरावे लागे. संयोजकांनी प्रतिनिधींना काही हवे नको पहाण्यासाठी एखादी व्यक्ती जरी ठेवली असती तरी प्रतिनिधींच्या बहुतेक अडचणी कमी झाल्या असत्या. पण संयोजक व त्यांचे स्वयंसेवक आपल्याच तोऱ्यात फिरत होते. संमेलनातील नाटकात काम करणारेही तेच होते व संमेलनाचे आयोजन करणारेही तेच होते. त्यामुळे संमेलन प्रमुखांनी एकदा सांगितले की, 'आम्हाला × × खाजवायला देखील वेळ नाही.' यामुळे टी. व्ही. ची मंडळी अर्ध्यावरच रुसून मुंबईला परत चालली होती.

न पेलणारा बोजा उचलण्याचा प्रयत्न केला म्हणजे अशी गत होणारच. या सगळ्या नवनाट्यवाल्या यंग तुर्कांनी जुन्या अनुभवी मंडळींची मदत घेतली असती तर काय बिघडले असते? रामदास कोरान्ने, वसंतराव कप्तान, डॉ आंबेगावकर, त्र्यंबकराव जोशी, शंकरराव आपटे आदि सर्वंच ह्यात नाटकात घालविलेल्या मंडळींना ते मदत करावयाला तयार असतानाही बाजूला ठेवण्यात आले होते.

## उद्घाटक पकडून आणले

समेलनाचे उद्घाटक विजय तेंडुलकर यांनी मी उपस्थित राहू शकणार नाही. हे सुमारे एक दोन आठवडे अगोदरच कळविले होते. म्हणून संमेलनाला उद्घाटक नव्हता. दैवयोगाने रणजित देसाई बडोद्यातच होते. ते शिष्टाचार म्हणून विद्याधर गोखले यांना भेटावयाला गेले. तेव्हा त्यांनाच उद्घाटक म्हणून पकडून आणण्यात आले. (ही गोष्ट त्यांनीच आपल्या भाषणात सांगितली.) त्यांच्या भाषणात 'मी रंगभूमीवर सपाटून आपटलेला नाटककार आहे' हे शल्य जाणवले. स्वागताध्यक्ष बडोद्याचे फत्तेसिंग महाराज गायकवाड परदेशी गेले होते म्हणून त्यांचे बंधू रणजीतसिंग यांनी त्यांचे भाषण वाचून दाखविले. या दोघाही रणजीतांनी आपल्या भाषणात भारताच्या मातीतून निर्माण झालेली नाटके लिहिली गेली पाहिजेत असे आवाहन केले. राष्ट्राच्या सुखदुःखाशी समरस होणारी नाटके निर्माण झाली पाहिजेत. भारत बांगला संघर्ष, तेथील स्त्रीयांवरील अत्याचार, गुजराथ व अन्य राज्यातील संघर्ष आदि घटनांवर नाटककारांनी आंतरिक व मानसिक संघर्षातच गुरफटून न रहाता, समाजाच्या विचाराला वळण लावणारी नाटके निर्माण करावीत असा सल्ला रणजीत देसाई यांनी नाटककारांना दिला.

नंतर संमेलनाध्यक्ष विद्याधर गोखले यांनी त्यांचा असंख्य हारांनी सत्कार झाल्यावर आपले भाषण उत्साहात सुरू केले. पण नंतर भोजन, नाटक कार्यक्रम असल्यामुळे त्यांनी आपले भाषण अर्धवटच केले आणि उरलेले अर्धे भाषण समारंभ प्रसंगी केले.

## वक्तशीरपणाचा अभाव

या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे यातील एकही कार्यक्रम वेळेवर सुरू झाला नाही. प्रत्येक कार्यक्रमाला तास दीड तास उशीर. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रम गुंडाळावा लागला. संमेलनात आयोजित केलेले दोन परिसंवाद 'कुठे आहे ती मराठी संगीत रंगभूमी' आणि 'या समीक्षकांना म्हणावे तरी काय?' हे परिसंवादही गुंडाळावे लागले. त्या मानाने या परिसंवादात थोडीशी खडाजंगी झाल्यामुळे हा

कार्यक्रम काही प्रमाणात सजीव वाटला.

गंधर्वयुगात संगीत रंगभूमीविषयी खूप अपेक्षा निर्माण झाल्या पण त्या पूर्ण न झाल्याने संगीत रंगभूमीला उतरती कळा लागली (ललिता बापट). संगीताच्या अतिरेकामुळे संगीत रंगभूमीचा अपकर्ष झाला. पण आजही प्रेक्षकांना संगीत नाटक हवे आहे. (राजाराम हुमणे) संगीत नाटकांतील अतिरेकी गायन, अशुद्ध शब्दोच्चार यासारख्या अपप्रवृत्तींना प्रेक्षकांनी आळा घातला पाहिजे (भालचंद्र पेंढारकर) इत्यादी मुद्दे संगीत नाटकाच्या अभिमान्यांनी मांडले.

प्रस्तुत विषयावर बोलताना प्रा. माधव मनोहर यांनी सांगितले की संगीत रंगभूमीवर संगीताचाच नव्हे तर सर्वच गोष्टींचा अतिरेक झाला. त्यातील दोष जर त्याचवेळी दुरुस्त केले असते तर अद्यापही संगीत रंगभूमी चांगलीच अस्तित्वात राहिली असती. देवलांच्या नाटकासारखे संगीत, संगीत नाटकात आदर्श होय.

### पॉप नाटचसंगीत हवे

मराठी नाटचसंगीताला नवे वळण, नवा फॉर्म दिला पाहिजे असे बडोद्याचे प्रा. यशवंत केळकर यांनी सांगितले. कमलाकर सोनटक्के यांनी जीवनाप्रमाणे जीवनाशी संबंधीत असलेली कला बदलते. जुने लोक संगीत व लोकनाटच यांचा नव्या स्वरूपात वापर करून नवे संगीत नाटक उभे केले पाहिजे. मुंबईचे बाळ गाडगीळ यांनी आपल्या भाषणात संगीत विषयक नवा मुद्दा मांडला त्याची चर्चा होणे आवश्यक आहे. ते म्हणाले, आधुनिक वळणाचे संगीत नाटकात हवे. सध्याच्या मूडला योग्य असे पॉपसंगीतासारखे तरुण पिढीला गोडी वाटेल असे संगीत नाटकात हवे, चेंबर संगीत नको. हिन्दी सिनेमात ज्याप्रमाणे विदेशी व देशी संगीताचा मिलाफ करून लोकांना आवडणारे संगीत आले आहे तसे नाटचसंगीतातही होणे आवश्यक आहे.

बडोद्याचे रामभाऊ जोशी यांनी या परिसंवादात सांगितले की गाणारे तरुण कलावंत भरपूर आहेत पण त्यांना नाटकात संधी मिळत नाही. त्यांच्या या विधानावर राजाराम शिंदे यांनी 'माझ्याकडे पाठवून द्या' असे सांगितले. त्यामुळे थोडे चैतन्य निर्माण झाले. आपण नाटच संगीताचे शिक्षण देऊ असे पेंढारकरांनी या प्रसंगी सांगितले.

त्याच दिवशी सायंकाळी नाटचसंमेनाध्यक्ष श्री. विद्याधर गोखले यांनी स्वतः आपला 'प्रेयसी ते परमेश्वर' हा शेरशायरीयुक्त संगीत कार्यक्रम सादर केला. मधुवंती दांडेकर आणि कान्होपात्रा यांच्या गायनामुळे व गोखल्यांच्या वाक्चातुर्याने तो बहारदार वाटला. रात्री साहित्यसंघाचे 'अजब न्याय वर्तुळाचा' हे ब्रेख्तीयन नाटक झाले. गंमत म्हणजे दि. १८ रोजी बडोदेकरांना संमेलनात 'गाढवाचे लग्न' हे लोकनाटचही पाहावयाला मिळाले. त्यामुळे अस्सल लोकनाटच आणि परदेशी व देशी संकरीत लोकनाटच यातील फरक व गुणदोष अजमावयाला मिळाले. काहींना अस्सल आवडले तर काहींना संकरीत.

### समीक्षक चर्चा गाजली

बुधवार दि. १० रोजी 'या समीक्षकांना म्हणावे तरी काय' या विषयावरील चर्चा अपेक्षेप्रमाणे गाजली. निर्माते राजाराम शिंदे यांनी समीक्षकांच्या चारित्र्यहननाचा केलेला अश्लाध्य प्रयत्न सोडल्यास या चर्चेची पातळी चांगली होती.

साहित्य संघाच्या तात्या अमोणकरांनी चर्चेचे प्रास्ताविक केले. समीक्षक केवळ दोष दाखविण्यासाठीच नाटकाला जातात. एरवी ती चांगली माणसे आहेत, असे ते म्हणाले. बडोद्याच्या प्रा. गणेश अग्निहोत्री यांनी समीक्षक अपेक्षा पूर्ण करू शकत नाहीत. समीक्षक आपल्याला कळत नसेल त्यातही घुसतात. समीक्षणे ही दीपस्तंभासारखी हवीत. अखेरीस टीकाकारांनीच कलाकारांना मोठे केले आहे असेही ते म्हणाले.

बडोद्याचेच श्री. गजानन वैद्य यांनी काही प्राध्यापक समीक्षक केवळ संहितेवरच टीका करतात. त्यांना नाटकातले–नाटचतंत्रातले काही कळत नाही. ते दिग्दर्शक समजू शकत नाहीत. त्यांना प्रा. यशवंत केळकर, कमलाकर सोनटक्के यांच्याकडे प्रशिक्षणासाठी पाठवावयाला पाहिजे असे सांगितले–

श्री. नारायणराव कप्तान यांनी समीक्षकांना काही चांगले दिसत नाही. ते स्वतः कलानिर्मिती करू शकत नाहीत. ते वांझ लोक आहेत. पण दुर्जनं प्रथमं वन्दे म्हणून त्यांचा मान राखला जातो, असे म्हटले. डॉ. गणेश भगवंत वैद्य यांनीही समीक्षकांना नाटकाच्या वेणा कळत नाही, त्यांनी तालमींना उपस्थित राहावे अशी सूचना केली.

कमलाकर सोनटक्के यांनी समीक्षकांना दोष देण्यात अर्थ नाही असे सांगितले. चांगले नाटक असल्यास ते भरपूर कौतुक करतात. प्रशिक्षण घ्यावयाला हरकत नाही पण प्रशिक्षणाने सर्व काही लगेच येते असे नाही. फक्त वाट लवकर सापडते. दिशा लवकर मिळते.

आम्ही अमुकच करावं–मांडावं असं म्हटलेलं आम्हाला आवडत नाही मग समीक्षकांनी अशाच प्रकारे लिहावं हा आग्रह का? असे प्रा. यशवंत केळकर यांनी या चर्चेत बोलताना सांगितले. ते म्हणाले समीक्षकांना तोंड देण्याचे सामर्थ्य तुमच्यात का नाही? समीक्षकांना प्रशिक्षण द्यावयाला पाहिजे असे म्हणता मग तुमच्यात किती प्रशिक्षित आहेत? सगळेच ट्रायल अँड एरर मेथडने शिकत आहेत.

श्री. अधूटकर यांनी बंगालमध्ये २५ प्रयोगानंतर नाटकावर समीक्षणे येतात. आपल्याकडेही या गोष्टीचा विचार व्हावा अशी सूचना केली होती. त्या अनुषंगाने बोलताना पुण्याच्या विमलाबाई साठे म्हणाल्या की यामुळे निर्मात्यांचे फावेल. त्यांचा रंगभूमीवर बेभान नाच सुरू होईल. टीकाकार स्पष्टपणे लिहिणारे आहेत. त्यांना दोष देऊ नका. अस्सल सोनं असेल ते टिकून राहील. त्याला भीती नाही.

### समीक्षकांवर तुफान हल्ला

त्यानंतर राजाराम शिंदे यांनी समीक्षकांवर जोरदार शाब्दिक हल्ला केला. समीक्षकांच्या टीकेमुळे निर्माते नष्ट होत आहेत. समीक्षक त्यांचा जगण्याचा हक्क नष्ट करीत आहेत. काही समीक्षक स्कॉचच्या पार्टी झोडतात. एक समीक्षक तर नाटचप्रयोगाच्या वेळी पैसे उसने मागतो. त्यांना पासेसही द्यावे लागतात. यांच्या टीकेमुळे निर्मात्यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर उभे राहातात.

राजाराम शिंदे यांचे भाषण झाल्यावर अध्यक्ष विद्याधर गोखले यांनी गुजरातच्या गोळीबाराची आठवण झाल्याचे सांगितले व त्यानंतर समीक्षक वा. य. गाडगीळ यांना बोलावयास सांगितले.

वा. य. गाडगीळ म्हणाले की आम्हाला संभाळून घ्या असे का सांगता? आमच्यावर दडपण आणू नका. संपादकांना फोन करून

आमच्यावर नेहमी दडपण आणले जाते. आमचे काम आम्हाला करू द्या. समीक्षकाने प्रामाणिकपणे लिहिले पाहिजे. धंद्याचा विचार केल्यास समीक्षक कर्तव्याला मुकेल. आम्ही पहिल्या प्रयोगावर तो दिसेल त्याप्रमाणे लिहितो. तो कच्चा असेल, रंगीत तालीम असेल याचा आम्ही विचार का करावा ? तुम्ही त्या प्रयोगाबद्दल प्रेक्षकांकडून पैसे घेता ना ? त्यांना फसवता ना ? आम्ही समीक्षक रंगभूमीचे शत्रू नाही. आम्हाला रंगभूमीविषयी प्रेम वाटते म्हणून आम्ही लिहितो. आम्हाला निर्मात्यांच्या पासाची जरूरी नाही. तिकिट काढून नाटक बघण्याची आमची कुवत आहे.

नंतर ललिता बापट यांनी या विषयाला व समीक्षकाला एवढे महत्त्व का देता असा प्रश्न विचारून परिसंवादात बोलावयाला प्रारंभ केला. गाडी खालून जाणाऱ्या कुत्र्याला गाडी आपल्यामुळेच चालते असे वाटते तसे नाट्यसंबंधितांनी समजू नये. कारण प्रेक्षक मूर्ख नाहीत. समीक्षकांनी विद्वत्तेचे प्रदर्शन न करता लोकातर्फे विचार प्रदर्शित करावेत. प्रेक्षक समीक्षणे वाचतात व स्वतःच्या अनुभवावरून ठरवतात. पटत नसेल तर त्याला समीक्षण म्हणू नका.

### समीक्षक प्रेक्षकासाठीच

त्यानंतर बाळ गाडगीळ यांनी परिसंवादात भाग घेतला. ते म्हणाले मी एकेकाळी समीक्षक होतो. आणि सध्या जाहिरातव्यवसाय करतो त्यामुळे मी दोघांनाही चांगलाच ओळखतो. मी दोघांचा प्रतिनिधी आहे. नाट्यनिर्माते म्हणतात आम्ही ५० हजारावर नाटकावर खर्च करतो हे समीक्षकांनी लक्षात घेऊन लिहावे. पण प्रेक्षकांचे दीड लाख रुपये नाटकासाठी जातात त्याचे काय ? म्हणून समीक्षकाने ज़बाबदारीने लिहिले पाहिजे. समीक्षक सहृदय असावा. दिसेल त्याप्रमाणे त्याने लिहावे.

त्यानंतर भालचंद्र पेंढारकर यांनी मराठी रंगभूमीची काहीही माहिती नसणाऱ्या, बालगंधर्व कोण हे माहीत नसणाऱ्या दिल्लीच्या समीक्षकाविषयी काही किस्से सांगितले. त्यानंतर माधव मनोहर यांनी चर्चेला सविस्तर उत्तर दिले. ते म्हणाले ' कलाकाराप्रमाणेच समीक्षकावरही बंधन नको. प्रशिक्षणाने कलाकृती निर्माण करता येणार नाही त्याप्रमाणे समीक्षाही सुधारणार नाही. त्यामुळे काही मर्यादेपर्यंत उपयोग होईल. नाटकाचे प्रयोगमूल्य प्रेक्षकासारखेच समीक्षकालाही कळू शकते. समीक्षक हा निर्माता व प्रेक्षक यांच्यातील दुवा आहे. नाटकावर जमेल तसे भाष्य केले म्हणजे समीक्षकाचे काम संपले. समीक्षकांना स्कॉच-व्हिस्की पाजून समीक्षणावर काही परिणाम होत नाही. समीक्षणे जशी यावयाला पाहिजेत तशीच येतात आणि समीक्षक पार्टी मागावयाला जात नाही. निर्मातेच त्यांना बोलावतात तर त्यात चूक त्यांचीच आहे.

यानंतर श्री. विद्याधर गोखले यांनी या चर्चेचा समारोप थोडक्यात केला. ते म्हणाले चर्चा उद्बोधक झाली. निर्मात्यांनी व समीक्षकांनी एकत्र बसून आपआपल्या अडचणी सोडवून घ्याव्यात. ही चर्चा फुकट जाऊ देऊ नये.

### संतप्त समारोप

बुधवारी संध्याकाळी स्थानिक कलावंतांचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर विद्याधर गोखले यांनी समारोपाचे भाषण अत्यंत त्वेषाने केले. त्यांनी नाट्य, संगीत, साहित्य व कला या अकादम्यांवर कडाडून हल्ला चढविला. या अकादम्या महाराष्ट्राच्या कलाविकासासाठी कुचकामी आहेत. त्या केवळ काही लब्धप्रतिष्ठितांसाठीच आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी केशवराव दाते, नानासाहेब फाटक आदि नटश्रेष्ठांना पद्मश्रीदेखील मिळू नये ही शरमेची गोष्ट आहे असेही खडसावले. गुर्जरबंधूंनी बडोद्यात प्रचंड आंदोलन झाले असतानाही, हुतात्मे झाले असतानाही त्यांनी संमेलनाला सर्वतोपरी सहाय्य केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

### कशासाठी हा खटाटोप ?

नाट्यसंमेलन हे नाट्य परिषदेचे वर्षातील एक महत्त्वाचे कार्य असते. तरीदेखील या संमेलनाची फलश्रुती काय ? अशी अपेक्षा करू नये असे म्हटले जाते. नाट्यसंमेलन हा उत्साहवर्धनासाठी घेतलेला एक प्रकारचा मेळावा असतो असे म्हटले जाते. पण तीदेखील अपेक्षा प्रस्तुतच्या संमेलनाने पूर्ण केली नाही. किमान गॅदरिंगचेही स्वरूप त्याला आले नाही. कमीत कमी परस्परांचा परिचय व्हावा, तीन दिवस आपण एका सहलीला आलो आहोत त्यातच खेळीमेळीची चर्चा परिचय व्हावा ही अपेक्षाही पूर्ण झाली नाही. काही संमेलनात परस्परांचा परिचय हा कार्यक्रम असतो तोही या संमेलनात नव्हता. या संमेलनात कुणाचा कुणाला मेळ नव्हता. त्या दृष्टीने काही प्रयत्न वा आयोजनच नव्हते.

संमेलनात ठरावही विशेष नव्हते. कारण नाट्य परिषदेविषयी नाट्यक्षेत्रातील व्यक्तींना आपुलकीच राहिलेली नाही. जेमतेम ३०–४० बाहेरगावचे प्रतिनिधी संमेलनाला आले होते. त्यात प्रत्यक्ष रंगभूमीवर कार्य करणारे– निर्माते–कलाकार एखादा अपवाद सोडल्यास संमेलनात उपस्थित नव्हते. मग हे संमेलन असते कोणासाठी ?

नाट्यव्यवसायिकासाठी नाट्य परिषद काही करीत नाही ही जुनीच तक्रार नाट्य परिषदेविषयी आहे. मृत व्यक्तींना हार घालणे, एखादी निबंध स्पर्धा भरविणे, सुवर्णपदके देणे आणि एखाद दुसरे नाट्यशिक्षण शिबिर भरविणे हे नाट्यपरिषदेचे कार्य. मुंबईतील गल्लीबोळातील नाट्यसंस्थाही हे कार्य करू शकते. मग नाट्य परिषद विशेष ते काय करते हे नाट्य व्यवसायिकांचे म्हणणे.

नाट्यसंमेलनाध्यक्षांची निवड वर्षासाठी असते. पण पु. ल., रांगणेकरांसारखे अध्यक्ष येऊनही ते परिषदेसाठी काही कार्य करू शकले नाहीत. वसंत देसाईंनी गतवर्षी नाट्यपरिषदेची वास्तु निर्माण करण्याची घोषणा केली. काही थोडेफार कार्य त्यांनी केले पण तेवढ्यात ते त्या स्थानावरून गेले. आता विद्याधर गोखले यांच्यासारखे स्वतः नाटकात काम करणारे, स्वतः नाट्यसंस्था चालविणारे नाटककार संमेलनाध्यक्ष निवडले गेले आहेत. आमचेअर अध्यक्षांपेक्षा अधिक अपेक्षा श्री. विद्याधर गोखले यांच्याकडून आहेत. त्या पूर्ण होतील अशी आशा आहे.

आगामी नाट्यसंमेलन औरंगाबाद येथे फेब्रुवारीत भरणार आहे. कमलाकर सोनटक्के आणि त्यांचे विद्यार्थी यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे. यंदाचे संमेलन पाहावयास प्रत्यक्ष कमलाकर सोनटक्के बडोद्याच्या संमेलनाला आले होते. आगामी संमेलन अनेक दिवस प्रतिनिधींच्या स्मरणात राहील असे करून दाखविण्याचा विडा त्यांनी उचलला आहे असे समजते. अजंठा वेरूळदेखील प्रतिनिधींना दाखविण्यात येणार आहे असे म्हटले जाते. त्यामुळे या संमेलनाला भरपूर प्रतिनिधी येतील असे वाटते. पाहू या प्रत्यक्षात काय होते ते ! ☐ ☐

# 'प्रयोग' चे एक वर्ष

महाराष्ट्रीय कलोपासक या पुण्यातील नाटचसंस्थेने 'प्रयोग' या उपक्रमाचे एक वर्ष पूर्ण केले. प्रत्येक महिन्याला नवी एकांकिका आणि त्या एकांकिकेचा प्रत्येक बुधवारी एक असे चार प्रयोग अशी योजना होती. या उपक्रमाची काही वैशिष्ट्ये होती, पथ्ये होती, ती वर्षभरात कटाक्षाने पाळली गेली. एक म्हणजे एकांकिकेचा प्रयोग यापूर्वी पुण्यात झालेला नसावा. दुसरे म्हणजे प्रेक्षकांना प्रवेश विनामूल्य होता. अर्थसाह्य ऐच्छिक ठेवलेले होते.

'प्रयोग' संबंधातील अनेक गोष्टींची नोंद संस्थेतील कार्यकर्त्यांनी ठेवलेली आहे. त्यातील काही लक्षवेधक गोष्टी अशा— १) वर्षात एकूण १३ एकांकिका सादर झाल्या. २) ५० बुधवारी प्रयोग सादर झाले. ३) त्याच एकांकिकांचे इतर ठिकाणी ३६ प्रयोग झाले. ४) नवे कलाकार ५६ होते. ५) एकूण वर्षामधील प्रेक्षकांची संख्या ५२६५ होती. ६) वर्षात ऐच्छिक रूपाने जमलेले आर्थिक सहाय्य रु. १२१२–०३ पैसे. (७) प्रत्येक बुधवारची जमा किमान २८ पैसे आणि कमाल ११६ रु. ८) सरासरी २३ पैसे प्रेक्षकाकडून आले.

रंगभूमी आणि प्रेक्षक यांच्या संदर्भात ही आकडेवारी खूपच बोलकी आहे. अनेक दृष्टीने विचार करायला लावणारी आहे. प्रेक्षकाला नाटक विनामूल्य ठेवले तर किती प्रतिसाद मिळतो आणि ऐच्छिक आर्थिक मदत देण्याची वृत्ती किती प्रमाणात असू शकते, हे यावरून समजू शकेल. हा अनुभव जमेस धरूनही कलोपासक पुढील वर्षाला (१ मे ७४ पासून) प्रारंभ करताना आपल्या भूमिकेत बदल करणार नाही, ही आनंदाची गोष्ट आहे. तरीही प्रेक्षक म्हणून आपणा साऱ्यांची जबाबदारी अशी आहे, की आपण किमान तरी अर्थसाह्य प्रत्येक प्रयोगाच्या वेळी केले पाहिजे. ज्यांना शक्य आहे अशांनी एक मुठीने अधिक रक्कम देऊन उपक्रमाची आर्थिक चिंता दूर करण्यास सहाय्य करावे. निदान एक रुपया तर देण्यास प्रेक्षकास काहीच हरकत नाही!

वर्षभरात झालेल्या एकांकिकांच्या प्रयोगावर त्या त्या वेळी मी ('माणूस' मधून) अभिप्राय दिलेले आहेतच. वर्षाचे अवलोकन करीत असताना अनेक गोष्टी डोळ्यासमोर येऊन जातात. एकतर सततपणाने एखादा उपक्रम यशस्वी करणे ही सामान्य गोष्ट नाही संकल्प करणे सोपे असते. प्रारंभी सर्वांचाच उत्साह असतो. हार्दिक पाठिंबा असतो. परंतु पुढे काहीना काही कारणाने माणसे माघार घेतात. उपक्रमाच्या उद्गात्याला—निर्मात्याला एकाकीपणात सारेजण सोडून जातात. तसे या ठिकाणी घडले नाही. अंतर्गत स्वरुपाच्या अनेक अडचणी आल्या पण त्यावर संस्थेतील कार्यकर्त्यांनी मात केली. त्यामुळेच संस्थेचे चिटणीस राजा नातू आणि त्यांचे लहानथोर सर्व साथीदार अभिनंदनास पात्र आहेत.

पण त्या निमित्ताने काही हितगुजही करावेसे वाटते. वर्षातल्या सर्वच एकांकिकांच्या निवडीमागे विशिष्ट दृष्टिकोन आहे असे जाणवले नाही. एकांकिका निवडीचे स्वातंत्र्य दिग्दर्शकाला जरूर असावे, पण त्या एकांकिकेला किमान साहित्य गुणांचे मोल असावे, नाटचगुणाचे आव्हान असावे, प्रयोग क्षमतेचे भान राखले जावे. केवळ एखादी एकांकिका करून महिना 'साजरा' केला जाऊ नये. प्रेक्षकाचे रंजन करणे हा रंगभूमीच्या संदर्भातला एक महत्त्वाचा भाग जरूर आहे, पण ते अंतीम साध्य नाही. प्रेक्षकाच्या स्तरापर्यंत येऊन त्यांना सुखवण्यासाठी किंवा केवळ त्यासाठीच सर्व शक्ती पणाला लावण्याचे काहीच प्रयोजन नाही. एकांकिकेची निवड समकालीन रंगभूमीला समांतर राहील, स्वतःचे असे काही वैशिष्टच प्रस्थापित करील अशी असावी.

जितक्या प्रमाणात नवनवीन विषयांवरच्या विविध आकृतिबंधाच्या एकांकिका सादर होतील जितक्या प्रमाणात प्रेक्षकालाही आवाहन आणि आव्हान मिळू शकेल. कारण या उपक्रमात प्रेक्षकाला एक प्रकारे प्रशिक्षण मिळणार आहे. ते 'प्रयोगा'तूनच मिळणार आहे. त्याला याठिकाणी रंगभूमीवरील अनेक प्रयोग पाहण्याची सवय लागली तर त्याच्या मनातील मोठ्या रंगभूमीविषयीच्या अनेक भ्रामक कल्पनांना विराम मिळेल. त्याची नाटक विषयक एक दृष्टी तयार होऊ शकेल. अर्थात ही प्रक्रिया संथ गतीची आणि धीराची आहे, याची मला जाण आहे. या उपक्रमात प्रेक्षकाशी प्रयोगानंतर संवाद करण्याची व्यवस्था पाहिजे. त्याचे स्वरूप भिन्न भिन्न प्रकारचे असू शकेल. मराठी प्रेक्षक हा नाटकावर चर्चा करण्यास अनुत्सुक असतो. जो थोडाफार उत्सुक असतो त्याची टीका-टिंगल होते. अशा या अनुत्सुक, तटस्थ, रंजनाच्या पातळीवरून न हालणारा प्रेक्षक बोलता करणे हे या उपक्रमाचे वैशिष्टच ठरावे.

'प्रयोग' हा उपक्रम वर्षभर टिळक रोडवरच्या जोशी लोखंडे मुद्रणालयात सादर झाला. माझी विनंती अशी, की पुण्यातला तीन चार ठिकाणी या एकांकिकांचे प्रयोग व्हायला हवेत. एका अर्थी हा रंगमंच फिरता हवा. त्यामुळे बहुविध स्वरूपाचा प्रेक्षक लाभेल. प्रतिसादाचे स्वरूपही पालटेल. उपक्रमाचा लौकिक दूरवर पोहचू शकेल.

या उपक्रमाच्या संदर्भात दोन गोष्टींची खंत मनात वर्षभर राहिली. एकतर ('माणूस 'स्वराज्य' साप्ताहिके) वगळता पुण्यामुंबईमधल्या वृत्तपत्रांनी या उपक्रमाची नोंद देखील घेतली नाही, ही स्पृहणीय गोष्ट नाही. कारणे काहीही असोत पण असे घडायला नको होते. दुसरी गोष्ट म्हणजे (काही सन्मान्य अपवाद वगळता) नाटचक्षेत्राशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंधित असणाऱ्या व्यक्तींची जाणवलेली अनुपस्थिती. ती तर अक्षम्य आहे. रंगभूमीशी निगडीत असणाऱ्या सर्वांनी महिन्यातून एका बुधवारी तासभर वेळ काढणे ही गोष्ट अवघड नाही. आणि ती अवघड असली तरी आवश्यक म्हणून करणे क्रमप्राप्त आहे. इतकेच नव्हे तर मी म्हणेन मुंबईमधल्या प्रायोगिक रंगभूमीत काम करणाऱ्या लोकांनी एक दिवस सवड काढून येणे अगत्याचे आहे. नुसते यावे असे नाही तर या उपक्रमाच्या निमित्ताने रंगभूमीविषयक जे अनेक कलात्मक प्रश्न (काही जुने काही नवे असे) निर्माण होत आहेत त्याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. कारण माझ्या दृष्टीने प्रायोगिक नाटचसंस्थांनी केलेला कोणताही नवा उपक्रम हा एक अभ्यासाचा विषय असतो. निदान तसा तो असायला हवा.

१ मे १९७४ पासून 'प्रयोग' चे दुसरे वर्ष सुरू होत आहे. गतवर्षीचा अनुभव ध्यानात घेऊन त्याचे स्वरूप ठरवले जाईलच. नवनवीन एकांकिका पहायला मिळतील. त्यामुळे प्रायोगिक रंगभूमीत नवचैतन्य निर्माण होईल अशी आशा बाळगायला काहीच हरकत नाही. लेखन, दिग्दर्शन, अभिनय या दृष्टीने काही महत्त्वाच्या ठरलेल्या एकांकिका म्हणजे 'सामना' 'सुस्त्री चातुर्यदर्शन' 'खोटं नाटक' 'डॅडी' इत्यादी. अशा स्मरणीय एकांकिकांसारख्या नव्या एकांकिका पाहाण्याचा योग पुन्हा यावा.

—वि. भा. देशपांडे

# गर्म हवा

## फाळणीनंतरच्या मुस्लिम जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण

भारतामध्ये काही समस्या अशा आहेत की त्यावर वेळ आली की भारतीय राजकीय पुढारीच नव्हे तर व्यक्ती स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य, कला स्वातंत्र्य वगैरे अनेक स्वातंत्र्याचा कैवार घेणारी साहित्यिक व कलाकार मंडळी मूग गिळून बसतात. राजकीय वा सामाजिक नेतेमंडळी तिचा आपापल्या परीने उपयोगही करून घेतात तेव्हा त्यांचे मुकेपण कळू शकते. परंतु लेखक-कलाकार मंडळी त्यागोष्टी का टाळतात कुणास ठाऊक ? अशाच एका वादग्रस्त समस्येवर युनिट ३ एम. एम. ने निर्माण केलेला गर्म हवा हा चित्रपट बघण्याचा योग आला. आणि ह्या दृष्टीने एक चांगला चित्रपट बघण्याचे समाधानही मिळाले. ह्या चित्रपटाची अनेक वैशिष्टये आहेत. पहिले म्हणजे कोणीही धाडस करणार नाही अशा वादग्रस्त विषयाची निवड. परंतु अशा विषयाची निवड करूनही दिग्दर्शकाने येथे कसलाही प्रचारी भडकपणा न आणता कोणत्याही राजकीय व सामाजिक समस्येच्याखाली जो सामान्य माणूस दडलेला असतो तो शोधण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. तो प्रयत्न करताना चित्रपट माध्यमाची कलात्मक जाण दिग्दर्शकाने सतत ठेवल्याने आपणास जागोजाग दिग्दर्शक आढळतो. दुसरे वैशिष्टय म्हणजे ह्या चित्रपटाचे छायाचित्रण करताना कॅमेऱ्याचा अत्यंत सुंदर वापर केला आहे. काही काही शॉटस अगदी वेगळे व नावीन्यपूर्ण आहेत. तिसरे वैशिष्टय ह्या चित्रपटातील पात्रांची केलेली निवड आणि वातावरण निर्मितीही एकमेकास पूरक झाली असून त्यामुळे सबंध चित्रपटच प्रत्ययकारी झाला आहे. ह्या चित्रपटातील वातावरण अस्सल मुस्लिम वाटते व ह्या वातावरणात वावरणारी माणसे मुस्लिम वाटतात. हे ह्या चित्रपटाच्या यशाचे गमक मानावे लागेल.

इस्मत चुगताई ह्यांची ही कथा. फाळणी झाल्यावर हिंदु मुस्लिमांचे अनेक दंगे झाले. नंतर काही दिवसांनी गांधीजींचाही खून झाला. ह्या महत्त्वपूर्ण घटनेनंतर भारतामध्येच राहणाऱ्या एका मुस्लिम कुटुंबावर राजकीय घटनेचा कसा परिणाम होतो व एका सत्प्रवृत्त मुसलमानाची कशी ससेहोलपट होते हे ह्या कथेत मांडले आहे.

फाळणीनंतरची हवा एकदम 'गर्म' झालेली. दोन्ही समाजात वातावरण तंग. सलीममिर्झा हा आग्र्याचा मोची. कातड्याच्या बुटांचा व्यवसाय करणारा. त्याचा छोटा कारखाना असतो. शिवाय वाडवडिलार्जित हवेलीही असते. सलीम तसा सत्प्रवृत्त भला माणूस, अल्लावर हवाला ठेवणारा, चारपाच दिवस जातील व ही गर्म हवा थंड होईल, मग सारे कसे व्यवस्थित चालेल असे मानणारा, तर त्याचा भाऊ हालीम मिर्झा एकदम लुच्चा. स्वतःला मुस्लिम लीगचा नेता म्हणविणारा. जीनानंतर मीच असा बायकोसमोर बकवास करणारा. हम आखरी दम तक हिंदुस्थान छोडके नही जायेंगे, निदान मी तरी जाणार नाही अशा थापा सभांमधून मारून तो हळूच पाकिस्तानला पळून जातो. पाकिस्तानला जे मुस्लिम गेले त्यांच्यामुळे बाजारात इतरांची पत गेली. उरलेल्यांना कोणीच कर्ज वा पैसा देईना. कारण हे मुसलमान कधी गुपचूप जातील ह्याचा नेम नाही. त्यामुळे सलीमला धंद्यात तग धरता येत नाही. छोटा मुलगा कॉलेजात. थोरला धंद्याचेच बघतो. मुलगी अमिना लग्नाची असते. ती ज्याच्यावर प्रेम करते तोही परत येईन असे सांगून पाकिस्तानला जातो. म्हणजे हळू हळू सारे नातेवाईक पाकिस्तानला चालले असताना सलीम मात्र निश्चयाने तेथेच पाय रोवण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा गर्म हवेत हवेली जप्त होते. कारण ती हलीमच्या नावावर असते. जागेसाठी शोधाशोध. शेवटी कशीतरी जागा मिळते. धंदा कसा चालवायाचा हीच फिकीर असते. धाकटा ग्रॅज्यूएट होऊनही त्याला नोकरी मिळत नसते. प्रत्येक ठिकाणी 'तुम पाकिस्तानमे क्यों नही जाते' असे त्याला 'डोस' मिळतात. इकडे लीगवाले आमच्यात येत नाहीत म्हणून सलीमला त्रास देत असतात. सलीम मनात खट्टू झालेला असतो. जे चाललंय ते काही ठीक नाही असे त्याला वाटत असते. अचानक अमिनाचा प्रियकर कासीम गुपचूप भारतात येतो. परंतु लग्न व्हायच्या आधीच तो पकडला जाऊन परत त्याची रवानगी पाकिस्तानला होते. इकडे अमिनाची दादीमाँ हवेलीच्या प्रेमाने पछाडते. आधी ती हवेली सोडीतच नाही. निदान एकदा तरी हवेलीत न्या म्हणून ती सलीमला सांगते. तिच्या इच्छेसाठी हवेलीत तिला नेतात. तिथेच ती प्राण सोडते. सलीम टांग्यातून जाताना हातगाडीवाल्याला धक्का लागतो. त्यावरूनच दंगा पेटतो. त्यात सलीमचा बुटाचा कारखाना जाळला जातो. सलीमचे डोकेही फुटते. सलीम घरीच जोडे तयार करून ते विकू पाहतो. परंतु त्याच्यावर पाकिस्तानी एजंट म्हणूनही आळ येतो. इतर मोची लोक मोर्चा काढतात त्यात तो भाग घेत नाही त्यामुळे तेही त्याला थारा देत नाहीत. त्याला कुठेच तोंड काढायला जागा राहात नाही. इकडे अमिनाचे आणि शमशाद ह्या तरुणाचे जमते. तो तिच्या केव्हापासून मागे असतो. पण तिचे कासिमवर प्रेम असते. तो गेल्यावर अमिना शमशादला होकार देते. पण शमशादही पाकिस्तानला जातो. आणि अमिना दुःख सहन न झाल्याने मनगटावर ब्लेड फिरवून आत्महत्त्या करते. धाकटा मुलगा मोर्चा वगैरे चळवळीत

पडतो. पण ते सलीमला मंजूर नसते. सरळमार्गाने जे होईल ते होईल. थोरला मुलगा वैतागून पाकिस्तानला जातो. शेवटी सलीमची अशी नाकेबंदी होते की मनात नसतानाही तो शेवटी पाकिस्तानला जायला तयार होतो. टांग्यातून तो स्टेशनवर जात असताना वाटेत बेकारांचा मोर्चा येतो. धाकटा मुलगा सलीमला विचारून मोर्चात जातो. सलीमलाही कळून चुकते आता दुसरा उपाय नाही. कुठेही गेले तरी हेच असणार. तोही पाकिस्तानला न जाता मोर्च्यात सामील होतो.

अशी ही कथा दिग्दर्शक एम. एस. सत्थ्यूने मोठ्या बहारीने पडद्यावर मांडली आहे. विशेषतः घरातील वातावरण चित्रित करताना घेतलेले शॉटस् अर्थपूर्ण वाटतात. कसल्याही सेटस्च्या भानगडीत न पडता प्रत्यक्ष चित्रणावर भर दिल्याने सारे कसे जिवंत वाटते. हवेलीच्या खिडक्या, दारे, त्यावरील पडदे, आतील सजावट, भांडी, जेवणखाणे ह्या साऱ्यांमुळे सारे वातावरण मुस्लिम झाले आहे. कॅमेऱ्यानेही आडवे-उभे छेद घेणारे काही शॉटस् परिणामकारक घेतले आहेत. सलीम कर्ज मागण्यासाठी जातो किंवा घराच्या शोधात असतो तेव्हा बँकवाला वा घरमालक न दाखविता घेतलेले शॉटस्, म्हातारी दादीमाँ हवेली सोडीत नाही तेव्हांचा प्रसंग, किंवा ती हवेलीत परत येते तेव्हा डोलीतून आणताना दुल्हन वाटावी असे पार्श्वसंगीत, तिला हवेलीत आल्यावर आलेल्या आठवणी, तिचे अधूनमधून मार्मिक बोलणे, अमिना व शमशाद ह्या दोघांच्या मीलनाचे दर्ग्यातील व ताजमहालातील शॉटस्, सलीम हवेली सोडून जाताना टांग्यातील सामानात हलीमचा फोटो उलटा दाखविला, तसेच ग्रूप फोटो घेताना कॅमेऱ्याच्या उलट-सुलटतेचा कल्पनारम्य उपयोग, दादीअम्माच्या मृत्यूचा प्रसंग व अमिनाची हृदयद्रावक आत्महत्या असे अनेक प्रसंग आहेत की तिथे आपल्याला दिग्दर्शक सत्थ्यू जाणवल्याशिवाय राहात नाही.

कैफी आझमीचे अर्थपूर्ण संवाद हे ह्या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य. अतिशय संयमाने लिहिलेले हे संवाद जिवंत माणसांचे वाटतात. त्या संवादातून जशी उपहासगर्भता आढळते तशीच काही ठिकाणी खुसखुशीत नर्मताही आढळते. मधूनच केलेली शेरशायरी 'दाद 'ही घेऊन जाते. दादीअम्माचे बोलणे तर मोठे मजा आणते.

ह्या चित्रपटातील पात्रे निवडण्यातच दिग्दर्शकाने अर्धे यश मिळविले आहे. बलराज सहानीसारखा नट सलीमच्या कामासाठी मिळाला हे दिग्दर्शकाचे सद्भाग्यच. परंतु ह्या चित्रपटातील लक्षात राहतात ती तीन माणसे. सलीम, अमिना आणि बूढी दादी अम्मा. गीता ह्या नटीने अमिनाचे काम बहारदार केले आहे. तिनेही भूमिका इतकी सहज केली आहे की, आत्महत्या करताना अमिना आपल्याला चटका लावून जाते. तिला अभिनयाची चांगलीच जाण असून वाट्याला आलेल्या भूमिकेला तिने चांगलाच न्याय दिला आहे. परंतु बुढ्या दादीअम्माचे काम केलेल्या बादर बेगम ह्या वृद्धेने तर कमालच केली आहे. तिने आपल्या कामात अशी काय धमाल केली आहे की, मला पाथेर पांचाली व एअरपोर्ट ह्या चित्रपटातल्या दोन म्हाताऱ्यांची एकदम आठवण झाली. दादीअम्माचा विलंदरपणा पाहून 'एअरपोर्ट'-मधील ती इब्लिस म्हातारी आठवते. तर हवेलीच्या प्रेमाने व्याकुळ झालेली दादीअम्मा मरताना पाथेर पांचालीत वृद्धेची याद करून देते. म्हणूनच मला वाटते, दिग्दर्शक सत्थ्यू ह्यांनी बडी बडी स्टार्स मंडळी न घेता जी चांगली मंडळी निवडली त्यामुळेच चित्रपटात एकप्रकारे जिवंतपणा आला आहे.

चित्रपटाचे पार्श्वसंगीत योग्य असून दर्ग्याच्या भेटीच्या वेळी गायलेली कव्वाली वातावरणात भर टाकते चित्रपटाचा शेवट एकंदर कथेची तर्कशुद्ध परिणती न वाटता फसलेला वा लादलेला वाटतो. (इति–विजय तेंडुलकर. हल्ली विजय तेंडुलकर फार बोलतात. पूर्वी आम्ही बोलायचो आणि ते टेपरेकॉर्ड व्हायचे. आता आपल्यालाच टेपरेकॉर्डर व्हावे लागतेय. हे लक्षण ठीक नाही) परंतु मला तसे वाटत नाही. माणसाचे जीवन तर्काच्या पलीकडचे असते. सलीमसारखा एखादा का, असे बरेच अपवाद आहेत की, ते भारतातच राहिले.

गर्म हवाने प्रथमच एका भारतीय समस्येला न भिता स्पर्श केला आहे. हिंदी चित्रपटसृष्टीमधले हे त्याचे आगळेपण आणि हे धाडस करून दिग्दर्शक सत्थ्यूने एक कलात्मक चित्रपट काढल्याबद्दल आपले त्याला धन्यवाद तर त्याला मदत करणाऱ्या फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनलाही धन्यवाद.

□ □

## विक्टरी टेस्ट्स–बौद्धिक आणि बंडल

फिल्म डिव्हिजनने गेल्यावर्षी येऊन गेलेल्या टोनी लुईस संघाबरोबर भारताच्या झालेल्या पाच कसोटी सामन्यांची डॉक्युमेंटरी नावाचे बंडल निर्माण केले आहे. ते पहायला मिळाले. या पाच कसोटी सामन्यात काय झाले ?– सोलकर अबिदचे ते अविस्मरणीय झेल, विश्वनाथचे मुंबईचे शतक. दोन्ही संघाची एकमेकावर कुरघोडी करण्याची ईर्षा, अशा बऱ्याच गोष्टींच्या वेळी कॅमेरा भलतीकडे आणि सामना एकीकडे असे झालेले दिसत होते. एकूणच पाच सामन्यांची त्या त्या वेळी प्रदर्शित करण्यासाठी तयार केलेल्या डॉक्युमेंटरीजचे हे बंडल होते. आणि त्यांना जोडण्यासाठी राजू भारतन या क्रिकेटवर धावते समालोचन करणाऱ्या असामीचे बौद्धिक होते. हा प्रत्येक वाक्या वाक्याला कोटी करून, हैराण करतो आणि बौद्धिक देताना त्याचा चेहरा पहाणे नकोसे वाटते. त्याच्यामुळे सलीम दुराणीवर इतका काही कॅमेरा फोकस झालाय की तो चमचेगिरीचा प्रकार वाटतो. एकूण फिल्म डिव्हिजनवाल्यांना हेही चालते.

□

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. ११ ते १७ मे ७४**

## पंतप्रधान इंदिरा गांधी अगतिक होण्याची शक्यता

रवी हा राजकारणी वृत्तीचा ग्रह भारत देशाला याच आठवड्यात प्रतिकूल झाला आहे. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना तर तो प्रतिकूल आहेच, त्यामुळे देशातील सत्तारूढ सरकारे गोंधळात सापडतील. खुद्द इंदिरा गांधी काही वेळा अगदी अगतिक होतील. मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी (काही) उघड उघड त्यांच्या विरुद्ध कारस्थानाला याचवेळी सुरुवात करतील. यात बिहार व मध्यप्रदेशचे कॉंग्रेसपक्षीय नेते आघाडीवर असतील. रेल्वे संप फार दिवस चालणार नाही. पण रेल्वे मंत्री ललित मिश्र यांचे मंत्रिमंडळातील 'दिवस भरत' आल्याचे प्रत्ययाला येईल. गुजराथमध्ये नव्या नेत्याचा शोध लागेल. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कुरबूर सुरू होईल. जागतिक राजकारणात निक्सन आक्रमक पवित्रा घेतील तर भुत्तो भारताविरुद्धच्या कारस्थानाला सुरुवात करतील. ◻

### मेष : माणसे जोडा

आपला स्वभाव मुळातच तापट आहे. त्यात मंगळ व शनी तिसरे तर गुरू बारावा आहे. पहिले दोन तीन दिवस चंद्रबळ छान आहे. तेव्हा महत्त्वाची कामे पहिल्या दोन-तीन दिवसातच उरकून घ्या. नोकरीचा तुमचा स्वभाव नाही. तरी पण ती करावी लागते. मंगळवार ते शुक्रवार एखाद्या साध्या कामामुळे वरिष्ठांबरोबर तीव्र मतभेद निर्माण होतील. पण त्याबाबतीत तुटेपर्यंत ताणू नका. आजचे दिवस फार वाईट आहेत. उगीचच वरिष्ठांच्या गैरमर्जीमुळे बेकार होण्याची वेळ येऊ देऊ नका. हेही दिवस जातील. आवडत नसलेले काम करावे लागेल. काही वेळा मानहानीचा प्रसंग येईल. पण शेवटी तुमचा जय होईल. उष्णतेच्या आजाराने हैराण व्हाल. छातीत धडधडणे, उगीचच भीती वाटणे, मन निरुत्साही राहाणे असे काही तरी घडेल. **महिलांस** : तापट वृत्तीला संयमाचे कुंपण हवे. आर्थिक बाजू भक्कम राहील. ◻

### वृषभ : महत्त्वाचा आठवडा

तुमची रास शुक्रधर्माची असली तरी चंद्र तुमचा मित्र आहे. शनिवार ते बुधवार चंद्रबळ छान आहे. त्यामुळे अनेक बाबतीत या आठवड्यात तुम्ही यश वा विजय मिळवणार आहात. शनिवारी तुमच्या उत्तुंग आशा आकांक्षा प्रसन्नतेचे नवे रूप आकार घेतील. रवी व गुरूच्या तेजाने तुमचे सामर्थ्य वाढेल. तुमच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव येईल जे लोक तुमचा शब्द मानीत नव्हते, तुमचा अपमान करीत होते तेच लोक आता तुमचा शब्द झेलू लागतील. प्रामुख्याने मंगळवार ते शुक्रवार या काळाची नोंद घ्या. तुमच्या उद्योगाच्या बाबतीत कर्ज वा पैसा मिळवण्यात तुम्ही अगदी निराश झाला होता ती निराशा पार विरून जाईल असा तुमच्या सारखा निर्णय होणार आहे. नोकरीत मात्र थोडी काळजी घ्या. **महिलांस** : टेलिफोन एक्स्चेंज, सौंदर्यप्रसाधने या उद्योगातील स्त्रियांना शुभवार्ता. ◻

### मिथुन : व्यक्तित्व उंचावेल

शनी-मंगळ हे दोन्ही ग्रह एकमेकांचे कट्टर शत्रू तर आहेतच पण ते उग्र वृत्तीचेही आहेत. ते ग्रह त्रास देतात म्हणजे त्यांच्या शत्रुत्वाचा माणसांना त्रास होतो. गेल्या महिन्यात झालेली युती तुमच्या चंद्राजवळच झाली होती. तुम्हाला त्याचा त्यावेळी थोडाफार त्रास झाला असला तरी आता मात्र हे ग्रह तुमच्या जीवनाला, तुमच्या स्वभावाला चांगली कलाटणी देणार आहेत. अचानकपणे एखादा दूरचा प्रवास असा घडेल की त्यातून होणारी एका धनिकाची ओळख भविष्य काळात तुम्हाला चांगली लाभदायक ठरावी. तुम्हाला जरी साडेसाती असली तरी आता तुम्हाला चांगले दिवस येऊ घातले आहेत. नोकरीत आजवर झालेले नुकसान भरून निघेल. बढतीप्रमोशनचेदेखील यावेळी जमावे. आर्थिक परिस्थितीत सुधारणा. **महिलांस** : स्वतःच्या वागण्याने उगाच मोहोळ उठवू नका. पैसे जपून वापरा. ◻

### कर्क : सावध राहावे

चंद्र हा ग्रह तसा तुमचा मित्रच आहे. तो सध्या साडेसातीच्या फेऱ्यात सापडला आहे. शिवाय सध्या मंगळदेखील प्रतिकूलच आहे. पण एकटा केतूदेखील तुमचे सारे तंत्र बदलू शकेल. तो अकरावा आहे. प्रामुख्याने आर्थिक बाबतीत बरीच उलाढाल घडणार आहे. सोमवार ते गुरुवार या दिवसाची कटाक्षाने नोंद घ्या. शुभ राशीवर तुमचा विश्वास असेल तर तुमच्या शुभराशी समजून घ्या व तसे वागा. जन्माची ददात मिटेल. लॉटरीतदेखील धनलाभ संभवतो. नोकरी धंद्याची स्थिती तशी एकंदरीत उत्तम राहील पण सावध राहावयास हवे. हातून कोणतीच चूक होऊ देऊ नये. विनाकारण चूक होणारच नाही असे नाही. पैशाच्या व्यवहारात दक्ष राहावे. **महिलांस** : यावेळी धांदरटपणा करू नका. नोकरीत असणाऱ्यांनी अधिक जपावे. ◻

### सिंह : बंगला मिळेल

या आठवड्याची सुरुवात सुखस्थानच्या चंद्राने होत आहे ही एक योगायोगाची गोष्ट होय. मातृसुख, स्थावराची व राहात्या जागेची प्राप्ती हे सुखस्थानाचे खास वैशिष्ट्य आहे. आपणास परिस्थितीप्रमाणे याची प्राप्ती

होणार आहे. ज्याला राहायला साधीसुधी जागा हवी आहे त्याला शनिवार ते सोमवार या दरम्यान ही जागा मिळून त्याची वणवण संपेल. ज्यांना स्वतःचा बंगला घ्यावा असे वाटते त्यानी अवश्य प्रयत्न करावेत. त्यांची फार दिवसाची इच्छा पूर्ण होईल. आर्थिक दृष्टीने हा आठवडा अनकूल आहे रेस वा लॉटरी यापासून बुधवारी वा गुरुवारी लाभ संभवतो. एखाद्या व्यक्तीबरोबर अनेक दिवस तुमचे जे भांडण होते ते यावेळी गोड शेवट होऊन संपुष्टात येईल. तुमच्यापैकी एखाद्या भाग्यवंताला नव्या वस्त्राचा लाभ होईल. महिलांस : आजकाल दागिने घालण्याची इच्छा बाळगणे जरा कठीण आहे. पण तुमचे 'ते' ही इच्छा पुरी करणार आहेत. ¤

**कन्या : मित्रांचे सहकार्य**

रवी एवढा अनुकूल नसला तरी तिसरा चंद्र हा तुमच्या मनाला खरोखर शीतल चांदण्याचा स्पर्श करून तुमच्या मनाला आनंद देईल. वृश्चिक चंद्र तब्येत जराशी नाजूक ठेवील पण तरीही मन प्रसन्न ठेवील. रविवार ते बुधवार एखाद्या दीर्घ काळाच्या आजारातून सुटका करील. कृति आणि उक्ती यात सुसंवाद येईल. हातून अनेक चांगल्या गोष्टी घडतील. देवधर्म, उपासना मनासारखी हातून घडेल. सुविख्यात अशा एखाद्या श्रेष्ठ व्यक्तीकडून मार्गदर्शन होईल. तुमच्यातील असामान्य गुणांना, सुप्त इच्छांना स्पर्श होऊन त्याच्या प्रकाशात तुमच्या महत्त्वाकांक्षा उजळून निघतील. नोकरी, व्यवसाय व्यापार, प्रवास इत्यादी बाबतीत काहीतरी दीव्य भव्य घडावे असा योग आहे. नोकरीत होणारा अन्याय दूर होईल. वरिष्ठांना तुमच्या कामाचे व कर्तृत्वाचे महत्त्व पटेल व ते सहानुभूतीने विचार करतील. महिलांस : तुम्ही मनातील गैरसमज व संशय काढून टाका. नोकरीत समाधान. ¤

**तूळ : कौटुंबिक आनंद**

हर्शलच्या सुप्त शक्तीचा तुम्हाला आता प्रत्यय येऊ लागलाच आहे. गुरू-हर्शलचा त्रिकोण योग असामान्य व भव्य कर्तृत्व बहाल करतो. आजवर तुम्हाला याचा यावा तसा प्रत्यय जरी आला नाही तरी धनूचंद्रापासून याचा प्रत्यय येऊ लागणार आहे. मंगळवार ते गुरुवार या तीन दिवसाची मद्दाम नोंद घ्या. नोकरीत काहीतरी भव्य घडावे असे वाटते. आजवर तुमचा एखादा अधिकार डावलला गेला असला तर त्यात बदल होईल. प्रामुख्याने प्रमोशन, बढती यासारखे प्रश्न सुटतील वा मार्गी लागतील. संशोधक, शेतीपदवीधर, विज्ञान शास्त्रज्ञ यांना हा काळ अनुकूल आहे. व्यापारात विशेष करून रेशीम, सोने, सौंदर्यप्रसाधने, उंची कापड याचा जे लोक व्यापार वा उद्योग करतात त्यांना आर्थिक स्थैर्य लाभेल. रेस, लॉटरी यात अल्प फायदा होईल. परदेश प्रवासाचे समर्थ योग आहेत. विवाहाचे रेंगाळणारे प्रश्न सुटतील. महिलांस : परीक्षेत मोठे यश मिळेल. स्पर्धा जिंकाल. अभिनय गुणांना वाव मिळेल. ¤

**वृश्चिक : निराशा नको**

आपण कुणाच्या गुलामगिरीत राहावयाचे, नाही पण कितीही मोठा असला तरी त्याला मात्र आपला अंकित करावयाचे हे तुमचे मुख्य सूत्र. पण ग्रहांच्या हाती एवढे मोठे अधिकार आहेत की तुमचे हे मूलभूत विचार त्यांना सध्यातरी मान्य होण्यासारखे नाहीत. त्यामुळे मार्गदर्शन समजून तुम्ही तशी पावले टाकाल तर तुमचे नुकसान टळेल. शनी-मंगळ युती तुमच्या अष्टमस्थानी होऊन गेली आहे. त्याचे परिणाम अजून आहेतच. शिवाय हर्शल बारावा तर गुरू चौथा. माझ्यापेक्षा सारे शहाणे ही वृत्ती सध्या ठेवा. कोणत्याही बाबतीत नुकसान होणार नाही. तुमचे कुणाकडून पैसे येणे असतील तर भांडू नका. गरजेपुरता पैसा उपलब्ध होईल. मंगळवार ते शुक्रवार पैशासंबंधी त्रास होणार नाही. शनिवार ते सोमवार नोकरीत त्रास होईल. कामाचा ताण वाढेल. उद्योगात पेचप्रसंग निर्माण होईल. प्रवास नको. महिलांस : अतिरेकी स्वभावाला क्षेत्र मिळेल. पण निराश होऊ नका. नोकरीत काम होईल. ¤

**धनू : मध्यम मार्ग अनुसरा**

गुरू हा तुमचा राशीस्वामी आहे. तुम्ही रोजच काही तरी उपासना चालू ठेवली तर त्यामुळे तुमचा फायदा होईल. तुमची प्रगती आणि ईप्सित उपासनेमुळेच साध्य होईल व अपेक्षित ते साध्य करू शकाल. गेल्या काही दिवसात तुमच्या संसारात वैताग आला असेल, पण त्यालाही ग्रहच जबाबदार आहेत. पत्नीबरोबर वाद घालू नका. भांडण वाढवू नका. कायद्याचा विचार तर अजिबात मनातून काढून टाका. तंटा अगर भांडण यात मिळते जुळते घेण्याची वृत्ती ठेवा. शनिवार ते मंगळवार अनुकूल आहे. आर्थिक व्यवहार फायद्याचा होईल. व्यापारात चार पैसे मिळतील. घरच्या संसारात तशी पैशाची उणीव भासणार नाही. गुरुवार-शुक्रवार नोकरीत मन रमेल. रजा मात्र मिळणार नाही. वरिष्ठांबरोबर गोड बोलून काम करून घ्या. बेकारांना थोडेफार काम मिळेल. महिलांस : प्रवास अर्धवट राहील. हट्ट करू नका. नोकरीत जरा दमाने घ्या. वरिष्ठांना सहानुभूती वाटेल. ¤

**मकर : अडचणीवर मात**

तुम्ही सध्या या ना त्या परिस्थितीच्या कोंडीतच सापडले आहात. पण ग्रहांपुढे कुणाचे काही चालत नाही. त्यांची कृपा होईपर्यंत वाट पहावी लागते. तुम्ही त्याला अपवाद ठरणार नाही. शनी-मंगळाची युती तुमच्याबद्दलचे शत्रुत्व वाढवणार आहे. पण तुम्ही प्रतिकाराच्या भानगडीत पडू नका. शनिवार ते मंगळवार चंद्रबळ नाही. नव्या उद्योगात लक्ष घालू नका. तूर्त ती योजना बाजूलाच ठेवा. तुम्ही गिरणीमालक असाल अगर जमीनदार असाल तर एखादा तंटा निर्माण होईल. कामगार अगर हाताखालचे नोकर आक्रमक पवित्रा घेतील. पण तुम्ही संयम दाखवला तर अडचणीवर मात होईल. बुधवार ते शुक्रवार अनुकूल दिवस आहेत. चालू धंदा व्यवस्थित चालेल. ठरलेले बेत पार पडतील. नोकरीत त्रास कमी झाला नाही तरी अगदीच निराशाजनक नाही. गरजेला पैसा मिळेल. पण टिकणार नाही. महिलांस : कुणाचे मन दुखवू नका. परीक्षेत पास व्हाल. वधूपरीक्षेतदेखील यशस्वी व्हाल.

**कुंभ : यशस्वी सप्ताह**

अंतरिक्षातील ज्या राशी सध्या 'विन'-मध्ये आहेत त्यात तुम्ही अग्रक्रमाला आहात. शनी, मंगळ, गुरू, हर्शल, रवी सारेच ग्रह तुमच्या हितासाठी, तुमच्या कल्याणासाठी कटिबद्ध झाले आहेत. काहीही करा, कुठेही

जा; यश व विजय हेच तुमच्याबाबतीत घडणार आहे. हाती माती घेतलीत तरी त्याचे सोनेच होईल. त्यामुळे इच्छा, आकांक्षा व महत्त्वाकांक्षा यांना अनुकूल वळण लागणार आहे. शनिवार ते बुधवार या पाच दिवसांची कटाक्षाने नोंद घ्या. नोकरीत नवे पर्व सुरू होईल. तुमचा कोणताही स्वतंत्र व्यवसाय असो त्यात नवे युग तुम्ही निर्माण कराल. यावेळी तुम्ही भागिदारी सोडा. कोर्टात दावा अगर न्याय मागायचा असेल तर त्याला अनुकूलता आहे. यावेळी पैशाची उणीव जरादेखील भासणार नाही. लॉटरीत तुमचे नशीब वहरून येईल. मानसिक स्थिती निकोप राहील. संसारात आनंद. **महिलांस :** महिलांस नोकरीची संधी मिळेल. सार्वजनिक सन्मानाचा योग आहे. पैसा हाती खेळेल. ◻

**मीन : उपासना करा**

माणसाचे मन शांत असेल किंवा आनंदी असेल तर तो खरोखरी इकडचा पर्वत तिकडे करून टाकील. पण तेच मन जर अस्वस्थ असेल तर संधी येऊन किंवा कर्तृत्व असूनदेखील उपयोग नाही. दैवाला प्रयत्नांची जोड हवीच. हे सारे तत्त्वज्ञान सांगण्याचे तात्पर्य सांप्रत आपण गोंधळाच्या भोवऱ्यात सापडलेले आहात व अजून काही काळ तरी त्यातून सुटका होणे नाही. लगेच निराश होऊ नका. तुमचा भविष्यावर विश्वास असेल तर तो ईश्वरी उपासनेवरदेखील असेलच. गुरू हा तुमच्या राशीचा स्वामी आहे. त्यामुळे प्रगतीसाठी उपासना आवश्यक आहे. शनिवार ते सोमवार व शुक्रवार हे दिवस लक्षात ठेवा. तुम्हाला अचानक प्रवास करावा लागणार आहे. लेखक असाल तर लेखनात खंड पडणार आहे. नोकरीत नवे असे काही घडणार नाही. पण अगतिकता मधूनमधून येईल. पैसा कमी पडणार नाही. पण त्रास कमी होणे नाही. मन निराश राहील. **महिलांस :** संशयी वृत्तीने वावरत राहाल. नोकरीत ताण असह्य होईल.

◻ ◻

## लहानांप्रमाणे मोठ्यांनाही भुरळ घालणारी बालनगरी : पृष्ठ ४ वरून

वनस्पती व प्राणी ह्या साऱ्यांची रोज उपलब्ध होणारी माहिती ह्या सगळ्या गोष्टींचा उपयोग करून घ्यावयाचा ठरवल्यास कधीही न संपणारी ही योजना ठरेल.

वरील कल्पनेच्या आधारावर एक अर्थसंकल्प तयार केला. धंदा म्हणून देखील त्याचे चित्र आकर्षक दिसेल. साधारण माणशी १ रुपया प्रवेश फी धरली. तसेच येणाऱ्या प्रेक्षकांपैकी दर २५ माणसांमागे १ जण राहण्यासाठी ५ रुपये देईल. तसेच ९० टक्के माणसे दिवसाच्या खाण्यापिण्यावर प्रत्येकी २ रुपये खर्च करतील आणि पुस्तकांवर ५ पैसे असे मानले. इतक्या साध्या अपेक्षा मानल्या तरी १० वर्षांत १ कोटी रुपयांच्या वर ह्याची उलाढाल होते. केवळ १५ लाख रुपयांवर देखील ह्या बालनगरीची सुरुवात करता येण्यासारखी असून ८ ते १० वर्षांत ह्या १५ लाखांच्या भागभांडवलाची किंमत तिसऱ्या वर्षी लाभांश द्यावयास सुरुवात करून देखील किमान ३० लाख एवढी होऊ शकेल. याचाच अर्थ १०० रुपयांच्या भागधारकाला १० वर्षांमध्ये १०० रुपयांएवढा लाभांश देऊन वर त्या भागाची किंमत २०० रुपयांपर्यंत जाईल असे दिसते. आणखी बराच तपशील काढून हा अर्थसंकल्प धंद्याच्या भाषेत विस्ताराने मांडता येणे शक्य आहे. थोडक्यात भांडवल गुंतवून उत्पन्न यायला फार काळ लागणारा हा धंदा नव्हे. खेरीज ह्या बालनगरीच्या निमित्ताने शेकडो लोकांना येथे रोजगार उपलब्ध होईल.

ह्या अवाढव्य प्रकल्पाची थोडक्यात माहिती येथे दिली आहे. ह्याहून तपशीलवार चित्र तयार आहे. पण त्याचा विस्तार होणे आवश्यक आहे. ह्या प्रकल्पाचा सुमारे दीड वर्ष माझे मित्र अरुण बेलसरे, डॉ. मनोहर आपटे, सतीश सोमवंशी आणि मी विचार करून ही योजना तयार केली आहे. कोणत्याही क्षेत्रातला माणूस येथे वर्ज्य नाही. तेव्हा ज्याला ज्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारे सहाय्य करण्याची इच्छा असेल, नवीन कल्पना सांगावयाच्या असतील त्यांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :

**बालनगरी योजना**


C/o डॉ. मनोहर आपटे, 'कैलास' मॉडेल कॉलनी, पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेसमोर, पुणे-४११०१६, फोन : ५३६३४.

## 'राजस'ची महाविद्यालयीन कथा-स्पर्धा

पुण्याहून प्रसिद्ध होणारे 'राजस' ललित मराठी मासिक ऑगस्ट ७४ मध्ये पाचव्या वर्षात पदार्पण करीत आहे. दरवर्षी प्रमाणेच यंदाही ऑगस्ट अंकासाठी 'राजस'ने महाविद्यालयीन लेखक लेखिकांसाठी कथास्पर्धा ठेवलेली असून कथा पाठविण्याची शेवटची तारीख २० जून ७४ अशी आहे. रु. १००१-, ७५१-, ५०१-, २५१- अशी पारितोषिकांची रक्कम आहे.

होशी व मान्यवर अशा महाविद्यालयीन लेखक-लेखिकांनी पुढील पत्त्यावर आपले साहित्य पाठवावे.

'राजस' द्वारा श्रीप्रकाशन, ४९५-४९६ शनिवार पेठ, मेहुणपुरा, पुणे ४११०३०



# रेल्वे संपाच्या निमित्ताने.... : पृष्ठ १ वरून

बोलणी करणार नाहीच ! हा सूर लावून बसले आहेत. मोठ्या प्रमाणावर अटकसत्र त्यांनी चालू ठेवले आहे. असा दडपून हा सर्वव्यापी असंतोष शमणार आहे असे सरकारला वाटते तरी कसे ?

‘इंटक’च्या कार्यालयात मोजकीच चार पाच मंडळी होती. आणि दबल्या सुरात थोडी स्पष्ट चर्चा चालू होती. रेल्वे कामगारांचे नेते श्री. मळगी ह्यांच्या आकस्मिक मृत्युमुळे आणि इतर कामगार नेत्यांच्या धरपकडीमुळे ३ मेला मुंबई, ठाणे बंदचा आदेश कामगार सघटनांनी दिला होता. तो आदेश मला समजला तेव्हा मी इंटक कार्यालयाजवळच होतो. प्रतिक्रिया अजमावावी म्हणून आत शिरलो. इंटकचा बंदला, रेल्वे संपाला अधिकृतरित्या विरोध होता, आहे. व म्हणूनच तिथे शिरण्याची मला उत्सुकता होती. आत शिरताशिरताच वरील सूर छेडला गेल्यामुळे मी कान टवकारले. सूर छेडणारे, प्रत्युत्तर करणारे, सारी मंडळी तशी ओळखीचीच होती. इंटकचे ते पाचही जण क्रियाशील कार्यकर्ते होते. ‘असंतोष अशा दडपशाहीने शमणार नाही’ असे मनापासून वाटणाऱ्या त्या एका कार्यकर्त्याशी इतरही तसे सहमत होते. त्यातलाच एक, अगदी टोक गाठून म्हणाला,

‘...काँग्रेसची आजची अवस्था विनाशकाले विपरीत बुद्धी अशी झाली आहे. गुजराथ अजून शांत नाहीच. बिहार पेटला आहेच. मराठवाड्यात ठिणगी उडाली आहे. मद्रासने सवतासुभा मांडायचे ठरवलेलेच आहे. मध्य प्रदेश, उ. प्रदेश, दिल्ली देखील शांत नाही... रेल्वे संपाचे सावट देखील नसताना, गुजराथेत अशांततेची पुसट चिन्हे देखील दिसत नसताना, १९७१ मध्ये विरोधीपक्ष जवळ जवळ भुईसपाट झालेले असताना, थोडक्यात कुठल्याही तऱ्हेची दुश्चिन्हे नसताना आणि केंद्रस्थानी व बहुतेक राज्यातून भले भक्कम बहुमत असतानाही, सरकारने जनतेच्या भल्यासाठी काही केले नाही. सर्व दृष्टीने चांगले कार्य करण्यासाठी संपूर्ण अनुकूलता असूनही, ह्या काळात महागाई दुप्पट, तिप्पट, चौपट वाढत गेली. भ्रष्टाचार, लाचलुचपत, काळाबाजार वाढत गेला. मारुती मोटार्स, स्टेट बँक वगैरेसारखी प्रकरणे पुढे येत गेली. त्यावर पांघरूण घातले गेले. सत्तास्पर्धेतून भयानक डावपेच सुरू झाले. काँग्रेस व मी तर म्हणतो, ‘इंटक’ सुद्धा सामान्य जनतेला, कामगाराना विसरली ह्याचा फायदा विरोधकांनी उचलला नसता तरच ते आश्चर्य ठरले असते. आणि आज देश चहूबाजूंनी पेटून उठल्यासारखा दिसत असताना, शासनाने अडेलतट्टू धोरण स्वीकारले आहे. प्रश्नांच्या मुळाशी कुठे जातच नाही, मुळाशी घाव घालीतच नाही...’

‘...तुमची ही अशी मते असताना तुम्ही ह्या लढ्यात कामगारांच्या बाजूने का उतरत नाही ? संपाला पाठिंबा का देत नाही ?’ मनात आलेला प्रश्न मी त्या ‘इंटक’ मित्रांना विचारला.

‘दोन कारणे आहेत त्याची. एक तर वरचा हुकूम. दुसरे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते की ह्या संपामुळे जर देशभर वणवा भडकला तर त्यातून फक्त कम्युनिस्टांचेच फावेल. संप मोडून काढण्याच्या सरकारच्या प्रयत्नांनी देखील कम्युनिस्टांचेच फावेल. कारण असंतोष इतक्या पराकोटीला पोचलेला आहे, की तो असल्या सरकारी दडपशाहीने दडपण्याऐवजी जास्त जोराने उफाळून वर येईल...संप घडून यायची शक्यता व्यक्तिशः मला कालपर्यंत अजिबात वाटत नव्हती. पण आजच्या अटकसत्रामुळे ही शक्यता फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. उद्यांचा बंद यशस्वी ठरला तर, संप नक्की होईल असे अनुमान मी तरी काढीन...’

‘...पण असा उघड पवित्रा घेऊन रेल्वे कामगारांसमोर जाऊन उभे राहणे देखील आज आम्हाला शक्य नाही. किंबहुना जनतेसमोरच आम्ही जाऊ शकत नाही. भडक विरोधी प्रचार, काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाची अहंमन्य, ताठर वागणूक, सरकारी दडपेगिरी ह्यामुळे आमच्यासारखे सामान्य काँग्रेस कार्यकर्ते फार कात्रीत सापडतात. लोकांच्या भावना आम्ही त्यांच्यातच वावरत असल्याने आम्हाला नेमक्या कळतात. भयानक भाववाढीने घराघरातले एकूण बजेट पार कोसळलेले आहे तेही दिसते. एकूणच भ्रष्टाचारी जीवनाला मिळत असलेली राजमान्यता...तेच एक धडपणे माणसाला जगवू शकेल असे चलनी नाणे आज अस्तित्वात आहे. जनमानसात ही कल्पना पक्की बिंबली आहे. ह्या साऱ्याचे खापर लोक काँग्रेस राजवटीवर फोडतात, व त्यात फार मोठे तथ्य आहे हे आम्हालाही दिसते....

परिस्थितीची ही जाण आहे. विरोधी पक्षांना विरोध, संपाला विरोध पण संपावर जाऊ इच्छिणाऱ्या कामगारांबद्दल मात्र पूर्ण सहानुभूती.. त्यांच्या अगतिकतेची पूर्ण जाणीव. ह्या चमत्कारिक पेचामुळेच, ह्या संपाबाबत, इंटकची अधिकृत भूमिका काहीही असली तरी आमच्या-सारखी असंख्य मंडळी एकूण प्रश्नावर तटस्थ भूमिका घेऊन आहेत. काँग्रेसच्याही असंख्य जुन्या कार्यकर्त्यांशीही हीच भूमिका आहे....'

ह्या चर्चेतून एक सहजी प्रश्न माझ्या मनात आला. काँग्रेसच्या एकंदर कार्यप्रणालीबद्दल, प्रस्थापित नेतृत्त्वाबद्दल जर एवढा असंतोष ह्या मंडळीत आहे, तर ही मंडळी सरळ बाहेर का पडत नाहीत? विरोधी पक्षांच्या खांद्याला खांदा लावून, काँग्रेसविरुद्ध, सध्याच्या राजवटीविरुद्ध उभी का ठाकत नाहीत? माझ्या ह्या प्रश्नालाही लगेच उत्तर मिळाले—

' ...आज तीस तीस, चाळीस चाळीस वर्षं झाली, आम्ही काँग्रेसचे काम करीत आहोत. राजकीय जीवन संपवीत आणायची वेळ आलेली आहे. आज काँग्रेस सोडून दुसऱ्या पक्षात जायचे ही कल्पनाच सहन होत नाही. शिवाय दुसरा चांगला पक्ष तरी कुठे आहे? बहुसंख्य जनता काँग्रेस विरोधी आहे, ह्यात वाद नाही. पण विरोधी पक्षांचे राजकारण इतके चमत्कारिक आहे नि त्यांनी हा काँग्रेस विरोध इतका विभागून टाकला आहे की, त्याची धारच बोथट व्हावी!.. म्हणून आला दिवस बघत ढकलतो आहे. जमेल तेव्हा पक्षाच्या बैठकीमध्ये आम्ही कडाडून विरोध करतो. सध्याच्या नेतृत्त्वावर हल्ले चढवतो.' इंटक ऑफीसमधल्या पाचातले श्री. भाऊसाहेब म्हणाले.

आणि भाऊसाहेबांनी वर्तविलेली परिस्थिती सत्य आहे. असे अनेक जुने काँग्रेस कार्यकर्ते आहेत. जे आजच्या एकूण परिस्थितीमुळे काँग्रेस नेतृत्त्वाविरूद्ध ठणकावून बोलतात. पण सक्रीय विरोध त्यांना रुचत नाही. गेल्या ३०—४० वर्षांतले काँग्रेसमधले त्यांचे संबंध त्यांना तसे बांधून ठेवतात. सहज, ह्या प्रसंगामुळे आठवले म्हणून सांगायला हरकत नाही. सुमारे महिन्यापूर्वी श्री. आबासाहेब करमरकर हे जुने काँग्रेस कार्यकर्ते भेटले. त्यावेळी माझ्याबरोबर डाव्या कम्युनिस्टांची, लाल निशाणवाल्यांची काही तरुण मंडळी होती. जवळ जवळ अर्धा तास आबा बोलत राहिले. ते निघून गेल्यानंतर मी बरोबरच्या मित्रांना जेव्हा सांगितले की, आबा काँग्रेसचे निष्ठावान, जुने कार्यकर्ते आहेत, तेव्हा त्यांना आश्चर्यच वाटले. एक काँग्रेस कार्यकर्ता, 'गरिबी हटाव'वर इतक्या परखडपणे काँग्रेसचे वाभाडे काढतो — हे तसे आश्चर्य वाटण्यासारखेच होते! असो.

इंटक कार्यालयातली ही खाजगी चर्चा आटोपून मी बाहेर पडलो, तो रेल्वे कामगार नेते श्री. मळगी ह्यांच्या मृत्यूची बातमी सगळी-कडे पसरली होती. पोलीस कस्टडीत मृत्यू ही बाब अनेकांना खटकली होती. 'बहोत मारापीटा गया होगा यार. बिचारा बूढा तो थाही. धुलाई सहन नहीं कर पाया होगा.' चर्चगेटकडे धावणाऱ्या लोकलच्या 'दुसऱ्या वर्गाच्या डब्यात, एक भैय्याजी, माझ्या हातातल्या 'संध्याकाळ'मध्ये डोकावत म्हणाला. पण पुढे मला जी खात्री-लायक माहिती मिळाली तीनुसार मात्र हा मृत्यू नैसर्गिक होता. खुद्द श्री. मळगींच्या चिरंजीवानाही, (त्यांनाही अटक केली गेली होती!) त्यात काही संशयास्पद आढळलं नाही असं वाटतं.

हा मृत्यू आणि फर्नांडिस आदि नेत्यांची धरपकड ह्या दोन्ही बातम्या घेऊनच संध्याकाळचे पेपर्स त्या दिवशी (२ मे, १९७४) बाहेर पडले. लोकांच्या पेपर्सवर साहाजिकच तुफान उड्या पडल्या. आणि पाठोपाठच लोकलमध्ये देखील, प्रत्येक स्टेशनवर नवनवीन बातम्या येऊन थडकल्या. माटुंगा वर्कशॉपमध्ये संप सुरू झाला. लोणावळा-पुणे येथे स्टेशनमास्तर्ससह सर्वजण बाहेर पडले. सिग्नलस डिपार्टमेंटच्या मंडळींनी काम स्थगित केलं. सेंट्रल रेल्वेची लोकल वहातूक बंद पडली...वगैरे वगैरे. चर्चगेटला पोचलो तो चार-पाच हजारांचा मूकमोर्चा. थोड्याशा वेळात निघालेला तो शिस्तबद्ध, प्रचंड मोर्चा. पूर्वनियोजित वाटावा इतका सुसूत्र. पण एकदम उत्स्फूर्त! नंतर मळगींची निघालेली प्रेतयात्रा, दादरचा समारंभ — दुसऱ्या दिवशीचा बंद यशस्वी होणार ह्याची प्रचिती मला तिथेच आली!...

आणि ३ मेचा बंदही चांगलाच यशस्वी झाला. बंद शांतपणे तर पार पडलाच, पण त्याला लोकांचाही भरघोस पाठिंबा मिळाला. ह्या बंदचा आणखी एक विशेष म्हणजे, बंद कुठल्याही मोठ्या पूर्व-तयारीशिवाय अंमलात आणला गेला. बंदची हाक दिल्यापासून अवघ्या ८-९ तासांनी बंदला सुरुवात झाली. शिवसेनेच्या बंदप्रमाणे, काँग्रेस व शासन ह्यांचा पाठिंबा नव्हता. तेवढी प्रचंड पूर्वतयारी नव्हती. तरीही 'बंद' तितक्याच जोरकसपणे यशस्वी झाला. वाहतूक दंडेलीने बंद पाडण्यासाठी, कुठल्याही लोकलचे डबे कुणाला जाळावे लागले नाहीत....

मुंबईप्रमाणेच, देशभर ठिकठिकाणी बंद, निषेध, हरताळ पाळण्यात आले. मद्रास वगळता इतर सर्व ठिकाणी रेल्वे वाहतूक व इतर व्यवहार थंडावल्याच्या, विस्कळीत झाल्याच्या बातम्या येऊन थडकल्या आहेत. आणि ह्यावेळी, काँग्रेसच्या दृष्टीने असमाधानाची बाब म्हणजे, डांग्यांच्या कम्युनिस्ट पक्षानेही इतर डाव्या पक्षांशी सहकार्य केले आहे. जनसंघ व त्यांचा भारतीय मजदूर संघ, हेही समाजवादी-मार्क्सवादी त्यांच्याबरोबर मैदानात सक्रीय उतरले आहेत. स्वतंत्रवालेही आहेतच. मुंबईत शिवसेना मात्र रेल्वे आंदोलकां-बरोबर आहे असे वाटत नाही. रेल्वे आंदोलनाने स्वतःबरोबर इत-रांनाही घेतले आहे. इतरही प्रश्नांना हात घातलेला आहे. धान्यभाव वाढ व धान्य नाहीसे होणे ह्याविरुद्धचा आवाजही रेल्वे आंदोलनात सहभागी होत आहे. रेल्वे आंदोलकांच्या मागण्या कितपत योग्य आहेत, ते काही वेळ आपण बाजूला ठेवू. पण ह्या संपाच्या निमित्ताने एकदा सर्वच प्रश्न तडीला लागू देत ही जी एक भावना लोकात मला आढळली तिला तरी सर्वच राजकीय पक्षांनी खतपाणी घाला-यला काहीच हरकत नव्हती. संपामुळे भाववाढ होते, अन्नधान्य गायब होते, दुष्काळामुळे महागाई वाढते ही सारी स्पष्टीकरणे जनतेला माहीत आहेत. संप, दुष्काळ, लढाया जनतेने १९७१ नंतर पहिल्यांदाच अनुभवलेल्या आहेत असे मुळीच नाही. ७१ पूर्वीही अनेक लढाया, संप, दुष्काळ, महायुद्धे जनतेने अनुभवली आहेत. अगदी अलीकडे म्हणजे १९३७ ते १९७१ च्या काळातही महायुद्धा-सह सर्वकाही जनतेने अनुभवले आहे. ४२ च्या युद्धकाळापेक्षा किंवा ६२ च्या चीनविरुद्धच्या पराभवाच्या काळापेक्षा, १९७१ नंतरची परिस्थिती जास्त बिकट खचितच नव्हती. पण असे असूनही, १९३७ ते १९७१ ह्या एकूण काळात झाली नाही तेवढी बेफाट भाववाढ

१९७१ ते १९७४ ह्या अवघ्या तीन वर्षांच्या कालावधीत झाली ही वस्तुस्थिती आहे. ही महागाई, ही अन्नान्न दशा लोकांना सहन होत नाही. आणि म्हणूनच, रेल्वे संपामुळे हाल वाढतील, महागाई आणखी कडाडेल हे मान्य करूनही, रेल्वे आंदोलनाला जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. रेल्वे आंदोलन स्वतःबरोबर जनतेची चीडही घेऊन पुढे जात आहे, असे मी वर म्हटले ते ह्याचमुळे !

सर्वसामान्य जनतेत ह्या आंदोलनाबाबत कमालीची उत्सुकता आहे. आंदोलनाला तिचा पाठिंबा आहे. रेल्वे कामगारांच्या सहानुभूतीतून हा पाठिंबा ह्या आंदोलनाला मिळत आहे असे मात्र मुळीच नाही. सरकार व सध्याच्या परिस्थितीविरुद्धच्या चिडीतून हा पाठिंबा ह्या आंदोलनाला मिळाला आहे. 'काय व्हायचे असेल ते होऊन जाऊ दे, पण एकदाचा सोक्षमोक्ष लागून जाऊ दे. आहे ही घडी जर साफ कोलमडली तरच काही नवीन चांगले हाती लागण्याची शक्यता आहे.' मी अनेकांशी ह्या संबंधात बोललो. जनतेच्या कडवट प्रतिक्रियांचे थोडक्यात सार हे असे आहे. त्यातून हा पाठिंबा, स्वतःच्या हालअपेष्टा स्पष्ट दिसत असूनही उभा आहे. ह्या पाठिंब्याचे एक फार चांगले उदाहरण 'बंद'च्या दिवशी मला ठाणे स्टेशनवर पाहायला मिळाले. व्ही. टी. किंवा चर्चगेट किंवा इतर कुठेही रेल्वे ऑफीसमध्ये काम करणाऱ्या माणसाला काही सार्वजनिक कारणामुळे कामावर जाणे शक्य झाले नाही, तर ज्या ठिकाणाहून तो रोज कामावर येतो त्या नजिकच्या रेल्वे स्टेशनवर जाऊन त्याला आपली हजेरी नोंदवता येते. व्ही. टी. ला ठाण्याहून जाणाऱ्या इसमाने, ठाणे स्टेशनवर जाऊन तिथल्या रजिस्टरमध्ये सही केली की त्याची कामावर जाण्याची इच्छा होती, पण नाइलाजाने त्याला जाता आले नाही असे गृहीत धरून त्याची उपस्थिती नोंदवता येते. अशा तऱ्हेने ठाणे स्टेशनवर सह्या करायला पुढे आलेल्या लोकांना मागे रेटले ते 'बेस्ट'च्या एका कर्मचाऱ्याने ! 'तुमच्या कारणासाठी आम्ही बंदत उतरलो. तुमच्याबरोबर संपही कदाचित आम्ही करू. अपेक्षा काय तर ह्या निमित्ताने साले सगळे पेटून निघेल. काही तरी नवीन सर्वांनाच अनुभवायला मिळेल. पण तुम्हीच असे तुमच्याच संपात काड्या घालायला लागलात, तर आयला आम्ही पण पाहून घेऊ...'

रेल्वे कामगारांच्या लढ्याचा मागोवा घेताना मी त्यांच्या अनेक नेत्यांना भेटलो. त्यांच्या मागण्या समजावून घेतल्या. रेल्वे कामगारांच्या अनेक सभांना मी हजर राहिलो. सीटू, समाजवादी, संघ–मंडळींच्या बोलण्याचा कानोसा घेतला. पण त्यात मला काही फारसं स्वारस्य वाटलं नाही. सर्वसाधारणपणे बहुतेक शासकीय संस्थांतून ज्या प्रकारच्या आर्थिक मागण्यांसाठी एक प्रकारच्या अन्यायाविरुद्धची दाद मागण्यासाठी लढे उभारले जातात, तसाच हा लढा आहे. वैशिष्ट्य असलेच तर ते हे की, अखिल भारतीय पातळीवर वेगवेगळ्या स्तरांवर काम करणाऱ्या, भिन्न विचार प्रणालींच्या संघटनांना एकत्रित आणून भक्कम फळी बांधली गेली आहे. हे काम अतिशय अवघड होतं. ही फळी बांधण्यात महत्त्वाचा वाटा जॉर्ज फर्नांडिस ह्यांचा आहे. ह्या एकदोन वैशिष्ट्यांव्यतिरिक्त आणि शासनाच्या दडपणाविरुद्ध कर्मचाऱ्यांची भक्कम एकजूट ह्याशिवाय प्रत्यक्ष लढा, कामगारांच्या मागण्या त्यांच्या नेत्यांची मते ह्याविषयी जास्त खोलात जावेसे मला तरी वाटत नाही. त्याविषयी सर्व बारीक सारीक तपशील, रेडिओने दडवला तरी वृत्तपत्रांनी प्रकाशित केला आहेच. संपाच्या बाजूने असलेल्यांची मते, रेडिओने कटाक्षाने टाळली तरी वृत्तपत्रांनी उचलून धरली. तेव्हा ते सारे रामायण पुन्हा उगाळण्याची मला गरज वाटत नाही. तथापी रेल्वे आंदोलनाचा जबरदस्त फटका ज्या सर्वसामान्य जनतेला बसणार तिच्या प्रतिक्रिया मात्र मी अवश्य गोळा केल्या आणि वर उद्धृतही केल्या.

ह्यातल्याच आणखीन एकदोन प्रतिक्रिया इथे सांगायलाच हव्यात. सोहलसिंग नावाचे एक इंजिनियर माझ्याशी बोलताना म्हणाले, '...स्ट्राईक हो तो ही अच्छा है. सबही चीजोंके भाव पचास सौ. गुना बढ चुके है. अभी स्ट्राईकसे इससे और ज्यादा ऐसी कौनसी बडी कठिनाई पडनेवाली है?' गिरणीतले एक कर्मचारी श्री. भालेराव म्हणाले, 'सुखासीन असलो तर, संपामुळे भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांची भीती बाळगायची. सध्या जे काही आम्ही भोगत आहोत, त्यांनी आजन्म मोडून जायची पाळी आली आहे. त्याची कुणाला काळजीच नाही. इंदिराजी परदेश दौरे करीत हिंडताहेत. विपक्ष परिषदेत जनतेचा पैसा उधळताहेत. खायला पैसा पुरत नसताना वेफाट पैसा निवडणुकांवर, दौऱ्यांवर, उधळताहेत. हा संप घडला आणि देशातली सारी व्यवस्थाच कोसळून पडली तरच बरे होईल. त्यामुळे तरी निदान कुण्या चांगल्या माणसाच्या हातात सत्ता जाईल. ह्या अशा बदलाला कुणी अराजक म्हटले तरी चालेल. नाहीतरी देशात आज इंदिरा सरकार जे काही राबवीत आहे ते निव्वळ अराजकच आहे. गरीब जनतेला पिळून काढणारे ! नव्या अराजकातून कुणी जयप्रकाशांसारखा गरिबांचा वाली पुढे आला तर लोक त्याचे स्वागतच करतील !!'

ह्या संपूर्ण आंदोलन काळात रेडिओवर अनेकांचा जबरदस्त राग आढळला. ह्या काळात, विशेषतः २ मे ते ५ मेच्या काळात, रेल्वे आंदोलनाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वपूर्ण घटना देशात घडत होत्या. देशातील लोकांच्या जीवनावर त्याचा महत्त्वपूर्ण परिणाम घडणार होता. पण ह्या काळातली रेडिओला महत्त्वपूर्ण वाटली ती पोर्तुगालची बातमी. मध्यपूर्वेतल्या किसिंजर हालचालींची बातमी ! रेल्वे बातम्या जवळजवळ येतच नव्हत्या. आल्याच तर संपाला विरोध करणाऱ्या मंत्र्यांच्या पोथीछाप भाषणांच्याच फक्त ! एकाने तर मला सांगितले, '...ह्या काळात All Indira Radio ने बातम्या सुरू केल्या की आम्ही रेडिओ बंद करतो. इंदिरा रेडिओपेक्षा BBC ज्यास्त विश्वासार्ह बातम्या या संपाबाबत देते. मळगींच्या मृत्यूचीही पहिली बातमी बीबीसीनेच दिली...'

एकूण संपूर्ण मुंबईतली स्थिती ही अशी होती. प्रत्यक्ष ८ मेला संप होईलच असे छातीठोकपणे सांगता येत नाही. संपनेत्यांना अटक करताना उजवे कम्युनिस्ट कटाक्षाने वगळले गेले आहेत. त्यांची एकूण प्रकरणातली भूमिका सोडून, समाजवादी, संघ ह्यांच्याएवढी ताठर नव्हती. जुजबी वाहतूक संपकाळातही चालावी असा सूर श्री. डांगे ह्यांनी आधीच धरला आहे. डांग्यांची इंदिराजींशी दोस्ती जाहीर आहेच. 'हा सर्व इंदिराजींना हुसकावून लावण्याचा प्रतिगामी. अतिरेकी डावे ह्यांचा, काँग्रेसमधील इंदिराजींच्या अंतर्गत विरोधकांच्या संमतीने रचलेला डाव आहे.' हा इंदिरा-भक्तांचा आणि काँग्रेस विरोधकांचा लाडका आरोप आहे. तो ह्यावेळीही पुढे मांडला जात आहे. ही सर्व मंडळी, फर्नांडिसच्या अनुपस्थितीत, डांग्यांना महत्त्व देऊन वाटाघाटींचा नवा फार्स घडवून आणतील व संप मोडीत काढतील अशीही अफवा आहे. तर सरकारही ऐनवेळी काही फतवे काढून संप टाळील असा अंदाज आहे.

काही असले तरी आजचे वातावरणच संपाला अनुकूल आहे. सामान्य जनता, पुढे येणाऱ्या कष्टांची तमा न बाळगता संपाला उत्स्फूर्त पाठिंबा द्यायला पुढे आली आहे. दि. ४–५–७४

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# शतपावली

## रवींद्र पिंगे

## प्रसिद्ध झाले

## मूल्य रुपये दहा

## रुपया पुस्तक योजना

या योजनेतील एकूण दहा पुस्तकांपैकी आठ पुस्तकांचे वाटप यापूर्वीच झाले आहे. रवींद्र पिंगे यांचे 'शतपावली' हे नववे पुस्तक तयार झाले असून ते कार्यालयातून घेऊन जाण्याची व्यवस्था ग्राहकांनी करावी.

ज्यांना पूर्वीच्या आठ पुस्तकांप्रमाणे हे पुस्तक पोस्टाने पाठवावयाचे आहे त्यांना दहावे श्रीग्रामायन हे पुस्तक जुलै-ऑगस्टमध्ये तयार झाल्यावर दोन्ही पुस्तके एकदम पाठविली जातील. पोस्टखर्च दुबार होऊ नये म्हणून ही व्यवस्था.

ही योजना पूर्ण होण्यास प्रथम वीजकपात, नंतर कागदटंचाई अशा सारख्या अडचणी येत गेल्या. त्यामुळे ग्राहकांची गैरसोय झाली याची आम्हाला जाणीव आहे. पण एवढ्या अडचणी येऊनही योजना अखेर शेवटास जात आहे याचे समाधानही आहे.

आता 'टॉलस्टॉय' व 'मी नेताजींना बघितलंय' ह्या पुस्तक प्रकाशनाच्या योजना हाती घेत आहोत.

ग्राहकांचा कृपालोभ असावा.

व्यवस्थापक<br>
राजहंस प्रकाशन<br>
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबावतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.